# जीवनविकास

## जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन



साहेबराव शामराव जवंजाळ

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# जीवनविकास

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

### आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# जीवनविकास

## -जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन

लेखक

साहेबराव शा. जवंजाळ

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

## जीवनविकास-जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन


लेखक... साहेबराव शा. जवंजाळ

साकार अपार्टमेंट,१४५ अंबाझिरी हिलटॉप नागपूर ४४००३३

फोन नं .०७१२ २२२६०३४/ मोबाईल ९३२५५०५०३७



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



## ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २५ फेब्रुवारी २०२१**



©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

## **लेखक परिचय**



साहेबराव शामराव जवंजाळ

जन्मतारीख : २६ ऑक्टोबर १९४५ ; काटोल जि.नागपूर

हल्ली मुक्काम व पत्ता - साकार अपार्टमेंट,१४५ अंबाझिरी हिलटॉप नागपूर ४४००३३

फोन नं .०७१२ २२२६०३४/ मोबाईल ९३२५५०५०३७

शिक्षण :

एस.एस.सी पर्यंत बी.आर.हायस्कुल काटोल

बी.एस.सी. (मोहता कॉलेज व हिस्लॉप कॉलेज नागपूर)

बी.एस.सी.टेक(लक्ष्मीनारायण इंस्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी नागपूर)

व्यवसाय :

निवृत्त उपनिर्देशक,खादी ग्रामोद्योग कमिशन (भारत सरकार)

महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांची कर्मभूमि असलेल्या वर्धा येथील खादी ग्रामोद्योग कमिशन अंतर्गत ग्रामोद्योग अनुसंधान संस्था (महात्मा गांधींनी स्थापन केलेली ) येथे २५ वर्षे वास्तव्य.

साहित्य :

१.नागपूर पत्रिका (नागपूर टाईम्स ग्रुप) नागपूर या वर्तमानपत्रातुन १९८० ते १९९१ या काळात समाजव्यवस्था(८ लेख),मानवविकास व अध्यात्म (६लेख),कृषी व उद्योगाचे व्यवस्थापन(६ लेख), संत्रा प्रक्रिया उद्योग(६ लेख), कृषी(३लेख), कृषीउद्योग(६लेख)

या विषयावरील एकुण ३५ लेख प्रसिद्ध झाले.

२.जागृति (ग्रामिण औद्योगिकीकरण यावरील खादी ग्रामोद्योगाची मासिक पत्रिका) यातुन लेख प्रसिद्ध.

३.भगवदगीतेची विशेष आवड.संपुर्ण भगवदगीता मुखोद्गत .

*"भगवदगीतेतील मुख्य विषयावर दृष्टिक्षेप " ही लेखमाला विविध आध्यात्मिक ग्रुपवर (WA) पोस्ट होते.

*अखिल भारतिय गायत्री परिवार नागपूर येथे "विज्ञान व अध्यात्म" या अंतर्गत भगवदगीता विषयावर भाषण

४.भगवदगीता-"परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान" हे पुस्तक प्रकाशित झाले.

***********

*नागपूर पत्रिका (नागपूर टाईम्स ग्रुप नागपूर ) वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले लेख :(१९८० ते १९९१)

*समाजव्यवस्था

१.तर भारत विकसित राष्ट्र होईल.

२.मानवशक्ती आणि शाश्वत समाजव्यवस्था

३.समृद्धि व रोजगार

४.भारताची गरिबी आणि आहार

५.समृद्ध राष्ट्रासाठी ग्रामसमृद्धि आवश्यक

६.ग्रामिण विकास आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह

७.ग्रामिण क्षेत्र आणि व्यावसायिक अभ्यासक्रम

८.प्रत्येक खेडे शहर झालेच पाहिजे

*मानवविकास व अध्यात्म

१.मानवी विकासाचा आधार

२.स्वअस्तित्व जाणले तरच विकास

३.स्वतःचे ज्ञान हेच अध्यात्म

४.सत्याची अनुभुति हाच विकास

५.हातुन मोठी कामे केंव्हा होतात

६.अहंकाराची नव्हे निर्णयसामर्थ्याची गरज

*कृषी व उद्योगाचे व्यवस्थापन

१.समतोल विकासासाठी विकेंद्रिकरण

२.यशस्वी विकेंद्रिकरणासाठी एक्स्चेंज पद्धति

३.ग्रामिण उद्योगाचे व्यवसाय संघटन

४.कृषी उद्योगाची संघटनात्मक रचना

५.सहकार चळवळीचा मार्ग

६.विदर्भातील सहकारी चळवळ-कांही उपाय

*संत्रा प्रक्रिया उद्योग

१.संत्रा प्रक्रिया उद्योगाचे जाळे

२.संत्रा उद्योग संयंत्रणा

३.संत्रा उत्पादक ते ग्राहक संयंत्रणा

४.आदर्श संत्रा उद्योग

५.संत्रा प्रक्रिया उद्योगात प्रथम पाऊल

६.संत्र्याची औद्योगिक उत्पादने

*कृषी

१.शेतीचे प्रश्न आणि सोडवणुक

२.पिकलं नसेल तर लुट नाहीतर लयलुट

३.ग्रामोद्योग विकास साधला तरच शेती जगेल

*कृषीउद्योग

१.विदर्भात प्रक्रिया उद्योग शक्य

२.भारताचा अनमोल नैसर्गिक ठेवा-कडुनिंब

३.सरकी प्रक्रिया उद्योग

४.सुगंधी द्रव्य उद्योग

५.विकेंद्रित फळे व भाज्या प्रक्रिया उद्योग

६.साबण उद्योग

# मनोगत-आभार

मानवी जीवनाच्या तत्त्वज्ञानाचे मुळ भगवदगीता ज्ञान आहे.समाजात,मनुष्यजीवनात प्रश्न निर्माण होतात.वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी भगवदगीता निश्चित दिशा देत आहे. याचा परामर्श "आध्यात्मिक क्रान्ति"(-परिवर्तनाचे व्यवस्थापन ) व "जीवनविकास-जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन" या दोन पुस्तकातुन घेतलेला आहे.

नागपुर जिल्ह्यातील काटोल हे माझे जन्मगांव. काटोलपासुन ५ कि.मि.वर असलेले फेटरी हे आमच्या कुटुंबाची वडिलोपार्जित शेती असलेले खेडे.या खेड्यात दरवर्षाला कार्तिक महिन्यात दिंडी,काकडआरती,दहीलाही इ. धार्मिक कार्यक्रम आमच्या वाड्यातुनच होत होते व गांवात कार्तिक महिन्यात पंढरीच अवतरत होती.हा अध्यात्माचा वारसा मला आमच्या कुटुंबाकडुन लाभला.तसेच माझे बंधुतुल्य मित्र डॉ.रमेश सालकर यांचे वडील (स्व.) डॉ.गोविंदराव सालकर यांची संपुर्ण भगवदगीता मुखोद्गत होती.हीच गोष्ट माझ्यासाठी प्रेरणादायी ठरली ज्यामुळे मी भगवदगीतेकडे आकर्षित झालो.त्यांचा मी ऋणी आहो.

वर्तमानातील प्रश्नाचे आकलन व्हावे व प्रश्नाची सोडवणुक करता यावी यासाठी ज्यांनी ज्ञान संपादन केले (४ पदवी,४पदव्युत्तर डिप्लोमा व १३ विषयात पदव्युत्तर पदव्या) असे उच्चविद्याविभुषित पंडीत माझे बंधुतुल्य मित्र श्री दिगांबर उपाख्य पंडीतराव म.आळशी यांचेशी या विषयावर सतत चर्चा होते.त्यांचा मी आभारी आहे.

या पुस्तकांचे संपादन करण्यासाठी डॉ.सौ.संगिताताई अरुण खुरद यांचे मोलाचे सहकार्य लाभले.त्यांचा मी आभारी आहे.

युवापिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणाऱ्या पुस्तकांचे महत्व जाणुन श्री.सुनील सामंत प्रकाशित करीत आहे, त्यांचा मी आभारी आहे.

सर्वात शेवटी माझे कुटुंबिय माझी पत्नि सौ.पद्मा साहेबराव जवंजाळ,माझ्या मुली डॉ.सौ.वैशाली मनोज पेठे,डॉ.सौ.अनुराधा प्रशांत अलोणे, डॉ.सौ.अनुपमा अनुप जुनघरे यांचे मला सतत सहकार्य लाभले.त्यांचा मी आभारी आहे.

**साहेबराव शा.जवंजाळ** **नागपुर**

# अर्पणपत्रिका



माझी आई (स्व.) सौ.अनसुयाबाई शामराव जवंजाळ

हिच्या पुण्यस्मृतिस समर्पण

# प्रस्तावना

# जीवनविकास

"कर्मानुबंधिनी मनुष्यलोके" अर्थात मनुष्याची ओळख कर्मानेच होत असते. मानवी कर्तृत्वच जगाचा इतिहास लिहित असते. मनुष्याच्या हातुन होणाऱ्या कर्तृत्वाचे रहस्य काय?हा निश्चितच जाणुन घेण्याचा विषय आहे. जीवनात उत्कर्ष व्हावा असे युवकांना वाटत असते. प्रत्येक युवकांची मानसिकता त्यांचे संस्कार, अनुभव, (ग्रहण केलेली) विद्या यानुसार बनलेली असते.विद्या ग्रहण केली तरी त्या विद्येचा उपयोग करण्याचे कसब असणे आवश्यक असते.याचसाठी I.Q,E.Q,A.Q,S.Q. असे अनुक्रमे Intellegent, Spiritual,Adverse, Spiritual Qotient अस्तित्वात आले.

महाभारतात अर्जुन धनुर्विद्येत पारंगत होता.त्याला या कार्याची धर्मयुद्धात वापर करण्याची संधि होती. त्याला मात्र निष्क्रियता योग्य वाटली.याच पार्श्वभुमिवर भगवदगीता ज्ञान अस्तित्वात आले. जसे कलाकार रंगमंचावरील आपली भूमिका समजावुन घेतो,तसेच या विश्वाच्या रंगमंचावरील स्वतःची भूमिका मनुष्याला जाणुन घ्यायची असते.या संदर्भात सा◌ॅक्रेटिसचा " KNOW THYSELF" हा संदेश प्रसिद्ध आहे.रंगमंचावर (नाटकात) भूमिका वठवावी लागते, तर विश्वाच्या रंगमंचावर भूमिका जगावी लागते.अर्जुनाला हीच स्वतःची भूमिका ज्ञात करुन दिली तेच ज्ञान भगवदगीता या नांवाने जगात प्रसिद्ध झाले. जगात ज्ञानविज्ञान श्रेष्ठ आहे हा महत्वाचा संदेश भगवदगीता देत आहे.ज्ञानविज्ञानाचा वापर करुनच जगाने नवे आधुनिक रुप धारण केले आहे."बदल" प्रकृतिचा नियम आहे. बदलत्या परिस्थितीत वर्तमानात निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठी अद्यावत ज्ञानाची गरज भासते. श्रीकृष्णांनी पुरातन ज्ञान अद्यावत (UPDATE) केले. भारताचा सांस्कृतिक वारसा अध्यात्मावर आधारीत आहे.श्रीकृष्णांनी पुरातन शास्त्राचा उपयोग वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी करुन घेतला व भगवदगीतारुपाने जीवनाचे व्यवस्थापनशास्त्रच जगासमोर आणले. भगवदगीतेतील "बंधन-मोक्ष तत्त्वज्ञान "अर्थात स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान हा या पुस्तकाचा प्रथम भाग आहे तर दुसरा भाग "जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन " आहे.

मनुष्यजीवनात स्वतःचा योगक्षेम चालविणे हे जीवनाचे दायित्व असते.मनुष्य समुहात जगत असतो.यांत समुहाचे संचलन असते.तसेच विश्वाचे संचलनचक्र प्रवर्तित होत असते.मनुष्याचा

योगक्षेम,समुहाचे संचलन,विश्वसंचलन हे सर्व साध्य होण्यासाठी ( आध्यात्मिक)व्यवस्थापनशास्त्र महत्वाची भूमिका बजावते.

"धर्मगति" व "ईश्वरगति" :

आध्यात्मिक व्यवस्थापन या संदर्भातच "धर्मगति" व "ईश्वरगति" हे दोन शब्द रामायणात आलेले आहे. पित्याच्या वचनाचे पालन व्हावे ,यासाठी पित्याच्या आज्ञेचे पालन व्हावे.याला श्रीरामाने स्वतःची धर्मगति म्हटले.

"धरमधुरीन धरमगति जानी।"

श्रीरामाची हीच धर्मगति ईश्वरगति ठरते.कांहीही अपराध नसतांना श्रीरामाला वनवास मिळतो.म्हणुन म्हटले,

"अति बिचित्र भगवंत गति जो जग जानै जोगु।"

"धर्मगति" व "ईश्वरगति" यांच्या समन्वयाचे दर्शन भगवदगीतेत होते.

ठरल्याप्रमाणे युद्ध करणे अर्जुनाचे दायित्व होते.यानुसार मनुष्याला मान्य ती त्याची "कर्मगति " ठरते.समाजाचे कल्याण साध्य करणारी "धर्मगति" असते,यानुसार समाजाला मान्य ती धर्मगति ठरते.जे प्रत्यक्षात घडणार असते (जे विश्वरुपदर्शनात अर्जुनाला दर्शविले!) अर्थात ईश्वराला मान्य ती "ईश्वरगति" ठरते.याप्रमाणे कर्मगति, धर्मगति व ईश्वरगति यांचा समन्वय ज्यामुळे साध्य होते तेच आध्यात्मिक व्यवस्थापन असते. समुहसंचालनात व्यवस्थापनाचा उपयोग होतो. जगातील धर्म याच (विश्वसंचलन) व्यवस्थापनाचा भाग असतो. समुहाच्या व्यवस्थापनात व्यवहार असतो. महाभारतातील धर्मयुद्ध याच व्यवहाराचा भाग असतो. धर्मगति या संदर्भात स्वतःचा स्वधर्म जाणणे येथे अभिप्रेत असते. परंतु अर्जुनाला मार्गात संशय येतो. निष्क्रियतेला धर्म संबोधीत करतो.म्हणुन जीवनमार्गाच्या व्यवस्थापनात धर्माची भूमिका हा विषय भगवदगीतेत आला.

" आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" हा आध्यात्मिक व्यवस्थापनाचा मुळ हेतु ठरतो.विश्वाचे संचलन हे विश्वाचे व्यवस्थापन असते.विश्वाचे व्यवस्थापन म्हटले कि,ईश्वर विश्वाचा अध्यक्ष आहे अशी ईश्वराची ओळख होते. ईश्वराने केलेले प्रयोजन(Design) या अर्थाने मनुष्य "ईश्वरगति" जाणतो.ईश्वराचेच कर्म जाणुन ईश्वरासाठी भक्तिरुपाने करणे हेच निष्काम कर्माचे तत्त्व आहे.हाच आध्यात्मिक व्यवस्थापनाचा हेतु आहे.यामुळेच "आत्मनो मोक्षार्थ जगतहीताय च" हा हेतु साध्य होतो.

******* ******

जीवनविकास –

# जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन

साहेबराव शामराव जवंजाळ

# अनुक्रमाणिका

---

| *अ .न* | *पेज नं* |
|---|---|


१.**भगवदगीतेतील बंधन –मोक्ष तत्वज्ञान** **१४**

**( स्वातंत्र्याचे ज्ञान)**

**१) भगवद्‌गीतेचा** शाश्वत धर्म १४

**१.१ धर्मगति–धर्मग्लानी व** स्व**धर्म**

**१.२ धर्म व** शाश्वत धर्म( ***Universal Religion*** )**भेद**

**१.३ जीवनात** ज्ञानविज्ञाना**ची भूमिका** :

**२) कर्म(गति**–गहना कर्मणो गतिः) २३

**२.१ मनुष्याच्या गुणात्मक अवस्था : (प्रकृतिज्ञान)**

**२.२.गुणात्मकअवस्थेची व्दिविभागणी** (आध्यात्मिक क्रांतीचा आधार) :

**२.३ जीवनाची ज्ञानी अवस्था**

**३)ज्ञानी ( पातळीबदल )** **३२**

अ.) पातळी बदल :ज्ञान

ब) पातळी बदल:कर्म (कर्मगति –कार्यच विकासाचे साधन)

क) भक्ती:धार्मिक अवस्थेतून पातळी बदल( धर्मगति–ईश्वरगति)

२.**जीवन**मार्गाचे(आध्यात्मिक) व्यवस्थापन ३८

१ – **स्वतःची ओळख** **३८**

२ –**आध्यात्मिक** व्यवस्थापनाचे तत्वज्ञान ४७

३ .–**आध्यात्मिक** व्यवस्थापनाची **प्रक्रिया** ५१

# (१)

# भगवदगीतेतील बंधन –मोक्ष ज्ञान

## ( स्वातंत्र्याचे तत्वज्ञान)


**१) भगवद्गीतेचा** शाश्वत धर्म

**१.१ धर्मगति–धर्मग्लानी व** स्व**धर्म**

**१.२ धर्म व** शाश्वत धर्म(*Universal Religion* )**भेद**

**१.३ जीवनात** ज्ञानविज्ञाना**ची भूमिका** :

**२.) कर्म(गति**–गहना कर्मणो गतिः)

**२.१ मनुष्याच्या गुणात्मक अवस्था : (प्रकृतिज्ञान**

**२.२.गुणात्मकअवस्थेची व्दिविभागणी** (आध्यात्मिक क्रांतीचा आधार) :

**२.३ जीवनाची ज्ञानी अवस्था**

**३. ज्ञानी ( पातळीबदल )**

३.१ पातळी बदल :ज्ञान

३.२ पातळी बदल:कर्म (कर्मगति –कार्यच विकासाचे साधन)

३.३ भक्ती:धार्मिक अवस्थेतून पातळी बदल( धर्मगति–ईश्वरगति)


---

## १.भगवद्गीतेचा शाश्वत धर्म

### भगवद्गीतेची पार्श्वभूमी :

महाभारतात कौरवांनी पांडवाचे शोषण केले .म्हणून प्रकरण न्यायप्रविष्ट झाले व धर्मयुध्द ठरले हेच महाभारत युध्द म्हणून भारतात प्रसिद्ध आहे. रणांगणावर भीष्माचार्य द्रोणाचार्य यांच्यासारख्या वंदनीय जेष्ठांना मारावे लागणार हे पाहून अर्जुन गर्भगळीत होतो.व निष्क्रीय राहणे पसंत करतो.निष्क्रीयतेचे धार्मिक कृती म्हणून समर्थन करतो.श्रीकृष्णाने या ज्ञानाला प्रज्ञावाद म्हटले.जे उच्च जीवनाच्या मार्गावर असतात ते कठीणसमयी दुबळे होत

नाही.या आधारावर श्रीकृष्णाने त्याच्या भूमिकेला क्लैब्य संबोधले .मनोदुर्बलता सोडून कार्यासाठी सिध्द हो ही समज दिली.

अर्जुनाने संभ्रम(अज्ञान) कबूल केला. तेंव्हा संभ्रमाचे कारण सांगितले. भीष्माचार्य द्रोणाचार्य यांच्यासारखे विद्वान ,धर्मश्रेष्ठी, पूजनीय ज्या पक्षाकडून आहे त्यांची बाजू धर्माची की आमची ही प्रतिक्रिया व्यक्त करतो , व म्हणतो विजयासाठी ज्यांचा प्राण घेणे योग्य वाटत नाही तेच आमचे शत्रु म्हणून उभे आहेत.विजय मिळून देवाचे राज्य जरी मिळाले ते राज्य माझा शोक नष्ट करू शकणार नाही असे म्हणून मी युद्ध करणार नाही असे मत व्यक्त करतो.अर्जुनाच्या प्रश्नावर कार्यशाळा सूरू झाली. याच कार्यशाळेतून आध्यात्मिक क्रांतीचा संदेश आला. ही कार्यशाळा भगवद्गीता म्हणून जगप्रसिध्द झाली.

**अर्जुनाचा प्रश्न व निराकरण:**

**अ)** महाभारत युद्धात अर्जुनाची सहजप्रवृत्ती त्याला युद्धापासून परावृत्त करते. महाभारतातील विषय युद्ध असतो.याच विषयाच्या अनुषंगाने जीवनमार्गातील संभ्रमाचे सत्यच अर्जुनाने लपविले असते.व प्रश्नाला टाळूनच जगण्याचा प्रयत्न करतो .अर्जुनाला समज दिली तेंव्हा संभ्रमाचे कारण सांगितले.श्रीकृष्णाने त्याचे अज्ञान उघड केले .तेव्हाच प्रश्नाला पारदर्शकता आली.माझे नियत कार्य शोकदायी आहे.जगातील कोणतेही वैभव हा शोक नष्ट करणार नाही म्हणून माझे कार्य योग्य कसे हे मला कळत नाही.याच प्रश्नाचे अर्जुनाजवळ उत्तर नव्हते.या प्रश्नाचे निराकरण करतानांच अर्जुन व भगवान श्रीकृष्ण यांचे संवादातून शाश्वतधर्म जगासमोर आला.

**ब)** महाभारतातील विषय(Agenda) युद्ध असला तरी अर्जुनाचा प्रश्न पूढे आला.युद्ध करणे हा अर्जुनाचा विषय होता.पण'युद्ध करणार नाही' हा अर्जुनाने विषय बनविला होता. सर्व योद्धे युध्दमैदानात लढण्याच्या तयारीत सज्ज होते. पण अर्जुनालाच ज्ञानाची गरज कां पडली? अर्जुनाला संभ्रम झाला नसता तर जे व्हावयाचे युध्द तेघडलेच असते. मग अर्जुनच अज्ञान का ठरला? या प्रश्नातच ज्ञानाचे रहस्य उलगडते.अर्जुनाने युद्धाचा स्वधर्म स्वीकारला असतो. धर्म अधर्माचेच युद्ध त्याच्या मनात उभे ठाकले.वतर्मानात निश्चित ठरलेल्या कार्याप्रमाणे जेव्हा प्रत्यक्ष कार्याचीच गरज होती अशा वेळीच अर्जुनाने पाठ दर्शवली. कार्य टाळले तर चांगला असला तरी डोक्यावर अपकिर्तीचा भार वाहतच जगावे लागेल अशी श्रीकृष्णाने समज दिली , यामुळे शोकमुक्ती हाच अर्जुनाचा विषय बनला.

क)याप्रमाणे जीवनविकास व बुध्दीची अविचल स्थिती(Precondition before Act) हा भगवतगीतेचा विषय बनला.प्रकृतिनुसार जीवनमार्ग चालू असतो व स्वत:चा मार्ग चालण्यासाठी बुद्धीचा वापर करावा लागतो. ज्ञानाने विकासासाठी पर्याय मिळतो.ज्ञानाचे अभावी अर्जुनाजवळ पर्याय नव्हता. तेव्हा प्रज्ञावादी भूमिका घेतो.तो दीनवचन

बोलतो.या अवस्थेत प्रकृतीतील द्वंद्व क्रियाशील होतो.संशय याचे कारण ठरते .बुद्धिभ्रम झाल्यामुळे बुद्धिनाश होतो.मानसिक दुर्बलतेचे हे लक्षण असते.हीच मानसिक गरिबी ठरते. म्हणून गीतेत भ्रामक भाष्यापासून स्वत:च्या बुद्धीला मुक्त ठेवणे यासाठी बुद्धियोग सांगितला. काय योग्य व काय अयोग्य या अंतर्मनातील चक्रव्यूहात सापडलेला अर्जुन चक्रव्यूह भेदण्यास समर्थ होतो.व्यावहारीक जीवनातील दुर्बलता शक्तीमध्ये रूपांतरीत करण्यासाठी गीतेतून आध्यात्मिक क्रांतीचा संदेश मिळतो.

### १.१) धर्मगति–धर्मग्लानी व स्वधर्म

महाभारतातील प्रसंगाची पार्श्वभूमी व्यावहारिक होती.अर्जुनाने स्वयप्रेरणेने युद्ध न करणे हा निर्णय घेतला असतो.समाजमान्य विचारधारेला छेद होत आहे,तेव्हा आपली बंडखोरीची भूमिका आहे असे अर्जुनाला वाटते. आपला संशय व्यक्त करतांना म्हणतो सुखासाठी राज्यलाभ झाला तरी डोक्यावर पापाचा भार घेऊन जगावे लागेल.अर्जुनाने नैसर्गिक प्रतिक्रियेचा संबंध धर्माशी जोडला.या प्रश्नातच धर्मगतिचा संदर्भ उपस्थित झाला.अर्जुन आपल्या निष्क्रियेतेवर धर्माचे शिक्कामोर्तब करतो. म्हणून येथे करावयाच्या कार्यावर धर्माचे शिक्कामोर्तब करणे योग्य कि स्वभावनियत मार्ग जसा चालू आहे व संभ्रमामुळे निश्क्रीय झाला तरी त्याच्या निश्क्रीयतेवर शिक्कामोर्तब करणे हा मुळातील प्रश्न उपस्थित झाला.

श्रीकृष्णाने अर्जुनाचा प्रज्ञावाद निरर्थक ठरविला ,अपराधी ठरविले नाही तर त्याचे अज्ञान दर्शवून दिले.अर्जुनाला युध्द करण्याची बाह्य मंजुरी मिळाली पण आंतरिक नामंजुरी झाली.अर्जुन आपल्या भूमिकेत धार्मिक संदर्भ देतो त्याची जीवन दृष्टी दैवी गुणी (सात्वीक) असली तरी निश्क्रीयतेवर धर्माचे शिक्कामोर्तब केल्यामुळे अज्ञानी ठरला व कार्याला स्वतःची आंतरिक मंजुरी हाच गीतेचा विषय बनला.

**धर्मग्लानी :** कौरवांनी व्यवहारसिध्दीसाठी तत्कालीन धर्मसृतीं (Code of Ethics)चा वापर केला व पांडवाचे शोषण केले तर अर्जुनाला शोक झाला म्हणून कार्य टाळण्यासाठी प्रज्ञावाद वापरला .यासाठी पुरातन धर्मसृतीचा आधार घेतला ही धर्मग्लानीची अवस्था ठरली.समाजव्यवस्थेतील शोषण बाह्यविघ्न व जीवन मार्गातील संभ्रम आंतर्विघ्न ठरते .हीच धर्मग्लानी ठरते.

धर्मग्लानी म्हणजे अधर्माला धर्म(निश्क्रीय भूमिकेला धर्म) व धर्माला अधर्म (स्वधर्म कार्याला अधर्म ठरविले) म्हणणे असा संभ्रम झाल्यामुळे अर्जुनाला स्वयंघोषीत धर्माची गरज होती अर्थात आंतरिक मंजुरीची गरज होती म्हणून श्रीकृष्णाला शाश्वत धर्म सांगावा लागला.त्याद्वारे अर्जुनाने स्वतःमध्ये आध्यात्मिक क्रांती घडवून आणली .हाच संदेश देण्यासाठी विश्वधर्म .विश्वधर्मासाठी अध्यात्मज्ञान याचे प्रयोजन गीतेत केले.शाश्वतधर्माचा जीवनात वापर स्वयंप्रेरणा असते.तो वचक नसतो.निर्भय होण्यासाठीच शाश्वत धर्माचा उपयोग होतो.व जीवनातील चांगलेपणा शाश्वतधर्म

आचरण करण्यास शक्ती ठरत असते.जे कार्य आवश्यक (नियोजीत कार्य) आहे त्या कार्याच्या सिध्दीसाठी मार्ग पक्का करणे व त्यासाठी करावयाच्या कार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करणे हा ज्ञानी व्यक्तीचा स्वयंघोषीत धर्ममार्ग असतो.

**स्वधर्म** :जीवनमार्ग पक्का करून स्वधर्माचे शिक्कामोर्तब करण्यासाठी धर्माचे प्रयोजन असते.जीवनमार्गातील संभ्रमावर शिक्कामोर्तब करण्यासाठी नाही. मनुष्य जगत असतांना त्याला सुख हवे असते जसे योगक्षेमासाठी कार्य करतो तसेच सुखाच्या शोधाचा प्रवास सुरू असतांना धार्मिक व्यक्ती सत् असत् या दोहोमधून सत्चा निर्णय घेतो. सत् जे समाजांच्या दृष्टीने व त्याचे स्वतःचे दृष्टीने धर्माचरण ठरते .हा धर्म सृतिधर्म (Code of Ethics)असतो.सृतिधर्माचे उद्दिष्ट ईश्वरज्ञान ग्रहण करून ज्ञानी होण्यास प्रवृत्त करणारे असते ज्याद्वारा स्वधर्माला आध्यात्मिक दृष्टी मिळते .ज्या ज्ञानाने बुध्दीतील संशय दूर करतो व स्वधर्माचरण करून त्यात ज्ञानाची अनुभूती घेतो. मुक्तीची अनुभूति घेतो .तेव्हा या स्वधर्माला आध्यात्मिक संदर्भ प्राप्त होतो.ईश्वरभक्ती करण्याचे शास्त्र धर्मनिहाय वेगळे असले तरी धर्म आध्यात्मिक विकासाची पायरी ठरते. म्हणून आध्यात्मिक विकासाचे संदर्भात स्वधर्माची धारणा या अर्थाने धर्माची भूमिका ठरते. स्वधर्म जीवनमूल्य ठरते.

### **१.२ धर्म व** शाश्वत धर्म(***Universal Religion***)**भेद**

समुहाचे सृष्टीसंचालनाला व मानवकल्याणाला सहकार्य यावर आधारीत समुहाचे व्यावहारिक व्यवस्थापन व्हावे यासाठी जगात धर्म आलेत.धर्माचा उद्देश समाजात व्यावहारिक समन्वय साधून मनुष्याला त्याचा व्यावहारिक जीवनमार्ग पक्का करण्यासाठी निश्चित नियम उपलब्ध करून देणे ज्याद्वारे कार्यमार्ग पक्का करून निष्ठेने कार्य करण्यास समर्थ होईल .कार्यातील निष्ठेसाठीच ईश्वराशी धर्माला जोडल्या जाते.

मानव जातीच्या विकासासाठी व स्वस्थ समाजजीवनासाठी जीवनमूल्ये आवश्यक असतात जीवनमूल्ये शाश्वत विश्वरचनेचे नियम असतात.ज्याचा अर्थ बदलत नाही ते पारमार्थिक म्हणून जीवनमूल्ये पारमार्थिक अर्थात शाश्वत असतात.ते खरे नाणे असते,ते खपवावे लागत नाही तर स्वत:च प्रमाण असते.स्वत:च त्याचे रक्षण करतो,त्याला कारण लागत नाही व बचावाची(समर्थन) गरज नसते.ते सार्वत्रिक,सामाजिक असते म्हणून जीवनमूल्यांचा उपयोग जीवनमार्गाची धारणा ,समाजव्यवस्थेची धारणा यासाठी होतो. हेच ज्ञान जनसामान्यांपर्यत पोहोचावे म्हणून कला धर्म इत्यादी साधनातून प्रचार प्रसार होतो

मनुष्याच्या ईश्वरावरील श्रद्धेचा उपयोग स्वार्थसिध्दीसाठी करणे यामुळे समाजातील शोषणावर धर्माचे शिक्कामोर्तब होते तसेच जीवनमार्गात संभ्रमामुळे आलेल्या निश्क्रियतेवर धर्माचे शिक्कामोर्तब करतो ही धर्मग्लानीची अवस्था ठरते. जेंव्हा सामाजिक समन्वयाला तडा जातो तेंव्हा समाजात संभ्रम होतो .व्यवहारसिद्धीसाठी धर्माचा उपयोग करून समाजात संभ्रमनिर्माण करणे,जीवनमार्गातील संभ्रमावर धर्माचे शिक्कामोर्तब करणे व समर्थन करण्यासाठी प्रज्ञावादी भूमिका घेणे **हाच** धर्माचा गैरवापर ठरतो.हा गैरवापर टाळण्यासाठी शाश्वतधर्म आहे.धर्म स्थापना म्हणजे विश्वरचनेच्या शाश्वत मूल्यांना धरून पण बदललेल्या काळामध्ये विसंगत व कालबाह्य गोष्टी तशाच

न स्वीकारता त्याला नवीन आकार देऊन नव्या धारणा स्वीकारणे याद्वारे समाजात व्यावहारिक समन्वय प्रस्थापित करणे हीच आध्यात्मिक क्रांती शाश्वत धर्माद्वारे घडवून आणण्याचे शास्त्रच भगवदगीतेद्वारा उपलब्ध झाले.

व्यावहारिक धर्मात सृति असतात म्हणून प्रज्ञावादाला वाव असतो तर विश्वधर्मात शाश्वत जीवनमूल्ये असतात म्हणून स्वामी विवेकानंदानी अमेरिकेतील धर्मपरिषदेत बंधू आणि भगीनींनो हे शब्द उच्चारताच अमेरिका हर्षीत झाली व अध्यात्म ज्ञान विश्वाला जोडणारे जीवनमूल्य आहे याचे रहस्य जगाला उलगडले.स्वामी विवेकानंदाचा संदेश धर्माचे जोखंडात बांधून शोषणाला पुरस्कृत करण्यासाठी नव्हता, तर डबक्याप्रमाणे साचलेले मानवी जीवन प्रवाहित व्हावे यासाठी स्वतःच्या भूमिकेत परिवर्तन करण्यासाठी गीतेतील आध्यात्मिक ज्ञानाची उपयुक्तता जगासमोर प्रकाशमान केली.

**धर्म** : समाजात व्यवहार असतो.जगा आणि जगू द्या हाच सिद्धान्त व्यवहारातील धर्माचा पाया असतो. सुखाने जगणे ही स्वाभाविक प्रेरणा आहे.जेंव्हा स्वतः चांगला सुखाने जगतो परंतु दुसऱ्याला मात्र त्याचा त्रास होतो तो व्यवहार निरोगी ठरत नाही. चोरी न करणे हा धर्म असतो.हा धर्म पाळला नाही तर कायद्याचा वचक असतोच.हा व्यवहारातील धर्म असतो.

तुमचा धर्म कोणता असा प्रश्न झाला तर आपण आपला धर्म सांगतो हा सृतिधर्म (**Religion** )असतो.त्याच धर्मातील कर्मकांडानुसार सण लग्न जन्म मृत्यु यासाठी विधीचे आचरण करतो . धर्मात सृति(Code of Ethics) असतात. अपवाद सोडला तर बहुतेक धर्मात देवता ,स्वर्ग याचा उल्लेख आढळतो. सृतिधर्मातील सृति प्रकृतीनिर्मित शास्त्र असते. धर्मातील आदर्शवादी नियम स्थल काळ पात्र यानुसार परिवर्तनशील असतात.कालपरत्वे धर्माच्या ज्या बाबी विज्ञानाच्या नियमाशी विसंगत ठरतात,त्या काळाबरोबर गळून पडतात व अध्यात्म विज्ञानाबरोबर कायम राहते.शाश्वत धर्मात ज्ञानविज्ञान आहे.अध्यात्म व विज्ञान अर्थात आदर्श व व्यवहार याची जोड व्हावी व सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी मनुष्याला कार्य करताना स्वधर्म देता यावा यासाठी आध्यात्मिक शहाणपणाची गरज असते.

धर्म अनेक आहेत परंतु आध्यात्मिक ज्ञान एकमेव आहे.समाज कसा असावा,साधू कसा ओळखावा,इतरांनी काय करावे हा प्रश्न धर्माचे क्षेत्र असते,तर स्वतः काय करावे ,स्वतः कसे असावे हा प्रश्न अध्यात्माचे क्षेत्र असते.अर्जुन आपल्या निष्क्रीयतेचे समर्थन धर्माचे दाखले देऊन करतो, तो म्हणतो, कुलधर्म जातीधर्म नष्ट होईल व यामुळे वर्णसंकर होईल व धर्म नष्ट करणारा नरकात जातो म्हणून आपले कार्य पापकर्म ठरते हा प्रज्ञावाद खोडून काढतांना श्रीकृष्ण म्हणतात धर्माचे उद्‌दीष्ट स्वर्ग आहे हे तू ऐकले आहेस परंतु स्वर्गाची आंकाक्षा भोगैश्वर्याचीच आसक्ती ठरते व यामुळे संभ्रमच होतो हा संभ्रम दूर करण्यासाठी अध्यात्मज्ञानयुक्त शाश्वत धर्म सांगितला.

**यावानर्थउदपानेसर्वतःसंप्लुतोदके**
**तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः**(गीता २–४६)

अर्थात ईश्वरज्ञानासमोर सृतीची किंमत जशी समुद्रासमोर विहिरीची किंमत असते.कोणत्याही धर्मापेक्षा ईश्वरज्ञान श्रेष्ठ आहे .त्याच्या आश्रयाने राहून कार्याद्वाराच सुख शांती मिळविणे हा श्रेष्ठ मनुष्यधर्म आहे .यामुळे जीवनमार्गावर संपूर्ण विश्वास असतो.

.

**नैते सृती पार्थ जानन योगी मुह्यति कश्चन**

**तस्मात सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन** गीता ८–२७)

अर्थात ईश्वरज्ञानाच्या आश्रयाने युक्त असलेला सृतीमोहापासून मुक्त असतो. बुद्धीयुक्त झाल्याने सृतीद्वारा गढूळ झालेली बुद्धी संशयापासून मुक्त होते व वैचारिक दृष्टी सकारात्मक होते, शब्दाची परिभाषा बदलते. घटनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो.म्हणून तो कार्याच्या सत् व असत् या द्वंद्वापासून मुक्त असतो.

शाश्वत धर्म राजधर्म ठरतो. यात भय नाही, संभ्रम नाही.या ज्ञानाने युक्त असलेला विचलित होत नाही तोच ज्ञानी ठरतो .स्वर्गलाभ हा त्याचा हेतू नसतो.म्हणून सात्वीक धार्मिक असलेल्या व उच्च जीवन जगणाऱ्याला दुबळेपणा शोभत नाही असे सांगून अर्जुनाचा रोग अर्थात अज्ञान दर्शवून दिले .संभ्रम अर्थात द्विधा मनस्थितीचे कारण संशय असते. वैभव किर्ती इत्यादी प्राप्तीसुखाचा संबध कार्याशी असतो याच सुखाची ओळख अर्जुनाला होती म्हणून संशय निर्माण झाला .संशयमुक्ती म्हणजे विश्वासधारणा व विश्वासासाठी ज्ञान हवे होते.श्रीकृष्णाने याचसाठी अध्यात्मज्ञान (ईश्वरज्ञान व प्रकृतीज्ञान)सांगीतले. ज्ञानसाधना(सुख), योगसाधना(शक्ती) या द्वारे सुखी होणे म्हणजे बुध्दीची स्थीरता या (सत)सुखाची ओळख करून दिली.

## १.३ जीवनात ज्ञानविज्ञानाची भूमिका : :

मनुष्याचा जीवनमार्ग प्रकृतीनुसार कार्यरत असतो.प्रकृति कार्य व जीवनमूल्ये याद्वारे बनलेली असते.जीवन मार्गात व्यवस्थापन नीट साधल्या जात नाही. तेव्हा मार्गात संभ्रम असतो. अस्थिर होतो. यामुळे जीवन ज्ञान नसलेला कष्टत असतो.सुखाची उणीव भरून काढण्यासाठी समर्थन करतो .स्वतःला असुरक्षीत जाणणे,तर्कशुद्ध पद्धतीने विचार न करणे,याचा परिणाम आपली बाजूच कशी योग्य आहे,हे पटवून देण्यासाठी केले जाणारे प्रयत्न प्रज्ञावाद असतो. समर्थन करणे ही स्वाभाविक संवय आहे पण व्यवस्थापनातील दोषाचे खापर फोडण्यासाठी इतरांना(जगाला) जबाबदार धरतो.

- मनुष्य जोपर्यत जिवंत असतो तोपर्यत त्याचा भौतिक जगाशी संबंध असतो. जगावर कितीही दोषारोपण केले तरी जगावर फरक पडत नाही यामुळे मात्र फरक पडतो तो स्वतःमध्ये.जग स्वतःला हितावह नाही अशी नकारात्मक भूमिका धारण झालेली असते,तेंव्हा स्वतःच स्वतःचा शत्रू झालेला असतो. अर्थात स्वतःचाच अडथळा स्वतःला होतो.हाच संदर्भ जीवनाचे ज्ञानाला मिळतो. व्यक्ती आणि समाज या दोहोच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणारा दुवा धर्म असतो. बदलत्या

परिस्थितीत धर्माला मर्यादा येते.या मर्यादा व्यक्ती आणि समाज या दोहोच्या विकासात अडथळे निर्माण करतात.म्हणून धर्माच्या मुळ संकल्पनेचा हेतू साध्य होण्यासाठी सुधारणा आवश्यक असते.याच सुधारणेसाठी भगवतगीता महत्वाची भूमिका बजावते.

मनुष्यजीवनाचे रहस्य जाणले तर अशक्य काहीच नाही.आसुरी प्रवृत्तीच्या सक्रीयतेमुळे जग वाईट ठरत नाही तर दैवी प्रवृत्ती असलेल्या लोकांच्या निक्रियतेमुळे जग वाईट ठरते.मनुष्याच्या विचारासंदर्भात हे सत्य लक्षात घेऊनच वर्तमानाला गीतेत महत्व दिले.मरणोत्तर जीवन कसे असावे यासाठी गीतेचे ज्ञान नसून वर्तमानातील मानव जन्माची ओळख व्हावी,जीवनाचे प्रयोजन(Destiny and purpose)जाणावे यासाठी ज्ञान(Know Thyself)आहे.

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम इह विद्यते (गीता ४-३८)**

जगात ज्ञानच सर्वश्रेष्ठ हाच भगवतगीतेचा संदेश आहे .या सर्वश्रेष्ठ ज्ञानाचा योग्य संदेश जगात जाणे हाच भगवतगीतेचा हेतू आहे.चुकीचे संदेश जाणे समाजातील ंभ्रमाचे कारण ठरते.ज्ञानाचा वापर करूनच जीवनात,जगात विकास चालू असतो.ज्ञान प्रकाशाचे कार्य करते.ज्ञानामुळे जागृति(आत्मबोध)होते.ज्ञानामुळे वर्तमानाचा बोध होतो.

जगातील प्रत्येक मनुष्य स्वभावनियत जगतो.प्रत्यक्षात जे घडते तीच प्रकृति असते.स्वतःच्या जीवनात मनुष्य जे योग्य वाटते त्याची संवय करतो.संवय स्वभाव बनतो.स्वभाव प्रकृती बनते प्रकृतिधर्मानुसार प्रत्येकाचा जीवनमार्ग सुरू असतो.प्रकृति कार्य घडवीत असते. याचाच अर्थ प्रत्येक मनुष्य आपल्या संस्कारानुसार जगतो.प्रकृती व प्रकृतीला संचालीत ठेवणारे तत्व हाच अध्यात्मज्ञानाचा आधार आहे.

जीवन जगतांना ज्ञान, सुख,विकास या संदर्भात जशी दृष्टी असते तसे विचार असतात.प्रकृतीचा संबंध सुखाशी तर सुखाचा संबंध बुद्धीशी, व बुद्धीचा ज्ञानाशी संबंध असतो.याप्रमाणे सुखाचा संबंध ज्ञानाशी असतो. विकासाचा संबंध कार्याशी व कार्याचा प्रकृतीशी असतो.

**सर्व कर्म अखिलं पार्थ ज्ञाने परि समाप्यते** ( गीता ४-३३)

अर्थात सर्व कार्याचे ज्ञानात रुपांतर होते.

मनुष्य जीवनात प्रकृतीचे ज्ञानात परिवर्तन यासाठी ज्ञान हाच भगवत्गीतेचा विषय आहे.प्रकृतीचे ज्ञान जाणणे हे विज्ञान ठरते,तर जीवन सुखी करण्यासाठी या विज्ञानाचा उपयोग करणे हे ज्ञान ठरते.हाच भगवत्गीतेतील ज्ञानविज्ञानाचा आधार आहे.

**अध्यात्मज्ञान:**

**स्वभाव अध्यात्म उच्चते**( गीता ८-३)

भगवतगीतेने 'स्वतःला ओळखा 'हे सत्य अध्यात्माच्या व्याख्येतूनस्पष्ट केले. सॉक्रेटीसने 'स्वतःला ओळखा 'या दोन शब्दांद्वारा जीवनाचे रहस्य उघड केले.मनुष्याचे विचार,स्वतःची ओळख व जीवनमार्ग परस्परावलंबी असतात. स्वतःची ओळख झाली तरच स्वतःच्या जीवनाचे प्रयोजन कळते. अध्यात्मज्ञान जीवन विकासातील ज्ञान व विज्ञान यातील भेद स्पष्ट करते. म्हणून व्यक्तीगत जीवन विकासात अध्यात्मज्ञान महत्वाची भूमिका बजावते.

जसे आयुर्विज्ञानात शरीरशास्त्र आहे तसेच भगवतगीतेत जीवनमार्गाचे विज्ञान आहे..प्रकृति(विज्ञान) व ज्ञान यातील भेद व संबंध जाणणे हाच भगवत्गीतेचा विषय आहे.सृष्टी जड व चैतन्य याचा अविष्कार आहे.जड प्रकृती व चैतन्य ज्ञान जाणले तर प्रकृतीचे विज्ञान व चैतन्याचे ज्ञान ज्ञानविज्ञान असते. तम,रज,सत गुण ही प्रकृति व गुणातीत ईश्वरज्ञान असते.ईश्वरज्ञान अव्यक्त शक्ती असते.(अव्यक्त)ईश्वरज्ञान(निर्गुण),अव्यक्त प्रकृति(सगुण)व व्यक्त प्रकृति याप्रमाणे सृष्टीसंचलनचक्र (***Wheel of God-***)प्रवर्तीत असते.

जे शाश्वत तत्व आहे ते अमृत आहे.ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत आहे.सृष्टीचा अध्यक्ष अशी ईश्वराची ओळख श्रीकृष्णाने गीतेत करून दिली.याच ईश्वराचा अंश जीवात्म्यात असतो.प्रकृति(DNA-जनुकातील सत,रज,तम गुण)व आत्मा (ईश्वरज्ञान)अशी जीवात्म्याची ओळख करता येईल.जसे सूर्य व सृष्टी यांचे नाते प्रकाशाचे आहे,ज्यामुळे अंधाराचा नाश होतो,तसेच जीवात्म्यातील (शाश्वत)ईश्वरतत्व यांचे नाते ज्ञानाचे आहे,ज्यामुळे अज्ञानाचा नाश होतो.

## जीवनात ईश्वर ज्ञानाची भूमिका :

**अनित्यं असुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्** (गीता ९–३३)

मनुष्याचे अस्तित्व व विश्वाचे अस्तित्व यांचेतील परस्परसंबंध ईश्वर ज्ञानाने जोडल्या गेला याच संबंधाचे विश्लेषणात्मक व रचनात्मक नाते स्पष्ट केले विश्वास धारण करण्यासाठी व योगसाधना होण्यासाठी कार्याची निष्ठा ईश्वरभक्तीत बदलविणे याचे ज्ञान स्पष्ट केले .अध्यात्मज्ञानात प्रकृतीचे विज्ञान व प्रकृतीला संचालित ठेवणारे शाश्वततत्व यांचा समावेश होतो.**स्वभाव अध्यात्म उच्यते**(८–३)म्हणजे स्वतःला जाणणे. शरीर नश्वर आहे पण त्याला संचालित करणारा चेतन आत्मा व्यक्तीच्या हृदयात विराजमान असून तो शाश्वत ईश्वराचाच अंश आहे. शाश्वत तत्वाला ईश्वर या नावाने ओळखल्या जाते.जे शाश्वत तत्व संपूर्ण सृष्टीला संचालित ठेवते ते परमात्मातत्व संपूर्ण सृष्टीत व्यापलेले आहे व सृष्टी नष्ट झाली तरी ते नष्ट होत नाही.याप्रमाणे गीतेत वर्णीलेले आहे.

**यतःप्रवृत्ती भूतांना येन सर्वम् इद्म ततम् (गीता १८–४६)**

**मया अध्यक्षेण प्रकृति सूयते सचराचरम (गीता ९–१०)**

अर्थात ईश्वर सर्वज्ञ,विश्वाचा आधार अध्यक्षाच्या भूमिकेत संपूर्ण सृष्टीला संचालित ठेवतो . याप्रमाणे अशाश्वत व शाश्वत तत्वाचे संयोगाने सृष्टीचे संचालन सुरु असते .तसेच शरीराचे संचालन सुरू असते.अशाश्वत शरीर म्हणजे क्षेत्र व त्याला जाणणारे शाश्वत तत्व म्हणजे क्षेत्रज्ञ. या क्षेत्र– क्षेत्रज्ञाचे होणारे ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान अर्थात

स्वतःला जाणण्याचे ज्ञान होय.म्हणून अध्यात्मज्ञानाचे उद्दिष्ट स्वतःच्या शाश्वत तत्वाशी नाते जोडणे असते. मनुष्यजीवन प्रकृतिबद्ध(Bound by nature) आहे.ईश्वर या वैश्वीक शक्तीमुळे प्रकृति संचालीत असते..शरीराला क्षेत्र (field of action)म्हटले तर त्याला जाणणारा क्षेत्रज्ञ(knower of the field )शरीरातीलच निवासी असतो.जसा सूर्य संपूर्ण सृष्टीला प्रकाशित करतो सृष्टीचा साक्षी ठरतो.तसा शरीरातील क्षेत्रज्ञ स्वतःचा साक्षी ठरतो. सर्व क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञ (knower of the nature)अर्थात सर्व सृष्टीचा साक्षी वैश्वीक शक्ती (Universal mind) असते. याप्रमाणे शरीर, प्रकृति व वैश्वीक शक्तीचे नाते स्पष्ट होते.जगातील चांगलेपणा, कल्याणप्रद शक्ती ईश्वरज्ञानाचे व्यक्त रूप (विभूति–The fragrances of kingdom of God) आहे. याच वैश्वीक शक्तीची ओळख करणे.या ज्ञानाचा जीवनमार्गात उपयोग करणे व याद्वारा वैश्विक शक्तीशी जीवनाला जोडणे.

**स्वकर्मणा तमभिः अर्च्य सिध्दीं विन्दति मानवः** (गीता१८–४६) अर्थात शरीरधारी व्यक्ती आपल्या स्वभाव नियत कार्याव्दारे समर्पित वृत्तीने याच तत्वाची पूजा करून हे ईश्वर ज्ञान प्राप्त करून घेतो – सिध्द होतो.अर्थात स्वतःच्या शाश्वत स्वरूपाचे ज्ञान होते.मनुष्यजीवनात आध्यात्मिक क्रांती घडून येण्यासाठी अध्यात्मज्ञान याप्रमाणे क्रियाशील होते.

**ज्ञान व अज्ञान भेद :**

ज्ञान या संदर्भात बौद्धिक ज्ञान व अध्यात्मज्ञान यातील भेद संख्यात्मक व गुणात्मक असतो. आध्यात्मिक संदर्भात ज्ञानी हा शब्द आत्मविश्वास, स्थिरता ,सकारात्मक, व्दिधा मनस्थिती नसणे, दुःखाने विचलित न होणे अर्थात खचून न जाण्याची शक्ती ठरते. ज्ञानी ज्ञानाची सतशक्तीची अनुभूती घेतो. याच सुखाचे बुध्दीवर संस्कार असणे म्हणजे बुध्दियुक्त होणे यासाठी कार्याद्वारे ज्ञान ,योग साधना असा सुखाचा जीवनमार्ग चालतो. जीवनमार्गातील कार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करून स्वतःचा स्वतंत्र मार्ग पक्का करतो व ज्ञान साधनेसाठी स्वतःचा मार्ग सज्ज करतो हेच शाश्वतधर्माचे रहस्य आहे.याप्रमाणे भगवतगीतेतील शाश्वतधर्म अध्यात्मज्ञानावर आधारित आहे.

**यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकम् इमं रविः**

**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत**(१३–३३)

अर्थात सूर्यप्रकाशात सृष्टीदर्शन होते. डोळे अंधारातही असतात पण दिसत नाही. सूर्य डोळ्याला क्रियाशील करतो. तसेच ज्ञान बुद्धीला क्रियाशील करते व तशी वैचारिक दृष्टी बनते. परमात्मा तत्त्वाचे ज्ञानाव्दारे संशयरूपी अंधार मिटून बुध्दी ज्ञानयुक्त होते म्हणून ज्ञान प्रकाश ठरतो .

जीवनात व्यवहारातील धर्मगति,स्वतःच्या विकासास कारण असलेली कर्मगति व जीवनाचे प्रयोजन जाणणारी ईश्वरगति जाणली तरच आध्यात्मिक क्रांतीचे प्रयोजन स्पष्ट होते.आध्यात्मिक क्रांतीसाठी शाश्वतधर्माचे प्रयोजन स्पष्ट होते. अर्जुनामध्ये आध्यात्मिक क्रांती घडून आली.जे कार्य अर्जुनाला कष्टप्रद, शोकप्रद वाटत होते, तेच कार्य ईश्वरभक्तीद्वारा योगसाधनेसाठी उपयोगात आणले.

## २.) कर्मगति(गहना कर्मणो गतिः)

### २.१ मनुष्याच्या गुणात्मक अवस्था : (प्रकृतिज्ञान)

**कार्यकौशल्य :** प्रत्येक व्यक्ती आपल्या गुणात्मक अवस्थेनुसार स्वतःला कार्यरत करीत असतो. *गोष्ट – तीन कारागिर मूर्ती घडवीत असतात. एक प्रवासी प्रत्येक कारागिराला सारखाच प्रश्न विचारतो. काय करीत आहेस? पहिला कारागिर म्हणतो पोटांसाठी राबत आहे. दुसरा म्हणतो आम्ही मंदीरघडवित आहो त्यासाठी कष्ट घेत आहो. तिसरा म्हणतो, या दगडात ईश्वर आहे.मी निरूपयोगी दगड तराशत आहो. एक कष्ट, दुःख अनुभवतो, दुसरा अहंकार तर तिसरा ईश्वरभक्ती, नैश्कर्म्य वा मूक्ती अनुभवतो. हेच कार्यकौशल्य ठरते. ही अनुभूतीच प्रत्येकाचे संस्कार व ज्ञान याचा फरक असतो. व्यक्तीपरत्वे कार्यकौशल्याचाच फरक असतो.*

गुणात्मक विकासासाठी कार्यकौशल्याचे महत्व व कार्यकौशल्यासाठी कार्याचे महत्व जाणणे आवश्यक आहे.व्यवसायाला अनुकुल स्वभावप्रकृति असणे हा कार्यकौशल्याचाच भाग असतो. कार्य व गुण या ज्ञानसंस्काराद्वाराच कार्यकौशल्य साध्य होते.गरज, इच्छा कार्य घडण्यास प्रेरणा देते. ईश्वर अध्यक्ष या नात्याने सृष्टीचे संचलन करतो व कर्ता असूनही अकर्ता ठरतो हे स्पष्ट करतांना श्रीकृष्ण गीतेव्दारे म्हणतात, सामान्य लोकांना कार्याचे महत्व कळावे म्हणून विद्वानांनी स्वतः कार्यरत राहून कार्याचाच आदर्श ठेवावा. एखाद्या यशस्वी उद्योगपतीचे अनेक कारखाने सुरू असतात, जेव्हा तो स्वतः काहीच करीत नाही असे लोकांना दिसते, तेंव्हा योजक हे कार्यकौशल्य त्याला साधलेले असते. जसे खेळाडू खेळतात व व्यायाम आपोआप घडतो.तद्वतच जीवनातून व्यायाम घडणे म्हणजे आत्मोन्नती होणे.प्रत्यक्षात कार्य घडणे व त्या कार्यातून शक्तीची, उच्चमूल्यांची, दिव्यत्वाची अनुभूती होणे हेच कार्यकौशल्य असते. हे कार्यकौशल्यच मनुष्याच्या विकासास कारण ठरते. याप्रमाणे जसा कार्यातील भाव तसे कार्यकौशल्य व जसे कार्यकौशल्य तसा भाव हीच गुणात्मक अवस्था असते.या संदर्भात एका गोष्टीचा दाखला देता येतो.

*गोष्ट –एक गुराख्याचा मुलगा वाटेतील काटेरी झाड तोडतांना चाणाक्याला आढळतो. काटा गेल्यामुळे त्याच्या पायातून रक्त वाहत असते. चाणक्य त्याला म्हणतो, तू आधी काटा काढून घे, हे झाड विषारी आहे. तेव्हा तो मुलगा आपल्या वेदनेची पर्वा न करता ते झाड व त्याची पाळेमुळे पूर्णपणे जाळून टाकतो. चाणक्य त्या मुलाला भावी सम्राट म्हणून आपला शिष्य बनवतो. सम्राट चंद्रगुप्त मौर्य म्हणून प्रसिध्दी पावलेला हाच तो मुलगा असतो.*

मनुष्याचे जीवन त्याचे कार्याचा प्रवास असतो.व्यक्तीची उच्च अवस्था व कनिष्ठ अवस्था यातील भेद कार्यकौशल्याचा भेद असतो. एकच कार्य एखाद्याला कष्ट देते तर एखादा त्याच कार्यात प्रचंड शांती अनुभवतो. सर्वांना

जीवनरूपाने वेळ उपलब्ध असते. कुणी राबतात व कष्टी होतात; तर कुणी प्रचंड कार्य करूनही आनंदित असतात. हा संस्काराचा फरक असतो. कार्याद्वारा जीवनाची लढाई प्रत्येक व्यक्ती लढत असतो.पण या लढाईतून तो काय मिळवतो हे त्याच्या गुणात्मक अवस्थेवर अवलंबून असते. कार्यप्रतिभा **(State of Art )व गुण (life Values )** यांच्या द्वारे कार्यकौशल्य साधते व प्रकृती कार्यरत होते.तसा जीवनमार्ग बनतो. जीवन मार्गावर असणारे चार प्रकारचे प्रवासी दिसतात.जी त्याची गुणात्मक अवस्था दर्शवितात.

**गुणात्मक अवस्था**

भौतिक (सामान्य) सुसंस्कृत (उच्च)

-------------------- ---- --------------------

१.परावलंबी २.स्वावलंबी(पुरूषार्थ) ३.सुसंस्कृत ४.आध्यात्मिक(ज्ञानी)

१ कार्याचे अज्ञान २.कार्य करणारा ३. कार्याला स्वधर्म करणारा

४.स्वधर्माचे आध्यात्मिकीकरण

अ.परावलंबी अवस्था : कार्याचे दायित्व न स्विकारता गरजपूर्ती व्हावी ही वृत्ती, ही अज्ञान अवस्था ठरते.

ब.स्वावलंबी किंवा पुरूषार्थ अवस्था : गरजपूर्तीसाठी कार्याचे दायीत्व स्वीकारतो. कार्याला व्यावहारिक मूल्य असते.

क.सुसंस्कृत अवस्था : स्वतःला स्वधर्म देऊन स्वतःच्या विकासाचे दायित्व स्विकारतो. कार्याला सामाजिक वा आदर्श वा धार्मिक मूल्य असते.

ड.आध्यात्मिक अवस्था : स्वतःच्या मार्गाचे संपूर्ण ज्ञान असलेला सुसंस्कृत व्यक्ती. तो ठामपणे मार्गक्रमण करून सुखशांती अनुभवतो. कार्याला आध्यात्मिक मूल्य असते.

वरील चार अवस्था मनुष्याची गुणात्मक स्थिती दर्शविते. स्वतःला स्वावलंबी करून निर्णय अधिकारी होणे व स्वतःला कार्य देणे ही पुरूषार्थ अवस्था, स्वतःला स्वधर्म देऊन स्वातंत्र्याची घोषणा करतो, तो सुसंस्कृत, तर अध्यात्मज्ञानाव्दारा संशय दूर करून व त्याद्वाराच स्वधर्माला आध्यात्मिक दृष्टी देऊन स्वतःला आध्यात्मिक अवस्थेत प्रवेश देतो तो आध्यात्मिक ठरतो.

**कार्यकौशल्यासाठी संस्कारात जीवनमूल्याचा वापर:**

कार्यकौशल्य म्हणजे कार्याला उच्च मूल्यांद्वारा मूल्यवर्धीत करणे. शिल्पकृती एखादी कल्पना प्रकट करते, तर इमारत केवळ अर्थशास्त्रीय तत्त्वांच्या आधारे केलेली रचना ठरते. याप्रमाणेच कुणी आपल्या कार्याला फक्त व्यावहारिक मूल्य म्हणून पाहतो. तर उच्च व्यक्ती स्वतःच्या कार्याचे आध्यात्मिक मूल्य जाणतो.म्हणून आपल्या कार्याला कोण कोणत्या मूल्याने जाणतो यावर त्याची गुणात्मक अवस्था ठरते.

**जीवनमूल्ये** –कार्य व जीवनमूल्ये याद्वारा प्रकृतिविकास होत असतो.अर्थात स्वभाव बनतो.शाश्वत धर्मातील जीवनमूल्ये स्वातंत्र्याच्या संस्कृतिला पोषक असते.स्वतःच्या स्वतंत्र मार्गाचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयोगी ठरतात.मनुष्य जन्मात स्वावलंबी होणे हा प्राथमिक संस्कार ठरतो. स्वावलंबीत असलेला व्यक्ती स्वेच्छेने कार्य स्वीकारतो. कार्याचे व्यवस्थापन करताना सुसंस्कृत व्यक्ती जे योग्य आहे, सत् आहे तो मार्ग स्वीकारतो तेव्हा कार्य स्वधर्म ठरते. त्याचे कार्याला सामाजिक मुल्य प्राप्त होते. जीवनमार्गातील भ्रमाचे विघ्न अध्यात्मज्ञानाने दूर होते, स्वधर्माचरणाद्वारा आध्यात्मिक अवस्थेत येतो.तेव्हा कार्याला आध्यात्मिक मूल्य प्राप्त होते. याप्रमाणे गुणानुसार कार्यातील भाव बदलतो. उच्च अवस्थेत कार्यातून शक्ती संचित होते. म्हणून गुणात्मक परिवर्तनाने उच्च कार्यकौशल्य साध्य होते. हाच जीवन विकासाचा उच्च मार्ग असतो.

### **२.२ ).गुणात्मकअवस्थेची व्दिविभागणी**(आध्यात्मिक क्रांतीचा आधार) :

व्यक्ती श्रेष्ठ की कनिष्ठ हे त्याच्या व्यक्तीमत्वावरून स्पष्ट होते. उच्च व्यक्तीमत्वात कार्यकौशल्य साध्य होते. यामुळे प्रसन्नभाव, विजयी मानसिकता असते व प्रसंगाचे आव्हान पेलण्याची ताकद असते.जगात प्रतिकुल परिस्थितीची कारणे पुढे करीत अपयशाचे समर्थन करणारे आढळतात व प्रतिकुल परिस्थिती असुनही यश संपादन करणारेही आढळतात.म्हणून जगात वरील चार अवस्था जीवनाची सामान्य अवस्था व उच्चत्तम अवस्था या दोन विभागात आढळतात.सामान्य व उच्चत्तम अवस्था या आधारावर भगवत्गीता जीवनाची प्राकृतिक व ज्ञानी पातळी यातील भेद स्पष्ट करते .जीवनाची प्राकृतिक(प्रकृतीवश),व ज्ञानी (आत्मवश)पातळी आध्यात्मिक क्रांतीचा आधार ठरते.

**यद् यद् आचरति श्रेष्ठ: तत् तत् एव इतरो जन:**
**स यत्प्रमाणम कुरूते लोका: तदनुवर्तते.** (गीता ३–२१)

अर्थात सामान्य लोक श्रेष्ठ लोकाचे अनुसरण करतात.श्रेष्ठ व्यक्ती स्वतःच्या बुद्धीचा वापर करतो.म्हणून भगवतगीतेचा विषय मानवाची श्रेष्ठता,बुद्धीचा वापर (ज्ञान)हाच आहे.जर्मन तत्वज्ञ नित्शीने कळपी नीतिमत्ता(जीवनाची सामान्य अवस्था) व स्वामीत्वाची नीतिमत्ता (उच्चत्तम अवस्था )असे भेद केले.स्वामीत्वाची नीतिमत्ता असलेला व्यक्ती जीवनमूल्यांचा निर्माता असतो.त्याचा मार्ग व्दंव्दातीत(चांगले–वाईट)असतो. प्रज्ञावादी प्रवृती कळपी नीतिमत्ता(जीवनाची सामान्य अवस्था) दर्शविते.भगवत्गीतेत प्रज्ञावादाला श्रीकृष्णाने प्रतिवाद केला नाही.जे उच्च जीवनाच्या मार्गावर असतात ,त्यांना दुर्बलता शोभत नाही.असे भाष्य केले.हाच भगवत्गीतेतील ज्ञानाचा आधार आहे.

सामान्य लोकाची  श्रेष्ठ ही संकल्पना भौतिक (श्रीमंती, किर्ती प्राप्त व्यक्ती)असते.ज्यांचेजवळ अधिक पैसा अर्थात श्रीमंत उच्च व ज्यांचे जवळ अल्प पैसा (गरीब) तो कनिष्ठ ही दृष्टी असते.श्रेष्ठ–कनिष्ठ,चांगले –वाईट,योग्य –अयोग्य ही व्दिविभागणी प्रज्ञावादाचा आधार असते.भगवतगीतेत संपूर्ण मानवविकासशास्त्र  व्दिविभागणीत(ज्ञानी–अज्ञानी,बंधन–मोक्ष,सत् –असत् ,प्रकृतीवश –आत्मवश,) आणून सोडलेले आहे.जगात मानव विभागणीचे अनेकविध प्रकार असतील.पण मनुष्यजीवनात कार्याचा निर्णय होण्यासाठी सत् –असत्  ही व्दिविभागणी महत्वाची असते.'चांगले म्हणावे 'ही सुखाची संकल्पना सामान्य जनाची असते.तर उच्च जनाची ' चांगले व्हावे 'ही संकल्पना असते.जो चांगला(सत्)आहे त्याला भय,दुर्बलता शोभत नाही.स्वतःतील चांगलेपणाची जाण त्यांना असते. व असतो मा सत् गमय'असा प्रवास करतो .प्राप्तीसुखासाठी कार्यरत असणे प्राकृतिक पातळी,तर कार्यातून योगसाधना ही ज्ञानी पातळी ठरते.ज्ञानी (श्रेष्ठ)होण्याची जीवनात कास धरणे म्हणजे स्वतःच्या उच्चतम जीवनाचा शिल्पकार स्वतःच होणे असते.

## जीवनाची सामान्य व उच्च(सुसंस्कृत) अवस्था:

### अ) सामान्य (भौतिक) अवस्था :

परावलंबी व पुरूषार्थ अवस्था या विभागात येतात. स्वतःची व्यक्तिगत गरजपूर्ती हेच जीवनाचे उद्दीष्ट्य असते. कार्यप्रतिभा **(state of Art)व गरज (state of want)** या मूळ दोन अंगावरच याचे कार्य अधिष्ठीत असते. भोगैश्वर्यासाठी, योगक्षेमासाठीच हा जन्म आहे.हे या वर्गाचे सोपे तत्वज्ञान असते.  स्वतःला यश मिळाले तर त्याचे दायित्व स्वतःकडे घेतो व अपयश आलेतर परिस्थितीवर, नशिबावर दोष ढकलतो.स्वतःच्या कार्याला फक्त व्यावहारिक मूल्य आहे. असे समजणे म्हणजे गुणात्मक विकासाविषयी अनभिज्ञ असणे, व्यक्ती विकासाचे संदर्भात हेच अज्ञान ठरते.

पुरूषार्थ अवस्थेचे अधिष्ठान भौतिक मुल्य असते. पुरूषार्थ अवस्थेतील व्यक्ती गरजेनुसार कार्याचे उद्दिष्ट्य ठरवतो व स्वतःला कार्य देतो.कार्यज्ञानाचा अभाव किंवा कार्यात कष्ट वाटणे यामुळे कार्याचे उत्तरदायित्व न स्विकारता गरजांचेच चिंतन करून चिंता करणे.गरजपूर्तीसाठी परावलंबी वृत्ती असणे यामुळेच कार्यात कष्ट वाटतात. ही अज्ञान किंवा परावलंबी अवस्था ठरते.पुरुषार्थ अवस्थेत व्यक्ती स्वतःला स्वावलंबीत करतो व स्वतःला कार्यभूमिका देतो.या वर्गावर समाजव्यवस्थेचा तीव्र परिणाम असतो. उपलब्ध व्यवस्थेत कार्य करून गरजपूर्ती करणे ही मानवी वृत्ती असते.म्हणून सर्वांना सक्षम रोजगार मिळेल अशी समाजव्यवस्था या  वर्गातील लोकांना विकासाचा मार्ग देते. म्हणून योग्य समाजव्यवस्था या वर्गाला सुसंस्कृत करण्यास कारणीभूत ठरते.

### ब) उच्चतम (सुसंस्कृत) अवस्था  :

**Do'nt wait for extraordinary opportunities,seize common occasions and make them great.Weak men wait for opportunities;strong men make them.-  Orison Swett Mardon**

सुसंस्कृत अवस्थेचे अधिष्ठान जीवनाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक (उच्च)मूल्य असते. कार्यप्रतिभा **(State ofArt )व (life Values)** गुण या दोन मुळ अंगावर कार्य अधिष्ठित करून स्वतःला स्वधर्म देतो. मनुष्याला कूलधर्म, व्यावसायिक धर्म, समाजधर्म मिळतो म्हणून समुहाप्रति **(Team)** त्याचे कार्य समर्पित असते. **'असतो मा सत् गमय** 'हे त्याचे जीवनज्ञान असते.जे सत आहे त्याचा स्वधर्म म्हणून स्विकार करतो. तो गरजांचा गुलाम होत नाही. भौतिक गरजा त्यांना कमजोर करीत नाही. शरीर हे साधन आहे. म्हणून जगतांना स्वतंत्रता (मुक्त) अनुभवतो. सुख अनुभवतो. कार्यातील अपयश त्याची मानसिक हार ठरत नाही. म्हणून समाजव्यवस्थेने अन्याय जरी केला तरी दुःखी न होता स्वतःचा मार्ग बनवतात.या वर्गाचा समाजव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम असतो.त्यांची प्रेरणा त्यांचे जीवन आंदोलन (**Life Mission**) बनते.यामुळे प्रतिकुल परिस्थितीलाही अनुकूल बनवतात.

समाजव्यवस्थेत न्याय मिळाला नाही. म्हणून प्रस्थापित कार्य सोडून उद्योगपती झालेले लक्ष्मणराव किर्लोस्कर सारखे अनेक उदाहरणे समाजात दिसतात. डॉ. खुराना भारतात नोकरी मिळविण्यास असमर्थ झाले. अमेरिकेत जाऊन संशोधन केले व त्यांना नोबल पारितोषिक मिळाले..फ्लोरिडामध्ये एका शेतकऱ्याने संत्रा लागवडीसाठी जमीन घेतली. तेथे सापाचा सुळसुळाट असल्यामुळे संत्रा लागवड शक्य झाली नाही. पण हताश न होता सापाच्या विषापासून औषध निर्मितीचा कारखाना काढला. पुढे तेथे स्नेक इन्स्टीट्युट बनली. सापाच्या भयामुळे, पहिल्या शेतकऱ्याला निसर्गाचा अन्याय वाटला म्हणून जमीन विकायला काढली तर दुसऱ्याला तीच निसर्गाने दिलेली संधी वाटली.निसर्गाने अन्याय केला तरी ज्यांनी जगाला आपली ओळख करून दिली ते, तसेच जे नवीन मार्ग बनवून जगाला नवीन दृष्टी देतात ते याच अवस्थेतील प्रवासी असतात. मानव जन्मातील ही उच्चत्तम अवस्था ठरत

## २.३)जीवनाची ज्ञानी अवस्था

### जीवनाची स्वाभाविक( प्राकृतिक )व आध्यात्मिक (ज्ञानी)पातळी यातील ज्ञानविज्ञान

जगात नवनवीन शोध लावणारे महान कार्ये करणारे, याचा मार्ग पक्का असतो, यश–अपयश, कीर्ति–अपकीर्ति यांचा संभ्रम त्यांचा मार्ग दुबळा करीत नाही.प्राप्त काळाचे आव्हान स्वीकारण्याच्या मार्गात संभ्रम हाच अडथळा असतो. सत्याला सामोरे जाण्याचे साहस नसेलतर भ्रमातच प्रवास सुरू असतो. संभ्रमामुळे निर्माण झालेला तणाव दूर करण्यासाठी बुद्धिवादाचा आधार घेवून समर्थन करतो तेव्हा ही भूमिका नकारात्मक व दुबळी ठरते.ज्ञानी पातळीवर कार्याद्वारे साधना करतो म्हणून सुख अनुभवतो ( कार्यामध्ये) तर प्राकृतिक पातळीवर कार्यात कष्ट वाटते तेव्हा निष्क्रीयता पसंत करतो व प्रज्ञावादी भूमिका (सुखासाठी) घेतो. म्हणून प्राकृतिक पातळीवरील भूमिकेला भगवद्गीतेत अज्ञान संबोधले आहे.जीवनमार्गाच्या व्यवस्थापनाद्वारे याच अज्ञानाचे निदान करता येते. ज्ञानाचा वापर

करणे शक्य होते.जीवनाची  प्राकृतिक( अज्ञानी ) व ज्ञानी पातळी जीवनाच्या अवस्थेतील भेद स्पष्ट करते,सावध करते व जागृत करते.जीवन मुक्तीचे आंदोलन (Freedom Mission) आहे . या सत्याचे ज्ञान होते.

## अ) ज्ञान–अज्ञान:

भगवद्गीतेत मनुष्याची सुखी व दुःखी अवस्था याचा संबंध ज्ञानी व अज्ञानी अवस्था याचेशी जोडला.याच ज्ञानी भूमिकेची व्याख्या भगवतगीतेत स्पष्ट केली.

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम इह विद्यते** (गीता ४–३८)या संदेशाद्वारे भगवद्गीतेत  ज्ञानाला सर्वोच्च स्थान दिले आहे. जीवनमार्गाचे विज्ञान जाणून विकासासाठी ज्ञानाचा उपयोग करणे ही ज्ञानी भूमिका असते. पर्याय नसला तरी मनुष्य जे स्वतःच्या सुखासाठी योग्य वाटेल तसे जगतच राहतो. पर्याय न दिसल्यामुळे अर्जुनाने स्वतःच्या सुखासाठीच (दुःखान्त) सोयीस्कर मार्ग (निश्क्रीयतेचा) स्वीकारला असतो व आपल्या प्रज्ञावादी भूमिकेला ज्ञानी दर्शवितो.अज्ञानाचे निदान न करता माझी भूमिका योग्यच म्हणून समर्थनासाठी प्रज्ञावादाचा वापर करतो.

**वैज्ञानिक  दृष्टी (अज्ञानाचे निदान)** :प्रश्नाचे निदान करण्यासाठी निश्चीत परिमाणाचे ज्ञान (निदानाचा आधार)आवश्यक असते.अर्जुनाची दुर्बलता दर्शवून देतांना श्रीकृष्ण म्हणतात  अर्जुना तू उच्च आहेस, कनिष्ठांना शोभेल असे निष्क्रीयतेचे समर्थन तुला शोभत नाही.

**अनार्य जुष्ठम् अस्वर्ग्य अकीर्तिकरम्  अर्जुन!**(गीता २–२).

ज्ञानी भूमिकेची महती जाणली  तर जीवन जगतांना वैज्ञानिक दृष्टीचा वापर होतो. कोणत्याही समस्याच्या प्रश्नाचे निदान करणे व वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यास समर्थ होण्यासाठी उपलब्ध ज्ञानाला योग्य आकार देणे, त्याचा वापर करणे ही जीवन जगण्यातील वैज्ञानिक दृष्टी  असते.मनुष्य जीवनात ज्ञानी भुमिका जीवन जगण्याची वैज्ञानिक दृष्टी ठरते ,परंतु प्रश्नाचे निदान न करता समर्थन करणे व त्यासाठी उपलब्ध ज्ञान वापरणे ही प्रज्ञावादी भूमिका असते. अहंकारामुळे जीवनाच्या ज्ञानी व प्रज्ञावादी या भूमिकेतील भेद कळत नाही व प्रज्ञावादी हीच ज्ञानी भूमिका आहे हे दर्शवित असतो .

## ब) बंधन व मोक्ष–मुक्ती ज्ञान ( स्वातंत्र्याचे ज्ञान)–

*The breavest sight in the world is to see a great man struggling against adversity.-**Lucius Anneus Seneca***

मानवाचा जीवन इतिहास हा युद्धाचाच इतिहास असतो. असे चर्चीलने म्हटले होते.युद्ध साहित्यात प्रत्यक्ष लढाई असते.महाभारत धार्मिक साहित्य असले तरी युद्ध साहित्य आहे. भगवत्गीतेतून जीवनाच्या लढाईच्या संदेश आलेला आहे. युद्धसाहित्यातील लढाई चटकन लक्षात येते.कारण शत्रु प्रत्यक्ष समोर असतो तर जीवनाच्या लढाईत शत्रु मानवाच्या मनात असतो. ही लढाई त्याच्या दुर्बल भूमिकेविरूद्ध असते.शारीरिक  व्याधी असली तर  मनुष्याला

एकट्याला त्या व्याधीशी लढावे लागते.समाजात जगताना मनुष्य जीवनाच्या लढाईतील चक्रव्यूहात सापडतो,तेव्हा हा चक्रव्यूह त्याला एकट्यालाच भेदावा लागतो.स्वतःतील चांगलेपणा ही लढाई लढण्यास शक्ती देत असते.जीवनाची दुर्बल व अज्ञानी अवस्था असली तरी अहंकाराचा आश्रय असल्यामुळे स्वतःला ज्ञानी समजूनच प्रज्ञावाद बोलत असतो.वास्तवात ज्ञानी जीवनाची उच्च पातळी असते.म्हणूनच जीवनाच्या ज्ञानी भूमिकेच्या संदर्भात श्रीकृष्णाने दुर्बल–सक्षम भूमिका अशी विभागणी वापरली. सुखाच्या मार्गाचा पर्याय स्वीकारण्यासाठी ज्ञान,हाच गीतेचा विषय ठरतो.

**बंधनाची ओळख (*Know the Barrier*) :**

**जीवनमार्गातील अडथळा: व्दंद्व (संशयात्मा विनश्यति )**

*Never argue with stupid people,they will drag you down to their level and then beat you with experience -Mark Twain*

**गोष्ट–** *पंचतंत्रात एक गोष्ट आहे. एका ब्राह्मणाला बकरी दान मिळते. बकरीला पाठीवर टाकून ब्राह्मण महाशय चालले असतांना तीन चोरांना बकरी पळविण्याची इच्छा होते. ते चोर ठरवतात, आपण ब्रह्महत्या करून पाप करायचे नाही व आपली योजना आखून तिघेजण आपली जागा घेतात. पहिला चोर भेटतो व म्हणतो ब्राह्मण महाशय कोठे निघाले, हा कुत्रा पाठीवर कां घेतला तेव्हा ब्राह्मण संतापतो व म्हणतो मुर्खा बकरीला कुत्रा म्हणतो तेव्हा चोर जोरजोराने हसतो. वाटेत ब्राह्मणाला शंका येते. त्याला ती बकरी कुत्रा असल्याचा किंचीत भास होतो. दूसरा चोर भेटतो म्हणतो ब्राह्मण महाशय गाढवाचे पिल्लू पाठीवर घेऊन कोठे निघाला. तेव्हा ब्राह्मण दचकतो व चोराला म्हणतो अरे ही बकरी आहे. तुला गाढव कशी दिसते. आता मात्र ब्राह्मणाचा संशय दाट होतो. त्याला बकरी कधी कूत्रातर कधी गाढवाचे पिल्लु असल्याचा भास होतो. तेव्हा तिसरा चोर वाटेत साधूच्या रुपातबसलेला असतो व ब्राह्मणालापाहून म्हणतो. ब्राह्मणमहाशय हा ब्रह्मराक्षस तुम्ही पाठीवर कां घेतला. तो कधी कुत्रा, कधी गाढवही होतो. ब्राह्मण महाशय बकरी सोडून धूम ठोकतात. ज्याला एखाद्याकडून कार्यभाग साधायचा आहे तो योग्य मार्गावर असलेल्या व्यक्तिलाही त्याचा व्दंद क्रियाशील करून आपला कार्यभाग साधतो..*

*(२) आपला सल्ला कैकेयी ऐकत नाही हे पाहून मंथरेने तिची मानसिकता भयग्रस्त करून तिला दुबळे केले, या अवस्थेत नकारात्मक मानसिकता बनते. कार्यातील व्दंद क्रियाशील होतो. व्यक्ती बाह्य मतांच्या, सृतिच्या प्रभावाखाली सापडतो. यावेळी मनोवश अवस्था तयार होते.मन विचारात भटकत राहते व विचाराच्या दलदलीत व्यक्ती बुडत जातो.रामायणात श्रीरामाच्या राज्याभिषेक सोहळ्याचा आनंदोत्सव सुरु असतांना मंथरा दासी फाटके वस्त्र परिधान करून व कष्टी चेहरा करून कैकेयीचे लक्ष आपल्याकडे वेधते. कैकेयी तिला दुःखाचे कारण विचारते; मंथरा दुःखाचे कारण सांगते की,माझ्या महाराणीचे विरोधात दशरथ महाराजाने कारस्थान रचले आहे, असे म्हणताच*

*कैकेयी तिला थापड मारते व तिची जागा दाखवून देते.आपला डाव फसला असे लक्षात आल्यावर मंथरेने कथा कहाण्या सांगून कैकेयीला भयभीत केले. तिला असुरक्षित वाटू लागले कैकेयी दुबळी झाली आणि मंथरेला पूर्णपणे वश झाली आता कैकेयीनेच मंथरेला उपाय विचारला, ज्याची मंथरा आतुरतेने वाट पहात होती. मंथरा जिंकली पण या दुर्बलतेमुळे महान पतिव्रता असलेली कैकेयी मात्र स्वार्थी आणि निष्ठूर ठरली. वाईट पणाचे उत्तरदायित्व कैकेयीकडेच गेले.*

मनात भावनाविश्व असते. यामुळेच दिव्य प्रेरणा स्फूरतात, तसेच विकारही असतात. यशाची इच्छा व अपयशाचे भय, सुखाची इच्छा व दुःखाचे भय, कीर्तिची इच्छा, अपकीर्तिचे भय यामुळे कार्यातील राग–द्वेष हे द्वंद्व क्रियाशील होते. यामुळेच मोह प्रभावीत होतो. भ्रम  हा द्वंद्वाचाचपरिणाम असतो.विकारामुळे कार्यातील इच्छाद्वेष हे द्वंद्व क्रियाशील होतात. म्हणून संभ्रम होऊन दुबळी भुमिका होते.आपली दुर्बलता, अज्ञान लपविण्यासाठी आदर्शाचा. सामर्थ्याचा बुरखा चढवतो. सत्शील व्यक्तीलाही हा व्दंदरोग छळतो. हा अदृश्य रोग असतो.जसा पाण्यात गाळ तळात असतो व वरून पाणी स्वच्छ दिसते. खडा टाकल्याबरोबर गाळ वर येतो. तसाच सत्शील व्यक्तिचा हा द्वंद्व मोहामुळे क्रियाशील होतो.

बुद्धीमध्ये संशय पेरल्यामुळे भय निर्माण होते. भय मनुष्याला दुबळे करते. दुर्बलता नकारात्मक विचाराला जन्म देते. जे लोक नकारात्मक विचार करतात, त्यांचे शरीर नकारात्मक गोष्टी स्विकारण्यासाठी ग्रहणशील असते आणि अशा शरीरातच नकारात्मक विचार त्रास देतात, यामुळेच संभ्रम निर्माण होतो. बुद्धी अस्थिर होते.स्वतःचे समाधान होण्यासाठी सरळ मुद्दा डावलून तत्वज्ञान बोलू लागतो. अहंकारामुळे आपले ज्ञानच सत्य आहे. याचे तो प्रदर्शन करतो. पण त्याच्या अशांतीचे ते दर्शन असते. अशांतीमुळे केलेले समर्थन किंवा तुलना हे मनोरंजन ठरते.ज्ञान नव्हे. मनाचा बुद्धीवर ताबा असल्यामुळे ही मनोवश अवस्था ठरते.

**जहि शत्रु महाबाहो, कामरूपम दुरासदम्** (गीता ३–४३)

अर्थात शत्रु हा शब्द कमजोर करणाऱ्या विकाराला म्हटले आहे.

**भोगैश्वर्य प्रसक्तानाम्  तया अपहृत चेतसाम्**
**व्यवसाय आत्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते.** (गीता २–४४)

अर्थात प्राप्ती इच्छा (वैभव, किर्ती, स्वर्ग इ.)बुद्धी  अस्थिर करते .अस्थिर बुद्धीमुळे कार्याचा मार्ग दृढ होत नाही. अस्थिर बुद्धीप्राकृतिक पातळी  दर्शविते.प्राप्तीसुख कार्याच्या प्रेरणा ठरतात म्हणून सुखासाठी व्यावहारिक मार्ग प्राकृतिक पातळीवर चालू असतो. या मार्गात दुःख/संभ्रम येते तेव्हा प्रज्ञावादी भूमिका सुखासाठीच (स्वतःच्या भूमिकेची सफाई देणे) घेतो. परंतु ही भूमिका मनुष्याची प्राकृतिक पातळी (व्यावहारिक) असते. प्रकृतिनुसार जीवन जगणे ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. म्हणून जीवनाची पातळी या संदर्भात प्रज्ञावादी भूमिका जीवनाची प्राकृतिक (व्यावहारिक) पातळीच ठरते.

**क**) मनोवश(**द्वंद्ववश)** व आत्मवश(**द्वंद्वमुक्त) अवस्था :**

जीवन यात्रेत सामान्य (प्राकृतिक) पातळीवर कार्याचा उद्देश इच्छापूर्ती असते ही अर्थाथि किंवा व्यावहारिक पातळी असते.यात योग्य व अयोग्य कार्य (मार्ग) याचा आधार लाभ–नुकसान असते. मनाच्या चंचलतेमुळे इच्छा त्याच्या संयमालाच आव्हान देतात. जेव्हा मार्गातील योग्य अयोग्य हा संभ्रम निर्माण होतो.तो द्वंद्वच बंधन ठरतो. द्वंद्वरूपी वाटमारे जीवन यात्रेतील जीवनमूल्यांना आव्हान देत असतात.त्यामुळे दुबळे करतात . योग्य अयोग्य हा वादच व्यावहारिक असल्यामुळे अहंकाराचा आश्रय असतो. अहंकारामुळे अज्ञान न स्वीकारता स्वतःच्या भूमिकेचे समर्थन करतो. अर्थात प्रज्ञावादी भूमिका घेतो.अहंकारच व्यक्तीला अज्ञानाच्या अंधःकारातून बाहेर पडू देत नाही .

**इच्छा द्वेष समुत्थेन द्वंद्व मोहेन भारत .**

**सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप ॥**(गीता ७–२७)

अर्थात मोहाने प्रभावित होऊन शरीररूपी नाव सृष्टीच्या भवसागरात वहात असते. कधी निष्क्रीय होतो किंवा काहीतरी घडत असते.ही स्थिती प्रकृतीवश अर्थात स्वैर ठरते.जेव्हा मनुष्य दुबळेपणा किंवा बंधन किंवा कष्ट अनुभवत असतो. तेव्हा मनुष्याला त्यापासून मुक्ती हवी असते.अर्थात स्वातंत्र्याची अनुभूती हवी असते. ज्या प्रकृतिचा गुलाम बनवून राबत असतो त्या प्रकृतीवर नियंत्रण होणे हीच स्वातंत्र्याची अनुभूती असते.

**इंद्रियस्य इंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ**

**तयोः न वशमआगच्छेत् तौ हि अस्य परिपन्थिनौ**(गीता ३–३४)

अर्थात राग – व्देष, मान– अपमान, यश–अपयश हे **द्वंद्व** मनुष्याच्या बुद्धीमध्ये संशय प्रवाहीत करून मनुष्याला दुबळा करते व मार्गात घसरण होते. द्वंद्वास वश राहून कार्य घडणे या निष्क्रीय राहणे ही अवस्थाच मनोवश वा प्रकृतिवश ठरते.समुद्रात नाव वाऱ्याने वहात जावी तसा जीवनाचा प्रवास होतो.नाव वाऱ्याने वाहणे व नाव वल्हवणे ,यातील भेदच जीवनाची मनोवश (प्रकृतिवश)व आत्मवश(मुक्त) अवस्था स्पष्ट करते. नाव वल्हवणारा किनारा गाठतो.प्रवाहात वाहण्यास विवश करणारे व्दंव्द जीवन विकासाचे मार्गातील वाटमारे ठरते.जीवनप्रवाहात दुर्बलताच विकासात आव्हान ठरते.

**एषा तू अंतगतं पापं जनाणां पुण्यकर्मणाम**

**ते द्वंद्वमोह निर्मुक्ता भजन्ते माम् दृढव्रताः.(७–२८)**

अर्थात ज्यांनी सत्कार्याच्या आश्रयाने दृढवती राहुन छळणाऱ्या द्वंद्वावर विजय मिळविला ते प्रसन्नता अनुभवतात, मुक्ती अनुभवतात.उपवासाचे व्रत करणाऱ्याचा दृढनिश्चय असतो. तो दृढव्रती असतो, तर अन्न न मिळाल्यामुळे उपाशी असलेला परिस्थितीवश असतो (प्रकृतिवश) घटना एकच असते, एकासाठी उपासना तर दुसऱ्यासाठी विवशता, दुःख असते, गाडगे महाराजांनी धर्मशाळा बांधल्या पण स्वतःच्या उपजिविकेसाठी स्वेच्छेने भिक्षुकी पत्करली. ती स्वेच्छा होती, विवशता नव्हती. स्वेच्छा आणि परिस्थितीची विवशता यात जो फरक

आहे. तोच मुक्ती (स्वातंत्र्य) आणि गुलामी (बंधन) याच्या अनुभूतीत आहे. द्वंद्व विवश करते, दुबळा करते. या द्वंद्वावर मात करून विकासाचे उत्तरदायित्व स्वीकारणे ही स्वतःच्या मुक्तीची घोषणा ठरते.

## ३)ज्ञानी( पातळीबदल ):

अध्यात्मज्ञानात ईश्वराची अध्यक्ष ही ओळख सांगितली. शाश्वत धर्माद्वारे प्रकृती धर्माच्या (व्यवहार) मार्गाला स्वधर्माचे स्वतःच शिक्कामोर्तब करतो व कार्यनिष्ठा दृढ होते.यासाठी वापरलेल्या ईश्वरभक्ती द्वारा योगसाधना करतो.या अवस्थेत ज्ञानाचा वापर करण्यास बुद्धी सक्षम असते.हीच जीवनाची उच्चतम पातळी ठरते.

**मत्कर्मकृत मत्परमो मद्भक्ताः संगवर्जितः**(गीता ११–५५)

अर्थात जीवनाच्या ज्ञानी पातळीवर मनुष्य ईश्वराचेच प्रतिनिधीत्व करून ईश्वराचीच भक्ती साध्य करीत असतो .मार्गक्रमण करतांना बुध्दी दुबळया विचारांपासून,संशयापासून मुक्त असते.

नियतकार्यावर स्वधर्माचे (Tiebreaker) शिक्कामोर्तब करणे यामुळे कार्य ईश्वरभक्ती(Devotion)साठी होते.जो निर्णय होतो तो योगसाधनेसाठी पक्का करणे. हा निर्णय पक्का होण्यासाठीच ईश्वरज्ञानाने बुध्दीला युक्त करणे हा बुध्दियोग असतो.याप्रमाणे बंधन मुक्तीसाठी ज्ञान (Tiebreaker) म्हणजे कार्यमार्ग ज्ञानमार्ग किंवा योगमार्ग करणे याद्वारा मार्ग दृढ होतो.सुखी मार्गासाठी हाच पातळीबदल करावा लागतो.

### अ)पातळी बदल :ज्ञान(विचारबदल रहस्य –*Vision/Mindset*) :

विज्ञानाने पृथ्वीचा गुरूत्वाकर्षण नियम सिध्द केला. आकर्षणाचा नियम युगानयुगे अनेकविध रूपांनी व्यक्त होत आला आहे.हाच नियम ब्रम्हांडाची संपूर्ण व्यवस्था,आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण, प्रत्येक जीवन अनुभव निश्चीत करतो. आकर्षणाचा नियमच आपल्या आयुष्यभरातील सर्व अनुभवांना आकार देत असतो.विचाराच्या माध्यमातून हा सर्वशक्तीमान नियम क्रियाशील होत असतो.

प्रत्येक विचार लहरी ( Vibration )असतात या लहरींना विशीष्ट फ्रेक्वेन्सी असते.आपले विचार जी फ्रेक्वेन्सी निर्माण करतात त्या फ्रेक्वेन्सीशी जुळणाऱ्या समान गोष्टी आकर्षित करतात.मनुष्य त्याच प्रकारचे विचार बोलण्यात व ऐकण्यात रमत असतो.सकारात्मक विचारलहरीचा प्रभाव सकारात्मक असतो तर नकारात्मक विचार लहरीचा प्रभाव नकारात्मक असतो.

मनुष्य **जेंव्हा नकारात्मक** विचार मनात आणतो,त्या विचारात रमतो, तेंव्हा वैश्विक शक्तीच्या चांगल्या सत् शक्तीपासून विभक्त होतो या विभक्तीमुळेच भय असते. भय प्रत्येक नकारात्मक विचाराच्या भावनेचा पाया असतो.याच संदर्भात **संशयात्मा विनश्यति** ( ४–४० )असे नकारात्मक विचाराप्रति भगवद्गीतेत विधान आहे.विचारबदल म्हणजे विचाराची फ्रेक्वेन्सी बदलविणे. यासाठी **ज्ञानसंच्छिन्न संशयम्(**४–४१)हा संदेश गीतेने दिला.

## विचारबदलासाठी (अध्यात्म)ज्ञानाची भूमिका –संशयमुक्तीसाठी ज्ञान :

**You can't live positive life with negative thoughts in mind**

जग हे उर्जेचे साकार रूप आहे व आपण सर्व रचनाकार आहोत म्हणूनच मानवीय क्षमतेला कोणत्याही मर्यादा नाहीत हे रहस्य जाणण्यासाठीच वैश्वीक शक्ती आणि तीचा आपल्या ह्रदयातील अंश हा निकट संबंध जाणून घेणे हेच अध्यात्मज्ञानाचे उद्दीष्ट आहे.संपूर्ण सृष्टीं जड प्रकृती व अव्यक्त प्रकृती ( चैतन्य) याचा संयोग आहे.अव्यक्त प्रकृतितील शाश्वत तत्व ईश्वरज्ञान असते.

**कवीपुराणम अनुशासितारम अणोरणी यांसम अनुस्मरेद्यः** अर्थात वैश्विक शक्ती सर्वज्ञ आहे जी अणू पेक्षाही सुक्ष्म आहे.(गीता ८–९) वैज्ञानिक भाषेत ईश्वरज्ञान ज्ञानविज्ञानाचे उगमस्थान आहे. आकर्षण शक्तीच्या नियमानुसार इलेक्ट्रान एकत्र येऊन अणू बनतात.याच नियमामुळे अणूचे रेणू बनतात व साकार रूप प्रकट होते. म्हणून प्रत्येक प्रकटीकरणा मागील रचनात्मक व्यक्त शक्ती मागे आकर्षणाचा नियम असतो.

मनुष्य जीवंत असतो याचाच अर्थ तो ईश्वर या वैश्विक शक्तीशी जोडलेला असतो.पण याचेच मनुष्याला अज्ञान असते.सृष्टीच्या अनंत काळात मनुष्याचे जीवन अल्प काळासाठी अस्तित्वात असते.शरीराचा प्रवास स्वल्प काळासाठी असला तरी जीवात्म्याचा प्रवास अखंड असतो.यातच अध्यात्माचे रहस्य दडलेले आहे.जेव्हा वैयक्तीक मन वैश्वीक मनाला स्पर्श करते तेंव्हा वैश्वीक मनाच्या सर्व शक्ती मनाला प्राप्त होतात.

## अहंकाराचा आश्रय vs ईश्वरज्ञान :

जीवनातील प्रत्येक क्षण भविष्याची पूर्वस्थिती (Precondition)असते.वर्तमानात दुःखात रमणे या अवस्थेत नकारात्मक विचाराला जन्म देतो व वैश्विक शक्तीपासून स्वतःला विभक्त करतो. विचारलहरी(Vibration) नकारात्मक होतात.नकारात्मक विचारलहरीला वश होणे ही दुर्बलता असते.

प्रकृतीनुसार जीवनाचा प्रवास चालु असतो.मानसिक शक्तीचे (स**कारात्मक** उर्जेचे ज्ञान)अज्ञान असणारा प्रज्ञावादाद्वारे स्वतःला ज्ञानी समजतो तेंव्हा ही अवस्था अज्ञानी ठरते.प्रज्ञावादी भुमिका अहंकाराचा आश्रय असतो .'मी योग्य आहे 'हा प्रज्ञावादाचा आधार असतो .सकारात्मक विचारलहरी प्रवाहीत होण्यासाठी बुध्दी स्थीर करणे.व यासाठीच बुध्दियोगाचे(Connect with God) प्रयोजन आहे. (ईश्वर) ज्ञानामुळे दृष्टीबदल होतो.निसर्गाविषयी सकारात्मक दृष्टी असते.

## ब)पातळी बदल:कर्म (गति बदल)

जीवनातील कार्याचे महत्व या अर्थाने कर्माची गति जाणतो.धर्मात सृति असतात,तर शाश्वत धर्मात गुण (जीवनमूल्ये) महत्वाचे असतात.प्रकृतित कार्य व गुण याचा समावेश असतो.कार्य व गुण कार्यकौशल्य घडवते. गुणानुसार जीवन विकासात प्रकृतिच्या चार अवंस्था बनतात,अवंस्थेनुसार हीच प्रकृति कार्यरत असते.ही अवंस्थाच

कार्याची आवड निर्माण करते. जीवन विकासाचे संदर्भात मनुष्य जीवनात (प्राकृतिक) सामान्य व उच्चत्तम (ज्ञानी) या दोनच पातळी महत्वाच्या उल्लेखनीय ठरतात. कारण ज्ञानी नसेल तर प्राकृतिक असतोच. प्राकृतिक व ज्ञानी या दोन्ही पातळीला जोडणारा धागा सुख असते. दुःख, चिंता, भय बुद्धीला विचलीत करते.दुःखी होणे, नकारात्मक विचारात रमणे ही जीवनाची प्राकृतिक पातळी ठरते.जे अयोग्य आहे ते करण्यासाठी मनुष्यावर बळजोरी करते त्या शत्रुला ज्ञानी जाणतो ,जागृत असतो. जे योग्य आहे,ते करण्यासाठी स्वतःला समर्थ (Precondition of action)करतो. सामान्य पातळीला प्राकृतिक सुख तर उच्च (ज्ञानी) पातळीवर बुद्धीची स्थिरता अर्थात विचलीत न होणे व त्याची (स्थिरता )शक्ती (ईश्वरभक्तीचे सुख) असते .या दोन्ही पातळीवर प्रगतीचे साधन कार्यच असते.मनुष्य जन्मासाठी कार्यच प्रगतीचे साधन ठरते.

**न बुद्धिभेदं जनयेत अज्ञानां कर्मसंगिनाम्**
**जोषयेत सर्वकर्माणि विद्वान युक्तः समाचरन्**(गीता ३-२६).

अर्थात.म्हणून विद्वानजनांनी सामान्यांचा बुद्धीभेद करू नये.ज्ञानी असो वा महात्मा त्याने स्वतः आपल्या मार्गावर राहून कार्याचाच आदर्श जगात ठेऊन लोकांना कार्यरत होण्यास प्रोत्साहन द्यावे हाच साधकांनाही गीतेत संदेश आहे.

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन**
**न अनवाप्तम्अवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि (३-२२)**

अर्थात.मला काहीही मिळवायचे नाही तरी आदर्शासाठी कर्म करतोच मनुष्याला योगक्षेमासाठी कार्याचीच आवश्यकता असते, कार्याचे उत्तरदायीत्व स्वीकारून मनुष्याने अध्यात्मज्ञानाद्वारे स्वतःची उन्नती करावी .

आध्यात्मिक क्रांतीमुळे सकारात्मक, विधायक विचारात रमतो. स्वतःच्या विचाराची दिशा बदलते व जीवनाची पातळी बदलविण्यास (अर्थात ज्ञानी) समर्थ होतो. ज्यामुळे सक्षम होण्यासाठी शक्तीची साधना करतो.व्यवहारात करावयाच्या कार्याद्वारे शक्तीची (योग) साधना करणे व याद्वारे सक्षम होणे ही जीवनाची ज्ञानी अवस्था असते.ज्याप्रमाणे खेळ खेळतो व त्यातून शारिरीक व्यायाम होतो. तशीच कार्याद्वारे मानसिक व्यायाम घडविल्या जाते. दुःखामुळे बुद्धी विचलीत न होणे याला योग संबोधले व हे मानसिक व्यायामाचे उद्दीष्ट आहे.. म्हणून ज्ञानी स्वधर्माचरण, कर्मयोग याचे महत्व जाणून सुखाच्या साधनेसाठी स्वतःला कार्यरत करतो .हेच प्रकृतिचे नियमन असते.

**क)पातळी बदल:भक्ती**

**:धार्मिक अवस्थेतून पातळी बदल** :

मनुष्य त्याला लाभलेल्या संस्कारानुसार जगत असतो.संस्कार स्वभाव बनवते,स्वभाव प्रकृति बनते.संस्कारात धर्माचा प्रभाव असतो. ज्ञानी स्वतःच्या मार्गावर धर्माचे शिक्कामोर्तब करतो.जो कार्य टाळतो , दुबळेपणावर धर्माचे

,आदर्शाचे शिक्कामोर्तब करतो तो अज्ञानी ठरतो.चुकीचे असले तरी तसे जगण्यास जो बळजोरी करीत असतो , तो प्रकृतिदोष ठरतो.हा दोष बुद्धीला अस्थीर करते. म्हणून स्थीर बुद्धी (अविचलीत) साठी कार्याची गती जाणणे, स्वतःचा जीवनमार्ग ठरविण्यासाठी स्वातंत्र्याचे महत्व जाणणे, जीवनमार्ग पक्का करण्यासाठी विश्वासाचे महत्व जाणणे.हे दुःखान्ताचे ज्ञान असलेला स्वतःला सुखी मार्ग देतो म्हणून ज्ञानी ठरतो.ज्ञानी धर्मगति,कर्मगति व ईश्वरगति जाणतो.

मनुष्य जसा स्वतःला ओळखतो तसा ईश्वराला ओळखतो .जसा ईश्वराला ओळखतो तसा भजतो. जगात धार्मिक प्रवृत्तीचे, सत्कार्य करणारे विविध भक्त असतात. धर्मानुसार, प्रकृति गुणानुसार अर्थात गुणात्मक अवस्थेनुसार कार्यरत असतात व ईश्वरभक्ती करतात.यांत आर्त, अर्थाथि, जिज्ञासू व ज्ञानी अशा पातळी ठरतात. जे ईश्वरभक्ती फक्त संकटकाळीच करतात. ते आर्त भक्त, जे कार्याच्या सिध्दीसाठी, योगक्षेमासाठी भक्ती करतात, ते अर्थाथि भक्त परंतु यांत सर्वश्रेष्ठ ज्ञानी भक्त असतो. जिज्ञासू ईश्वरज्ञान जाणून घेतो व त्याला ईश्वराचा भक्त(प्रतिनिधी )म्हणून स्वतःची ओळख होते. प्रतिनिधी म्हणून प्रत्यक्ष कार्यरत असतो. तेव्हा ज्ञानी पातळी ठरते.याप्रमाणे धर्माचे उद्दीष्टच व्यक्तीगत जीवनात आध्यात्मिक ज्ञानी होणे असते.

आध्यात्मिक संदर्भात ज्ञानी हा शब्द स्थिर बुद्धी अर्थात विचलीत न होणे व प्रसन्नचित्त असणे व सकारात्मक वृत्ती या अर्थाने व्यक्त होतो. भक्ती, ध्यान, प्रार्थना याद्वारा बुद्धीवर याच ज्ञानाचे संस्कार होत असतात.हेच ज्ञानाचे संस्कार व्यावहारिक जीवन जगत असतांना बुद्धीवर होत असतात. तेव्हा हा मार्ग उच्च ठरतो.हाच आत्मज्ञान साधनेचा मार्ग आहे. ज्या मार्गावर व्यावहारिक उद्दीष्ट साध्य होत असतानांच दुर्बलतेपासून मुक्त करणारे ज्ञान प्राप्त होते व मार्गावर विश्वास येतो. बुद्धीतून संशयाचा अंधार दूर करण्यासाठी हा ज्ञानप्रकाश ठरतो.ती संपूर्ण मुक्तीची अनुभूती असते.

**धर्मगति ज्ञान :**

**धर्मगति – धरम धुरीन धरम गति जानी,कहेउ मातु सन अति मृदु बानी.**

**पितां दीन्ह मोहि कानन राजू,जहां सब भांति मोर बड काजू**

धर्माचे जाणकार धर्मगति(Rightous act) जाणून नियतकार्य स्वीकारतात.रामायणात कैकेयीला दिलेल्या वचनानुसार श्रीरामाला वनप्रयाणाचा आदेश करणे हे दशरथ महाराजाचे कर्तव्य ठरते.दशरथ महाराज शोकाकुल झाले.श्रीरामाने मात्र धर्मगति जाणून आनंदाने कार्य स्वीकारले .अर्जुनाने युद्धाचे कर्तव्य स्वीकारले पण शोकाकुल झाला.

धर्मातील सृतिची भुमिका स्वतःला स्वधर्म देण्यासाठी साहाय्यकाची असते व स्वधर्म सत्कार्य ठरतो.स्वधर्माचरणातच ईश्वरज्ञानाची अनुभूती होणे हीच आध्यात्मिक अवस्था ठरते.विश्वास व सर्वथा आंतरीक अनुभूती हाच अध्यात्माचा आधार असतो. स्वधर्माचरणाच्या मार्गातील भ्रम दूर करण्यासाठी ईश्वरज्ञान हाच

अध्यात्मज्ञानाचा हेतू असतो..याप्रमाणे अध्यात्मज्ञान सृतीधर्म नसतो,जगण्याचा सिध्दान्त ठरतो. म्हणून ईश्वर श्रद्धा असणाऱ्याला ईश्वरज्ञान जाणणे आवश्यक ठरते.

सामान्य पातळीवर असलेला धार्मिक व्यक्तीही प्राप्तीवादी दृष्टीमुळे अर्थाथि (किर्तीवादी व स्वर्गवादी )असतो. तर तोच व्यक्ती ज्ञानी (उच्च) पातळीवर स्वतःला ईश्वराचा प्रतिनिधी(भक्त) म्हणून जाणू शकतो. प्राप्तीवादी दृष्टीमुळे संभ्रम असतो. तर ईश्वर ज्ञानाशी जोडल्यामुळे विश्वास असतो.मानसिक अवस्था बदलली की दृष्टी बदलते. म्हणून कार्याद्वारे मार्गक्रमण करतांना ईश्वरज्ञानाचा आश्रय करण्यासाठी प्राप्तीवादी दृष्टी (सकाम) बदलून मोक्षाकांक्षी (स्वतंत्र मार्ग व योगासाठी कार्य) दृष्टी करणे हेच परिवर्तन आध्यात्मिक क्रांती ठरते. कबीराला कापड विणण्यातच ईश्वर ज्ञानाची अनुभूती झाली. बहिणाबाईला स्वयंपाक आदी गृहकर्मे करण्यातच ईश्वर अनुभूती झाली. या संतानी सोप्या भाषेत सामान्यांना समजेल व पचेल असे ज्ञान दिले. स्वतःमध्ये आध्यात्मिक क्रांती घडवून आणण्यासाठी हाच आधार ठरतो.

मनुष्य धार्मिक प्रवचन, किर्तन ऐकण्यात रमतो.त्याची ईश्वरावर श्रद्धा असल्याचे ते प्रमाण असते.ईश्वराला या सृष्टीचा अध्यक्ष म्हणून ओळखतो. तेव्हा ईश्वराची रचनात्मक कार्ये त्याचा जगातील प्रभावी व चांगलेपणाचा सुगंध म्हणजेच विभूती जाणत असतो. विभूती सृष्टीच्या व्यवस्थापन कार्यातील प्रभाव असतो.याच विभूतिंच्या माध्यमातून वैश्वीक शक्तीशी जोडल्या जातो.हा बुध्दियोग असतो.यामुळे स्वतःवर विश्वास असतो.स्वतःतील शक्तीची अनुभूती होते,मनुष्याला जीवनाचे प्रयोजन कळते,आपले कार्य स्वधर्माचरणाव्दारा त्याच ईश्वराला समर्पित करून जीवनात ईश्वराच्या अद्भूत शक्तीची अनुभूती होते ,तेव्हा ईश्वराचा प्रतिनिधी (अध्यक्षाचे कार्य करणारा)अशी ओळख स्वतःला देतो . कार्याद्वारा या दिव्य शक्तीची अनुभूती ही उच्च जीवनाची साधना ठरते.

**ईश्वरगति ( जीवनाचे प्रयोजन) :-**

*Life is not easy for any of us.But what of that?We must have preserverance and above all confidence in ourselves.We must believe that we are gifted for something and that must be attained-Marie Curie*

**ईश्वरगति -**

**औरू करै अपराधु कोउ और पाव फल भोगु**

**अति बिचित्र भगवत गति को जग जानै जोगु -रामायण**

ईश्वराने केलेले जीवनाचे प्रयोजन या अर्थाने ईश्वरगति जाणतो.श्रीकृष्ण स्वतःला सृष्टीचा अध्यक्ष या नात्याने ईश्वराचा अवतार म्हणून ओळख देतात.विश्वास येण्यासाठी अर्जुन दर्शनाची व प्रवृत्ती(***Universal mind***-ईश्वरगति.)जाणण्याची इच्छा करतो .श्रीकृष्णाने विश्वरूप दर्शनात नियतिची (काळ-वर्तमानातील प्रवृत्ती-ईश्वरगति.) भूमिका घेतली.ही ईश्वरगति वर्तमानकाळ होता.वर्तमान स्थितीत अर्जुनाच्या कार्याची योजना व फलीत दर्शविले.ही अर्जुनाची नियति (***destiny***)होती.ही नियति **जीवनाचे प्रयोजन** होते.

श्रीकृष्णाने सृष्टीचा स्वामी या नात्याने अव्यक्त ईश्वर सृष्टीचालक व शरीराचा स्वामी या नात्याने अव्यक्त आत्मा अशी शाश्वत चैतन्य शक्तीची ओळख करून दिली.शरीर नश्वर आहे, ही वस्तुस्थिती असली तरी शरीराला संचालित करणारा आत्मा शाश्वत आहे. हाच आत्मा संपूर्ण ब्रह्मांडाला संचालित करणारा ईश्वर याचा अंश आहे.म्हणून ईश्वरच आपल्या हृदयस्थानी वास करीत आहे व सर्वत्र व्यापलेला आहे. ही ज्ञानी पातळीवर(भक्ताची) धारणा असते.हीच आध्यात्मिक श्रद्धा ठरते. या श्रद्धेमुळेच ईश्वरज्ञान विश्वासवृद्धीचे साधन ठरते. बुध्दीत ईश्वरज्ञानाची पेरणी हा बुध्दियोग असतो.बुध्दियोगामुळे जीवनाचे प्रयोजन जाणतो.

जीवनाच्या सामान्य(प्राकृतिक) पातळीवर भोगऐश्वर्याचा लाभ (कर्मफल )याला भाग्य(दैव) मानतात.तर ज्ञानी पातळीवर व्यक्तीगत मन वैश्वीक मनाशी जोडल्या जाते. दैव ,नियति याचे संदर्भ बदलतात.दैव ईश्वराने केलेले जीवनाचे प्रयोजन( कर्म)या अर्थाने आहे.हेच दैव ज्ञानी जाणतो.अर्जुनाची सकारात्मक दृष्टी धारण होणे ,विश्वास येणे हाच त्यामागील उद्देश होता.ईश्वरदर्शनासाठी अर्जुनाला दिव्य दृष्टी दिली.हीच दृष्टी ज्ञानाने जाणणे ही ज्ञानी दृष्टी ठरते.ईश्वराचे विश्वरूप ज्ञानाने जाणण्याचे ज्ञानच भगवतगीतेद्वारा जगासमोर आले. या ज्ञानामुळे निष्काम कार्याची दृष्टी लाभते.म्हणून ईश्वरज्ञानाचा आश्रय करून कार्याद्वारे ईश्वरभक्ती(योगसाधना) करणे या संदेशाचा उद्देश जीवनाचे प्रयोजन कळणे,स्वतःवर,स्वतःच्या प्रेरणेवर विश्वास येणे,कार्याद्वारे योगसाधना होण्यासाठी कार्याचा पक्का मार्ग होणे यासाठी स्पष्ट होतो .अर्थात सेवक या नात्याने स्वतःला ईश्वराचा प्रतिनिधी म्हणून जाणण्यासाठी ज्ञानी भूमिकेच्या धारणेचा उद्देश स्पष्ट होतो.भाग्यचांगले व्हावे यासाठी चांगले होणे याचे महत्व व,ईश्वरज्ञानाचा आश्रय यातील संकल्पना स्पष्ट होते.

**********************

# ( २ )

# जीवनमार्गाचे व्यवस्थापन

१ –**स्वतःची ओळख**

  १.१ **जशी ओळख तसा जीवनमार्ग**

  **१.२ भ्रम आणि वास्तविक्ता**

  **१.३ वास्तविक्तेचा** स्वीकार **व परिवर्तन**

२ –आध्यात्मिक **व्यवस्थापनाचे तत्वज्ञान**

  २.१ जीवन**मार्गाचे** गुणात्मक ज्ञान:

  २..२ व्यवस्थापन कौशल्य

  २..३ व्यवस्थापनातील यज्ञतत्व

**३ आध्यात्मिक व्यवस्थापनाचीप्रक्रिया**

  ३.१ व्यावहारिक कौशल्य

  ३.२ सांस्कृतिक शहाणपण

  ३.३ आध्यात्मिक कौशल्यः

  ३.४ सार:मार्गाचेआध्यात्मिकीकरण.

........................ .....................

## १.)**स्वतःची ओळख** (*Know Thyself*)

***Knowing yourself is the beggining of all wisdom.-Aristotle***

### **१.१).जशी ओळख तसा जीवनमार्ग :**

जसे आपण आपल्याला ओळखतो, तसेच नकळत आपला जीवनमार्ग बनत जातो. आपण काय करू शकतो ही आपली स्वतःची ओळख असते व आपण प्रत्यक्षात काय करतो यावरून जग आपल्याला ओळखत असते.आपणात काय वैशिष्ट्ये आहे हे जाणणे, आपण जे चांगले करू शकू ते इतर कदाचित करू शकणार नाही व इतर जे चांगले करू शकतील ते कदाचित आपण करू शकणार नाही. याच वैशिष्ट्याची जाण असणे व त्याचा विकासासाठी कसा उपयोग करून घेतो हे आपल्या कार्यकौशल्यावर अवलंबून असते.

*गोष्ट– जॉन्सन हा जोडे बनविण्याच्या कारखान्यात साधा कारागीर असतो. कारखान्याला प्रचंड नुकसान आल्यामुळे मालक कारखाना बंद करतो. कामगारावर उपासमारीची पाळी येते. तेव्हा जॉन्सन स्वतः कारखाना चालविण्यास तयार होतो व मालकाला विनंती करतो. त्याला मालक कारखान्याचे सूत्र देतो.जॉन्सन स्वतः कारखाना चालवतो व सहा महिन्यात कारखाना नफ्यात आणतो. मालक त्याला व्यवस्थापकाची बढती देतो.पण जॉन्सन बढती स्वीकारीत नाही, राजीनामा देतो. तो स्वतःचा कारखाना काढतो.जॉन्सन शू–कंपनी*

*जगातील पादत्राण बनविणारी अग्रगण्य कंपनीचा तो मालक बनतो. जॉन्सनला जेव्हा स्वतःची ओळख झाली त्याच क्षणी उद्योगपती होण्याचा निर्णय करतो.*

### अ) जशी स्वतःची ओळख तसे विचार

*गोष्ट–एकदा एका सिंहिणीला अरण्यात फिरतांना कोल्हयाचे पिलू सापडते. आपल्या पिलांबरोबर ती कोल्हयाच्या पिलाचे संगोपन करते. पिले मोठी होतात व अरण्यात बागडत असतात. एकदा या मुलांना हत्ती दिसतो. सिंहीणीची मुले मेजवाणी मिळाली म्हणून आनंदाने उड्या मारतात. तर कोल्हा घाबरतो. तो सिंहिणीच्या मुलांना तेथून पळण्यासाठी उपदेश करतो. सिंहिणीची मुले कोल्ह्याची टर उडवून त्यालाच पळवून लावतात. कोल्हा धापा टाकीत सिंहिणीला वृत्तांत सांगतो.मुलांनी आपले ऐकले नाही, त्यांचे प्राण धोक्यात आहे म्हणून सिंहिणीला चालण्यास सांगतो. हे ऐकून सिंहिण हसते. ती कोल्ह्याला म्हणते. मी तुझे माझ्या मुलांप्रमाणेच संगोपन केले. विद्याही सारखी दिली. परंतु*

***यत् कुले त्वम् उत्पन्नं गजः तत्र न हन्यते*** *अर्थात तू ज्या कुळात जन्मला तेथे हत्ती मारीत नाही.जो प्रसंग माझ्या मुलांसाठी आनंद ठरतो तेच तुझे भय ठरते. म्हणून तू आता निघून जा व तुझ्या स्वभावाप्रमाणे जग.अन्यथा माझी मुले तुला जिवंत ठेवणार नाही..*

अरण्यात उभ्या ठाकलेल्या प्रसंगाचे आव्हान स्वीकारण्यास कोल्हा असमर्थ असतो.त्याचे शहाणपण सिंहाच्या जगण्यातील अडथळा ठरतो.म्हणून त्याला बाहेरची वाट धरावी लागते.कोल्ह्याच्या विचारांचा सिंहाच्या विचारांशी मेळ बसत नाही. प्राण्याच्या जातीनुसार त्यांची स्वभावधारणा असते.कोल्हा त्याच्या प्रकृतिधर्मानुसार योग्यच होता. परंतु सिंहाच्या प्रकृतिधर्मानुसार अयोग्य होता. केवळ विद्या मिळाल्याने कोल्ह्याचे स्वभाव परिवर्तन झाले नाही. ओळख बदलली नाही म्हणून जशी ओळख होती तेच विचार कायम राहिले..प्राण्यांचा प्रकृतिधर्म **(conditioned attitude)**हीच त्याची गुणपातळी असते.तर मनुष्यात गुणपातळीचा विकास होतो. गुणपातळीनुसार(level of lifevalues)स्वभावधारणा बनते. स्वभावधारणेनुसार विचार बनतात.कोल्ह्याचा सिंहाला उपदेश हे कोल्ह्याचे अज्ञान ठरते.

*गोष्ट–एक गरूडाचे पिल्लू कोंबड्यांमध्ये वाढते. एका विशिष्ट प्रकारच्या कोंबडीचे ते पिल्लू असावे असे कोंबड्यांना वाटत असते. एकदा एक गरूडपक्षी आकाशात उंच उडत असतांना दिसते. गरूड पिलू कोंबड्यांना विचारते, ते महाकाय आकाशात काय तरंगत आहे. तेव्हा कोंबडी म्हणते ते महागरूडराज आहे. आकाशात ते उडत आहे. आपण उडू शकतनाही. याच विचारांचा गरूडाचे बुद्धीवर संस्कार होतो.*

गरूड उड्डाण करण्यासाठी जन्माला आला पण जमिनीवरच अडकला. ''**Born to win but conditioned to loose**'' चुकीच्या विचाराने बुद्धी प्रदुषित झाल्यामुळे गरूडाच्या पंखाला जणू पक्षाघातच झालेला असतो व आपली ओळखच विसरतो .

### ब) बुद्धीवरील संस्कार:.

मनुष्याच्या जगण्यातूनच त्याचे व्यक्तीमत्व घडत असते.ज्ञान दृष्टी देते,संवय प्रकृति बनविते.जशी दृष्टी असते तसे दिसते.हीच दृष्टी संवय बनविते.संवय प्रकृति बनते. याप्रमाणे स्वभाव (**conditioned nature** ) बनतो.दृष्टी (ज्ञान) व प्रकृत्ती(संवय)याने बद्ध (**conditioned attitude**) होतो.यालाच आपण संस्कार म्हणून ओळखतो.जर तुम्हाला वाटते तुम्ही जिंकू शकाल तर तुम्ही जिंकू

शकता. पण तुम्हाला वाटते तुम्ही हराल तर तेही बरोबर असते.प्रत्येक व्यक्ती आपापल्या गुणपातळीवर स्वतःला योग्यच जाणतो किंवा समजतो ही प्रकृति (स्वभाव ) असते,ज्ञान नसते.कोंबडीचा गरूडाला उपदेश बुद्धीचे प्रदूषण ठरते.चुकीच्या विचारामुळे बुद्धी प्रदुषित होऊन बलवानही दुबळा ठरतो.निराश व हरलेली मानसिकता हा दुबळेपणा ठरतो.दुर्बल विचाराने संस्कारीत झालेला सबळही आपली ओळख विसरतो .

बुद्धीवर चुकीच्या विचाराचे संस्कार झालेतर जिंकण्यासाठी जन्म झाला पण हरणारा ठरला अशी अवस्था होते.म्हणून बुद्धीचे प्रदूषण दूर करण्यासाठी योग्य ज्ञान व संस्काराची गरज असते. ज्या द्वारा स्वतःची ओळख होण्यास योग्य दृष्टी लाभते.(**Your eyes cannot see! If your mind does not know**)तुमच्या बुद्धीला ज्याचे ज्ञान नाही डोळे असले तरी ते दिसत नाही. जसे ज्ञान तुमच्या बुद्धीला असते तसे दिसते. निरक्षराला एखादे उपयोगी पुस्तके रद्दी कागदच दिसेल.आंधळे हत्ती पाहतात.कुणाला सापासारखा, कुणाला खांबा सारखा, तर कुणाला सुपासारखा हत्ती दिसतो. तुमच्या बुद्धीला जसे ज्ञान तुम्ही पोहोचवता तशी वैचारिक दृष्टी बनते. बुद्धीवर विचाराचे जसे संस्कार असतील तसे व्यक्ति एखाद्या घटनेकडे पाहतो व स्वतःला ओळखत असतो. जशी अनुभूती तशी स्वतःची ओळख होते.ज्ञानाने दृष्टी बदलते,संवय बदलवून प्रकृती सक्षम बनविता येते.

## क ) जीवनमार्ग (*Know Your Lifepath* ):

***The greatesst way to live with honour in this world is to be what we pretend to be.- Socrates***

स्वामी विवेकानंदांना शतकानुशतकाच्या गुलामीमुळे भारतात निष्क्रीयता दिसली, विचारांची मरगळ दिसली. ही वैचारिक मरगळ दूर करण्यासाठी त्यांनी युवकांना जागवले. स्वतःची ओळख करा, तुम्ही भेड–बकरी नाही. ज्या विश्वात तुमची जीवन यात्रा चालू आहे ते विश्व एक व्यायामशाळा आहे . या व्यायामशाळेतील खेळाडू बनून नायक व्हायचे आहे. तुमच्या हृदयात दिव्य परमात्म्याचा वास आहे. भय, संशय, गुलामी व दुबळी मानसिकता अज्ञानामुळे असते. दुर्बलता तुम्हाला शोभत नाही. शिकागोच्या धर्मपरिषदेमध्ये भगवद्गीतेचे उच्च स्थान दर्शवून भारतीय तत्त्वज्ञानाची महानता विशद केली. जगाला भारताची ओळख करून दिली.

**उच्च मानसिकता** :**Courage is the first of human qualities that assures others-- Aristotle**

साहस, निर्भयता हा मनुष्यजीवनाचा सर्वोत्तम गुण ठरतो. यामुळेच इतरांनाही विश्वास वाटतो.उच्च मानसिकता व कनिष्ठ मानसिकता यात मुख्य फरक साहसाचा असतो.उच्च व्यक्ती आपल्या मार्गावर असतांना विचलीत न होता प्रसंगाचे आव्हान स्वीकारतो. जीवनाचे आव्हान स्वीकारण्यास समर्थ असतो. जीवनप्रवासात व्यक्तीपरत्वे हाच भेद असल्यामुळे असे आढळून येते की, विचार अनेकांना स्फूरतात परंतु त्यातील काहीच व्यक्ती विचारांना कृतीमध्ये आणतात.अनेकांची सद्भावना जागृत असते. परंतु फार थोडे भावनेला कार्यामध्ये बदलतात.म्हणून सृष्टीच्या अखंड प्रवाहात वहात राहणे अथवा स्वतःची जगण्याची दिशा ठरवून जगण्याचे आव्हान स्वीकारणे यातील भेद जाणून घेतला तरच मनुष्य आपल्या विकासाचे दायित्व स्वीकारण्यास समर्थ होतो.

**जगण्याचे आव्हान**:

**" Every adversity has the seed of an equivalent or greater benefit."'**

**- W.Clement Stone**

जगात प्रत्यक्षात जे घडत असते तेच सत्य असते. जेव्हा जाग आली तोच सूर्योदय याची जाण असली तर आपल्याच अज्ञानाचे ज्ञान आपणाला होते. व्यक्ती ज्या काळी जिवंत असतो त्या काळाची आव्हाने स्वीकारण्यास समर्थ होणे म्हणजेच जीवन जगण्याचे आव्हान स्वीकारणे ठरते. वर्तमानात प्रश्नांना टाळून जगण्याचा प्रयत्न होतो म्हणून समर्थनाची भूमिका घेणे अथवा प्रश्नाचे निदान करून वर्तमानाचे आव्हान स्वीकारणे हे दोन पर्याय समाजात आढळतात.जगातील अडचणींच्या प्रश्नाचे निदान झाले तर अडचणीच मानवी विकासाला साहायक ठरतात.

जगात महान कार्ये करून आपली ओळख बनविणाऱ्याच्या जीवनाचे अवलोकन केले तर असे दिसेल की जणू अपयशच त्यांना महान कार्यास प्रोत्साहीत करते.अडचणी त्यांना संधी ठरतात.अपंग व्यक्तीही जगात आपली ओळख बनवतो. हेलन केलर अपंग होती.अनाथ मुलांच्या सेवेचे व्रत स्वीकारून नोबल पारितोषिक विजेता ठरली. तिच्या अपंगत्वाने तीचा मार्ग दुबळा केला नाही. मनुष्य जीवनातील अडचणी मनुष्य जीवनाचे आव्हान असते. हे आव्हान स्वीकारण्यासाठी मनुष्याला आपली भूमिका सक्षम करावी लागते.हे सक्षमीकरणच मनुष्य जीवनाचा विकास असतो.

मानवाचे जीवन, त्याचे जीवनातील घटना व त्याचे कार्य याचा प्रवास असतो.या प्रवासातून जो शक्तीची उपासना करतो. तो विकासमार्गावर असतो.जीवनप्रवासाला मर्यादा आहे म्हणून अशाश्वत ठरतो,तर अव्यक्त आत्म्याचा प्रवास शाश्वत असतो हे सत्य जो जाणतो तो या उपासनेतून(योग)च स्वतःचे अव्यक्त स्वरुप (ज्ञान)साकार करीत असतो.हे साकार स्वरुपच त्याची ओळख बनवते.ज्यांना स्वतःचे ज्ञान होते ते शरीराचे गुलाम नसतात स्वामी असतात.म्हणून आत्मवश ठरतात.त्यांची मानसिक वृत्ती स्वामीत्वाची असते,गुलामीची नसते.तेच जगात महान कार्ये करण्यास समर्थ होतात

## १.२) भ्रम आणि वास्तविकता

***What is at issue is the conversion of the mind from the twilight of error to the truth, that climb up into real world which we shall call true philosophy-Plato***

### सुखाच्या संकल्पना व स्वतःची ओळख :

मनुष्य या जगातील अशा प्रवासी आहे की तो ज्या मार्गावर जगतो तो त्याने स्वतः बनविलेला असतो. मनुष्य त्याच्या ज्ञानानुसार जसा स्वतःला ओळखतो तसाच त्याचा मार्ग बनत जातो.स्वतःला जाणण्याच्या त्याच्या ज्ञानाप्रमाणेच त्याची वैचारिक दृष्टी बनते.मनुष्याच्या जीवनप्रवासात त्याची स्वतःची ओळख, त्याच्या सुखाच्या संकल्पना व प्रत्यक्ष जीवनमार्ग परस्परावलंबी असतात.

*गोष्ट– एका व्यक्तीला पाण्यावर चालणारे कुत्रे मिळते. ही गोष्ट जगाला कळावी व आपली स्तुती व्हावी या हेतूने तो व्यक्ती बदकांची शिकार करण्याचा कार्यक्रम ठरवितो. आपल्या चमत्कारिक कुत्र्याला सोबत घेवून एका मित्राला शिकारीसाठी घेवून जातो. बंदुकीने बदक मारून कुत्र्याला बदक आणण्यास पाठवितो. कुत्रे पाण्यावर चालत जावून मारलेले बदक घेवून येतो. संध्याकाळपर्यंत हा कार्यक्रम सुरु असतो.*

*पण त्याचा मित्र कुत्र्याच्या अलौकीकत्त्वाबद्दल काहीच बोलत नाही. तेव्हा तो व्यक्तीच आपल्या मित्राला विचारतो, तुला माझ्या कुत्र्यामध्ये काही विशेष दिसले काय! तेव्हा मित्र म्हणतो, हो आढळले, तुझ्या कुत्र्याला पाण्यात पोहता येत नाही, हे ऐकून त्या व्यक्तीचा भ्रमनिरास होतो.*

जगाने आपल्याला ओळखावे व आपण स्वतःला ओळखणे या भिन्न बाबी आहेत. एक इच्छा ठरते तर दुसरी गरज ठरते. जगाने आपले अलौकीकत्त्व ओळखावे, आपली स्तुती करावी ही इच्छा ठेवणाराचा भ्रमनिरासही होतो. जगाच्या गर्दीत स्वतःचे अलौकीकत्त्व दाखविण्याची त्या व्यक्तिची धडपड व्यर्थ जाते.

**अ)सुखाच्या भ्रामक संकल्पना :** मनुष्याच्या जीवन प्रवासातून त्याला मिळालेल्या संस्कारानुसार त्याच्या सुखाच्या संकल्पना बनतात. या संकल्पना भ्रामक असेलतर भ्रम होतो. सत्य हे सोपे असते.यशाचे माप इतरानी ठरविले असते, तर सुखाचे माप स्वतः ठरवीत असतो.प्राप्त परिस्थितीत जीवनातील, निसर्गातील साध्या साध्या गोष्टीत आनंद घेऊन जगण्याची कला असेलतर प्रसन्न व्यक्तिमत्व असते. बुद्धी सकारात्मक विचाराने संस्कारीत होते.जगाच्या गर्दीत स्वतःचे अस्तित्व शोधण्याची संवय झाली तर तुलना करून जगण्याची संवय जडते. तुलना म्हणजे विचार असतात व विचारानेच स्वतःला सुखी करण्याची ती धडपड असते. या धडपडीत व्यक्ती दुःखीही होतो. पण हे सुख–दुःख भ्रामक ठरते. सापेक्ष असते, सत्य नसते. भ्रामक समाधानाची संवय जडल्यामुळेच चुकीचे विचारही व्यक्तीला प्रभावित करतात व यामुळे स्वतःवरील विश्वास उडतो.

*गोष्ट–एका गावात पिता व पुत्र गाढव विकायला नेतात तेव्हा गाढव रिकामे चालत असते. एक वाटसरू म्हणतो, मुलाला गाढवावर बसवा, साधी गोष्ठी कळत नाही. त्याचा ज्ञानोपदेश ऐकून मुलगा गाढवावर बसतो. पुढे एक वाटसरू म्हणतो. मुलगा स्वार्थी आहे.वृद्ध पिता पायी चालत आहे यांना धर्मही कळत नाही. तेव्हा मुलाला उतरवून पिता गाढवावर बसतो. पुढे पुनः एक वाटसरू म्हणतो, काय स्वार्थी माणूस आहे. बिचाऱ्या मुलाचे कष्ट पाहवत नाही. तेव्हा दोघेही गाढवावर बसतात. पुढे पुनः एक वाटसरू म्हणतो या लोकांना जराही भूतदया नाही. तेव्हा शेवटचा उपाय म्हणून दोघेही गाढवाला खांद्यावर वाहून नेतात. तेव्हा हे पाहून लोकांची करमणूक होते व गर्दी पाठीमागे चालत असते. जेव्हा ही वरात पुलावरून जात असते, तेव्हा गाढव बिथरून नाल्यात पडते व मरते.*

चांगले म्हणावे या नादात स्वतःला मुर्ख म्हणवून घेण्याची पाळी येते.उधार उसने विचार घेऊन आपले जीवन सुखी करण्याच्या प्रयत्नात मनुष्य स्वतःचीच ओळख विसरतो.जगाच्या गर्दीत स्वतःला हरवतो व आपल्याला स्वतंत्र बुद्धी आहे याचाच त्याना विसर पडतो.जगाच्या गर्दीत जे स्वतः हरवत नाही तेच स्वतःला ओळखतात व याचमुळे स्वतःचीही ओळख जगाला करून देतात. मी कोठे आहे ही दृष्टी जगाच्या गर्दीत स्वतःला शोधण्याची असते. तर मी कोण ही दृष्टी असणारे स्वतःला स्वतःच्या अंतर्मनात शोधतात. स्वतःची ओळख असणे हे झाड असते तर जगाने आपल्याला ओळखावे ही इच्छा सावली असते. जसा विचार तशी सावली. पण झाड हेच सत्य असते.

चांगले व्हावे व चांगले म्हणावे यातील भेद प्रत्यक्षात असणे व जगाला दिसणे असा असतो.असणे हे सत्य असते. तर दिसणे हा देखावा किंवा जाहिरात असते.चांगले म्हणावे ही संकल्पना भ्रामक ठरते. म्हणून भ्रम होतो.स्वतःला सामर्थ्यवान किंवा आदर्श भासविण्याच्या इच्छेने समर्थन किंवा तुलना केल्यामुळे अज्ञान दूर होत नाही. मनाच्या समाधानासाठी प्रदर्शित केलेला तो विचार असतो. सामर्थ्याची अनुभूती नसते. आत्मविश्वास, विजयी मानसिकता ही स्वतःच्या ज्ञानाची अनूभूती असते. म्हणूनच भ्रामक विचारामुळे

बुद्धीला प्रदूषित होऊ न देता, स्वतःचे ज्ञान होणे ही गरज बनते.चांगले व्हावे हा विकास असतो.सत् (चांगले )हाच आध्यात्मिक क्रांतीचा(सत् –असत् द्वंदमुक्ती ***Beyond Right-Wrong***) पाया आहे. सत् व्यक्तीला संशय नसतो. यामुळे आत्मविश्वास येतो.

**ब) मनोरंजन व आत्मविश्वास भेद ::**

**Happiness can exist only in acceptance- George Orwell**

*गोष्ट–एका फकीराजवळ सुंदर घोडा असतो. त्या राज्यातील राजा त्याला १० हजार सोन्याच्या मोहरांच्या बदल्यात घोडा मागतो, पण फकीर या सौंदयाचा अस्वीकार करतो, एकदा घोडा जंगलात चरायला गेला असता तो हरवितो. तेव्हा लोक फकिराला म्हणतात, घोडा राजाला दिला असता तर श्रीमंत झाला असता. तुझी चूकी झाली, एखाद्या महिन्यानंतर घोडा सात जंगली घोडे घेऊन परत येतो तेव्हा लोक म्हणतात बरे झाले, आता सातही घोड्यांना प्रशिक्षित करून तुला चांगली प्राप्ती होईल. घोड्यांना प्रशिक्षित करतांना त्याचा मुलगा घोड्यावरून पडतो व लंगडा होतो, तेव्हा लोक म्हणतात वाईट झालं. उगाच तुझ्या घोड्याने जंगली घोडे आणले. थोडा काळ लोटल्यानंतर शेजारचा राजा युद्ध पुकारतो तेव्हा राजा फर्मान काढतो की सर्व तरुणांनी सैन्यात भरती व्हावे. तेव्हा लोक म्हणतात तुझ्या घोड्याने तुझ्या मुलाला युध्दात जाण्यापासून वाचविले आमच्या मुलांना मात्र युद्धात जावे लागले. फकीर लोकांना म्हणतो घोडा जंगलात गेला या एकाच घटनेप्रती तुम्ही चांगले किंवा वाईट असे संबोधून शब्दाचे घोडे नाचवता. ती शाब्दिक प्रतिक्रीया ठरते, घटनेतील सत्य स्वीकारीत नाही.या शाब्दिक प्रतिक्रीया भ्रामक समाधान देते किंवा दुःख देते.म्हणून घटनेतील सत्य स्वीकारणे आवश्यक असते.लोकाची शाब्दिक प्रतिक्रीया केवळ मनोरंजन ठरते.*

एखाद्या घटनेतील सत्य न स्वीकारता आपल्या सोयीनुसार भाष्य करणे किंवा तुलना करणे हे फक्त विचार असतात. शब्दाची कसरत असते. ते कोणत्याही दिशेने फिरविल्या जाऊ शकतात.घटनेतील सत्याचे आव्हान मात्र स्वतःलाच स्वीकारावे लागते. सुखासाठी वापरलेले मनोरंजन व आत्मविश्वास यातील भेद जाणणे आवश्यक असते.समर्थ असणे व समर्थ दिसण्यासाठी समर्थन करणे यात जो भेद आहे तोच भेद ज्ञानाची अनुभूति (आत्मज्ञान) व प्रज्ञावाद (भाष्य )यात असतो अर्थात वास्तविकता व भ्रम यात असतो. कुणी महापुरूष म्हणतो मी लोकांना चंद्र दाखवतो. पण लोक चंद्र न पाहता माझ्या बोटाकडेच पहातात व त्याचे वर्णन करण्यातच धन्यता मानतात. अमूक दिशेने बोट केले तर चंद्र दिसतो. ज्ञानाचा काथ्याकूट करून आपली विद्वता प्रदर्शित करणे हे बोटाकडे पाहणे ठरते चंद्र पाहण्याची (सुख)अनुभूती नसते.भाष्य हेच सुखाचे साधन करतो, मनोरंजन मनाला समाधान देते,ज्ञानाची अनुभूती आत्मविश्वास देते.

मनोरंजन व ज्ञानाची अनुभूती यातील भेद व त्याचा प्रभाव लक्षात घेऊन विजयी मानसिकता, सकारात्मक वृत्ती धारण होण्यासाठी स्वतःच्या वैचारिक प्रवृत्तीत परिवर्तन करणे हाच उपाय असतो.यामुळे वास्तविकतेचा स्वीकार करण्याचे साहस असते.याचसाठी स्वामी विवेकानंदांनी भगवद्गीता,भारतीय तत्वज्ञान इकडे दिशानिर्देश केला.

**ज्ञानाची अनुभूती** :

*गोष्ट–एका कारागिराला स्वतःचे ऑटो वर्कशॉप काढण्याची प्रेरणा होते. दुर्दैवाने त्याचा अपघात होऊन तो पंगू होतो. तेव्हा तो विचार करतो, इतक्या मोठ्या अपघातातून ईश्वराने मला वाचवले याचाच अर्थ माझ्या हातून ऑटोवर्कशॉप निर्माण व्हावे ही ईश्वराची इच्छा आहे. तो कामाला लागतो व ऑटो वर्कशॉपचा मालक बनतो.*

अपघाताच्या घटनेमुळे कारागिराने स्वतःला दुबळे न करता स्वतःला जगण्याची प्रेरणा दिली व स्वतःतील शक्तीची त्याला ओळख झाली. याप्रमाणे स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी सकारात्मक होण्यासाठी कारागिराने स्वतःच्या जीवनाला ईश्वरज्ञानाशी जोडले.,तर या गोष्टीत कारागिर घटनेतील सत्य स्वीकारतो.घटनेप्रति स्वतःची प्रतिक्रीया आत्मविश्वास देते.स्वतःची प्रतिक्रीया स्वयंप्रेरणा(**Autosuggetion**) ठरते.

## १.३)वास्तविकतेचा स्वीकार व परिवर्तन:

***To succeed in life,you need two things; ignorance and confidence.-Mark Twain***

### अ) वास्तविकतेचा स्वीकार

**प्रश्नाची पारदर्शकता –**: महाभारत युद्धात भीष्म द्रोणावर नजर पडल्याबरोबर अर्जुनाचा मोह क्रियाशील झाला .योग्य–अयोग्य या द्वंदाने त्याला वश केले ,म्हणून आपली निष्क्रीयता हीच धर्माची बाजू आहे. असे वाटून समर्थन करतो.धर्मातील सृतीचा वापर आपल्या समर्थनासाठी करतो.श्रीकृष्ण अर्जुनाची उच्च पुरूष म्हणून संभावना करतात व म्हणतात, तू जे आदर्श, धर्म याचे दाखले देऊन स्वतःचे समर्थन केले तो प्रज्ञावाद आहे. ते ज्ञान नव्हे. त्याचा आदर्शवाद खोडून काढतांना म्हणतात निष्क्रीय झाल्याने लोक चांगले म्हणतील (किर्ती)हा तुझा भ्रम आहे. तुला जे सामर्थ्यवान म्हणून ओळखतात ते पळपुट्या म्हणतील व शत्रूही तुझ्या सामर्थ्याची निंदा करतील यामुळे अपकिर्तीच होईल अशी अपकिर्ती तर उच्च व्यक्तीला मृत्यूपेक्षाही भयानक वाटते म्हणून तुझे अपकिर्तीचे भय भ्रामक आहे. अर्थात लोकांनी चांगले म्हणावे ही इच्छा संभ्रम निर्माण करणारी असते.तो घटनेतील सत्य स्वीकारीत नाही.

**अज्ञानाची कबुली** :श्रीकृष्णाने अर्जुनाला दुबळा संबोधून तुला व्दंदनिर्मित मोहाने पछाडले आहे असे सांगून रोग दर्शवून देतात. तेव्हा अर्जुन भ्रमाची कबुली देतो व मला राज्य नको पण मला झालेला शोक नष्ट करण्याचे सामर्थ्य त्रिलोकाचे राज्यातही नाही. म्हणून जे कार्य स्वीकारले ते माझा शोक नष्ट कसा करेल हे मला उलगडत नाही. महाभारताच्या या प्रसंगापूर्वी श्रीकृष्ण हे रहस्यमय ज्ञान केव्हाही सांगू शकले असते. परंतु अर्जुनाला गरज निर्माण झाली,त्याने अज्ञानाची कबुली दिली तेव्हाच ज्ञान सांगण्यात आले.

**मुख्य प्रश्न** :ई.एफ. शूमाकर म्हणतो, मनुष्याचा मुख्य प्रश्न असतो मला काय हवे? भ्रमामुळे या प्रश्नांची पारदर्शकता नष्ट होते.अर्जुनाला शोक होणे,दुःखाच्या भयाने निष्क्रिय राहणे, मनाचा दुबळेपणा ही वास्तविकता होती व आपली कृती आदर्श वाटावी म्हणून केलेले समर्थन हा विचार होता. स्वतःच्या दुःखी मनाला समाधान देण्यासाठी ही शब्दाची कसरत होती. असे समाधान भ्रामक असते.समर्थनासाठी शब्दाची कसरत प्रज्ञावाद ठरतो, विचार ठरतो, हे ज्ञान नसून तो सृतीमोह असतो, स्वतःला झालेला शोक नष्ट कसा होईल हा अर्जुनाला मुख्य प्रश्न असतो. पण या प्रश्नाचे उत्तर तो निष्क्रीयतेत शोधतो व प्रज्ञावादाने या उत्तराचे समर्थन करतो. प्रज्ञावाद स्वप्नरंजन ठरते. या भ्रमातून मुक्तीसाठीच ज्ञानाची गरज असते. मनुष्याचा जीवन प्रवासचअसत्याकडून सत्याकडे, अर्थात भ्रमातून मुक्तीसाठी असतो.म्हणूनजीवन मार्गासाठी योग्य ज्ञानाची गरज असते.ज्याद्वारा अज्ञानाचीच प्रथम जाणीव होते, व प्रश्नाची पारदर्शकता येते व घटनेतील सत्याचे आव्हान स्वीकारण्याची मानसिकता तयार होते.

**ब) मनुष्यजन्माची दुर्बलता:**

वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी सक्षम जीवनमार्ग वर्तमानाची गरज असते.मनुष्याला दिव्य प्रेरणा स्फुरतात. आयुष्यात स्वप्न रंगवतात. हे स्वप्न साकार करण्यासाठी कार्य ठरविणे व कार्यनिष्ठा होण्यासाठी पक्का मार्ग करणे हे व्यावहारिक शहाणपण असते.परंतु कार्याचा निश्चयच न होणे किंवा निश्चय झाला तरी कार्याच्या रणांगणावर आला असता साशंक होणे किंवा कार्य करीत असता हरलेली मानसिकता असणे अर्थात या भूमिकेत कार्याची दृढता नसते व अशांती अनुभवतो. मनुष्याला जे कार्य करायला हवे होते,ते तो करू शकला नाही यासाठी त्याला जबाबदार धरले तर त्याचे पूर्वस्थितीचे(Precondition) अज्ञान कारण ठरते.या पूर्वस्थितीत आंतरिक व बाह्य दडपण बंधन दर्शवते.स्वतंत्र मानसिकतेचा अभाव दर्शवते. कार्याच्या पूर्वस्थितीतील बंधन व मुक्तीचे ज्ञान हाच जीवनमार्गातील ज्ञानअज्ञानाचा विषय आहे.

कोणताही व्यक्ती सीमित काळासाठी या भूतलावर अवतरलेला असतो. जन्म आणि मृत्यू या दरम्यान त्याला उपलब्ध असलेला काळ म्हणजेच त्याचे जीवन असते. काळ हा अनंत आहे.त्याचा प्रवाह सतत वहात असतो. जसजसा काळ पुढे सरकतो, तसतसा मनुष्याचा जीवन काळ कमी होत जातो. योग्य वेळी योग्य निर्णय झाला नाही तर व्यक्ती' जर असे केले असते तर' अर्थात जरतरची भाषा वापरून पश्चाताप करीत असतो.किंवा या स्थितीतही मनाला समाधान देण्यासाठी आपल्या कृतीचे किंवा निष्क्रीयतेचे समर्थन करतो .समर्थनासाठी सृतिव्दारा धर्माचे किंवा आजकाल वापरून समाजव्यवस्थेचे दाखले देतो. यामुळे नकारात्मक व्यक्तिमत्व तयार होते. याप्रमाणे मनुष्य जगण्याचे आव्हान न स्वीकारता सृष्टीच्या कालप्रवाहात वहात असतो. मनुष्यजन्माची हीच नैसर्गिक दुर्बलता ठरते. शेक्सपीयरने हीच दुर्बलता हॅम्लेटच्या माध्यमातून व्यक्त केली आहे. जगायचे की मरायचे असा प्रश्न हॅम्लेटसमोर उभा ठाकतो. यामुळे वाऱ्याने समुद्रात नाव वहात जावी तसा तो प्रवाहात स्वतःला झोकून देतो. याप्रमाणे स्वप्नाचा चुराडा होतो.परंतु वादळाने डळमळीत न होता शरीररूपी नावेला जो वल्हवतो तो किनारा अर्थात ध्येय गाठतो.

जीवन प्रवासात आंतरिक दुर्बलता आली असता तेव्हा भ्रामक समाधानासाठी समर्थनाचा बुरखा वापरून आपले अज्ञानलपवित असतो. तेव्हा त्याची भूमिका नकारात्मक होते.जीवनमार्गातील संशय भ्रम निर्माण करते. भ्रमामुळे बुद्धी अस्थिर होते.व्यक्तिमत्व दुबळे किंवा नकारात्मक होते. बौद्धिक ज्ञानाची कसरत करूनस्वतःला नकारात्मक व चैतन्यहीन ठेवणे ही स्वतःचीच फसवणूक असते. चैतन्यमय व सकारात्मक भूमिका धारण होण्यासाठी बुद्धीव्दारा स्वतःच्या मनातील आंतरिक वृत्तीमध्ये परिवर्तन करून विचार करण्याची दिशा बदलविली तर जीवन जगण्याच्या भुमिकेत परिवर्तन होत असते. ज्ञानी भुमिका वर्तमानात सुखाचा प्रवास करणारे सक्षम व्यक्तिमत्व ठरते.ज्ञानी व्यक्तिमत्वात परिवर्तन होण्यासाठी आध्यात्मिक क्रांती घडवून आणणे शक्य होते.

**क) परिवर्तन**:

*Nothing can stop the man with right mental attitude from achieving his goal; nothing on the earth can help the man with the wrong mental attitude.-Thomas Jefferson*

या जीवसृष्टीत जीवितांमध्ये मनुष्यजन्म श्रेष्ठ आहे. सृष्टीमध्ये जीवीतांचा अखंड प्रवाह सुरू असतो. या अखंड प्रवाहात मनुष्यजन्मच असा आहे की, त्याला स्वतःच्या जगण्याची दिशा ठरविता येते व ज्याला हे रहस्य कळले तोच प्राप्त काळाचे आव्हान

स्वीकारून समाजाला नवीन आयाम देतो प्रत्येक मानवात शक्ती असते. ही शक्ती ओळखणे व त्याचा चांगल्या कार्यासाठी उपयोग करणे हे कौशल्य साध्य झाले तर मनुष्यातील दिव्यत्व प्रक्ट होते. काही व्यक्तिजवळ शक्ती असते, आत्मविश्वास असतो व काही जणाजवळ नसते असे दृष्यमान होते. परंतु वास्तविक्ता ही असते की, काही व्यक्ती परिवर्तन करण्यास तत्पर असतात व काही व्यक्ती नसतात.परिवर्तनासाठीच व्यक्तिमत्वातील ज्ञानी भुमिकेचे रहस्य जाणणे आवश्यक ठरते. हे रहस्य जाणले तरच वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी ज्ञानी (पातळीची,)भुमिकेचे महत्त्व जाणतो.

**गोष्ट–** *प्राचीन काळी एका गावात लोक पहाडावर जाऊन पाणी आणायचे. त्यात चार तास खर्च व्हायचे. एकाला वाटले पहाडावरून कालवा खोदावा म्हणजे खाली पाणी मिळेल व त्रास वाचेल. तो आपले विचार गावातील लोकांसमोर ठेवतो. चाकोरीबद्ध जीवन जगणाऱ्या लोकांना त्याची ही कल्पना मुर्खपणाची वाटते तेव्हा एकटाच कालवा खोदायला सुरूवात करतो. गावांतील लोक त्याला वेडा ठरवतात. तर एखादा शाब्दिक प्रोत्साहन देतो पण प्रत्यक्ष कार्यासाठी सहकार्य करीत नाही. कालवा जेव्हा पूर्ण होतो तेव्हा तेच लोक पाण्यासाठी त्यांच्या समोर भांडे पसरवतात. कालवा निर्माता चाकोरीबद्ध लोकांच्या विचाराने खचला नाही. तो आपली शक्ती स्वतः जाणत होता व आपल्या कृतीतूनच त्याने स्वतःची ओळख लोकांना करून दिली.*

मनुष्याला दिव्य प्रेरणा स्फूरतात, कोणतेही यंत्र वा प्राणी याला हे दिव्यत्व लाभले नसते. मनुष्यातील दिव्यत्वच जगात विकास घडवित असते. जगाला सुंदर बनविते. स्वतःच्या दिव्य प्रेरणा प्रत्यक्षात साकार करणे हे मनुष्य जीवनाचे स्वतःलाच आव्हान असते. सुखासाठी प्राप्ती याचे स्मरण असते. म्हणून प्राप्तीसुखासाठी कार्य ठरते हा प्रकृतिधर्म असतो.या मार्गात दुःखी झाला तर कार्यात संभ्रम होतो. संभ्रमाचे कारण प्राप्तीवादी दृष्टी असते. हीच दृष्टी जीवनाची नैसर्गिक अर्थात सामान्य पातळी असते.

जीवन प्रवासात कार्याचा मार्ग ठरविणे(नियतकार्य) व प्रत्यक्षात मार्ग चालणे याचा मध्य साधण्यासाठी स्वतःची ओळख महत्वाची भूमिका बजावते. प्रत्यक्षात जीवनमार्ग चालत असता मार्गातील संशय बुद्धीला विचलित करते. याचे कारण जीवनाची ही प्राकृतिक(सामान्य ) पातळी असते.या पातळीवर दैवाचा आधार सुखासाठी भोगैश्वर्य प्राप्ती (वैभव, किर्ती, स्वर्ग) असते.योग्य व अयोग्य मार्गाचा आधार भोगैश्वर्यातील द्वंद्व झाले तर द्वंद्व बंधनाचे कारण ठरते.संशयामुळे मनुष्य नकारात्मक विचार करतो. **संशयात्मा विनश्यति** असे गीतेत वचन आहे. म्हणून जीवन मार्गातील विश्वासाचे महत्व जाणून ज्ञानी होणे याचे रहस्य स्पष्ट होते. यासाठी **ज्ञानसंच्छिन्न संशयम्** असे वचन आहे.

## विश्वास (ज्ञानसंच्छिन्न संशयम् )

***Optimism is the faith that leads to achievement.Nothing can be done without hope and confidence.-****Hellen Keller*

*गोष्ट– एकदा चार व्यापारी अरण्यातून जात असता वादळ येते व विजा कडाडतात तेव्हा एका झोपडीचा आश्रय घेतात. झोपडीजवळ एक मशीद असते. एक व्यापारी सांगतो या मशिदीजवळ जो पापी असतो त्याच्यावर वीज पडते. झोपडीत एक बाई आपल्या मुलाला घेऊन वास्तव्य करीत असते. तेव्हा व्यापारी म्हणतो आपल्यापैकी कुणी तरी पापी आहे व जोवर पापी बाहेर निघणार नाही तोवर वीजा कडाडत राहतील. तेव्हा झोपडीतील बाई म्हणते, घाबरू नका. वीजा शांत होईपर्यंत तुम्ही येथेच थांबा. एका पुण्यात्म्यामुळे वीज पडणार नाही व सर्वांचा बचाव होईल व्यापारी मात्र अस्वस्थ असतात.बाईचे काही एक न ऐकता मशिदीला प्रत्येकाने जाऊन हात लाऊन यावे असे ठरवून*

*त्याच बाईला प्रथम हात लावायला पाठवतात, मुलगा सोडून सर्वच जण हात लाऊन येतात. पण वीजा कडाडणे थांबत  नाही तेव्हा मुलगाच पापी असावा असे म्हणून मुलाला झोपडीबाहेर फेकतात. झोपडीतील आई मुलाला घेण्यासाठी झोपडीबाहेर पडते व त्याच क्षणी वीज झोपडीवर पडते व चार ही व्यापारी मरण पावतात. तेव्हा ती बाई म्हणते या मुर्खांना भयामुळे जीव गमवावा लागला.*
बाई पुण्यात्मा होती.म्हणून तिला विश्वास होता. जो सत् आहे त्यास संदेह नसतो, विश्वास असतो.

**विश्वासासाठी ज्ञान :** भगवत्गीतेचा विषयच ज्ञान (शाश्वत ईश्वर) व विज्ञान (प्रकृतिचे ज्ञान) आहे. जग ईश्वर संचालीत आहे.म्हणून प्रकृतीचा अध्यक्ष या नात्याने ईश्वराची ओळख झाली तर बुद्धियोग लाभतो. **तमसो मा ज्योतीर्गमय**अशी जीवनप्रवासाची दृष्टी लाभते.ईश्वरावरील श्रध्दा ईश्वराच्या ज्ञानामुळे विश्वासात रूपांतरित होते.जीवनप्रवासात हा विश्वास अनेक प्रकारे कार्यरत असतो.हाच बुद्धियोग असतो. कार्यनिष्ठा होण्यासाठी याच ईश्वरभक्तीचा वापर केला तर कार्याद्वारेच योगसाधना होते म्हणून ईश्वरभक्तीसाठी करावयाच्या कार्यावर शिक्कामोर्तब करून मार्ग पक्का होतो .हा स्वतःचा स्वतंत्र मार्ग बनतो.जीवनात स्वातंत्र्य अनुभवतो.स्वतःतील दिव्यत्वाची ओळख होते.

अहंकार मनुष्य जीवनातील प्रकृतीचाच घटक आहे व स्वतःच्या अस्तित्वाची इच्छा दर्शवितो. याच अहंकाराचा आश्रय असल्यामुळे जीवनाची नाव भरकटत असते. निष्क्रीय झाला तरी स्वतःची भूमिका ज्ञानी समजून नकारात्मक  होतो. प्रकृतिवश असल्यामुळे ही भूमिका दुबळी ठरते. याच अज्ञानावर मात करण्यासाठी शाश्वत ईश्वराला शरण जाणे म्हणजेच स्वतःचे शाश्वत स्वरुप जाणून जीवनाची नाव वल्हवणे व याद्वारा जीवनप्रवास अमृतप्रवास करणे, हीच निवड स्वतःमध्ये परिवर्तन घडवित असते.प्राप्ती सुखासाठी कार्य (व्यवहार) व कार्याद्वारे योगसाधना स्वतःच्या सुखसाधनेचा मार्ग बनतो.

## २)जीवनविकासातील **व्यवस्थापनाचे तत्वज्ञान**

### २.१ जीवनमार्गाचे गुणात्मक ज्ञान:

**अ) प्रकृतिधर्म :**

**सदृशं  चेष्टते स्वस्या प्रकृते ज्ञानवानअपि** (गीता ३–३३)
अर्थात ज्ञानवान जरी असला  तरी संपूर्ण विश्वात प्रत्येक व्यक्ती आपल्या प्रकृति धर्मानुसारच (स्वभावनियत) कार्यरत असतो. प्रकृति संचलनाचे ज्ञानविज्ञान जाणून प्रकृति सक्षम करणे हेच गुणात्मक ज्ञान ठरते.  मनुष्याचे सहजकार्य त्याचे प्रकृतिधर्मानुसार असते. प्रकृतिधर्म गूण व कार्य या आधारावर विकसित होतो. याच प्रकृतिधर्माचे आधारावर भारतातील मानवसंसाधनाचे वर्गीकरण वर्णाश्रम या सामाजिक धर्मावर अस्तित्वात होते. मात्र वर्तमानात विकासाचे आव्हान  स्वीकारण्यासाठी प्रकृतिधर्माचे रहस्य जाणणे आवश्यक आहे.

*गोष्ट–    नावाड्या आणि विद्वान पंडितांची गोष्ट सर्वश्रृत आहे. तीन पंडित नावेतून जात असतात. प्रवासाची मौज घेत असतांना त्यांचा पांडित्याचा अहंकार जागा होतो.  खगोलशास्त्री असतो. तो नावाड्याला विचारतो, काय रे तूला आकाशातील चंद्र, सूर्य हे ग्रह आणि पृथ्वी यांच्या परस्पर नात्याचे ज्ञान आहे काय? तो नाही असे उत्तर देतो तेव्हा तुझा पाव जन्म फुकट गेला असे पंडित नावाड्याला म्हणतो,*

*दुसरा विज्ञान पंडित असतो, तो विचारातो नाव कां तरंगते याचे तूला ज्ञान आहे काय? तो नाही म्हणतो, तेंव्हा तुझा अर्धा जन्म फुकट गेला म्हणून हिणवतो व तिसरा गणित पंडीत असतो तो गणिताविषयी प्रश्न करतो पण नावाड्याचे नकारार्थी उत्तर ऐकून तू फक्त पोटासाठी राबत आहे. तुझा पाऊण जन्म फुकट गेला अशी मल्लीनाथी करतो.थोड्या वेळाने समुद्रात वादळ येते.नाव किनाऱ्यापासून दूर झालेली असते. तेव्हा नावाड्या पंडितांना विचारतो, तुमच्यापैकी कुणा–कुणाला पोहणे येते तेंव्हा तिघेही नकारार्थि माना डोलावतात. तेव्हा नावाड्या म्हणतो तुम्हा सर्वांचा पूर्ण जन्मच फुकट गेला.*

या गोष्टीचा सार असा आहे की नुसते पुस्तकी पांडित्य जीवन जगण्याचे आव्हान पेलण्यास मनुष्याला समर्थ करीत नाही तर कार्यकौशल्याविणा ते शून्य असते. शिक्षणाद्वारे बौद्धिक ज्ञान मिळते. ते संख्यात्मक ज्ञान असते. म्हणून जीवन जगण्याचे आव्हान स्वीकारण्यासाठी कार्यकौशल्य साध्य करणे हे गुणात्मक ज्ञान ठरते.

**ब) कार्यकौशल्याची धारणा**:

गुणात्मक भिन्नतेमुळेच कार्याबद्दलच्या वैचारिक दृष्टीत व्यक्तीपरत्वे मतभिन्नता आढळते. नाव चालकाला नाव वल्हविण्याचे ज्ञान असते.गणिताचे ज्ञान नाही म्हणून अज्ञानी ठरत नाही. कार्यकौशल्याचे अज्ञान असणारा अज्ञानी ठरतो. कार्यकौशल्य म्हणजे कार्याला विकासाचे साधन बनवून स्वातंत्र्य वा मुक्तीच्या तत्वाचे नियमन करणे.केवळ चाकोरीबद्ध जीवन जगण्यासाठी प्रशिक्षित होणे कार्यकौशल्य नव्हे, पशूनांही योग्य प्रशिक्षित केले तर ते चाकोरीबद्ध कार्य करतात. निर्जीव रोबोटही चाकोरीबद्ध कार्य करतात.ई.एफ. शूमाकर या पाश्चात्य शिक्षणशास्त्रज्ञाने शिक्षणाचे उद्दिष्ट कार्यकौशल्य साध्य करणे असावे. केवळ पुस्तकी शिक्षण हे संख्यात्मक आहे, यामुळे प्रत्यक्ष कार्याचा निश्चय करण्यास हे शिक्षण पुरेसे नाही. म्हणून गुणात्मक शिक्षणाची गरज प्रतिपादन केली. यासाठी (Appropriate Technology Mission)ॲप्रोप्रिएट टेक्नालॉजी मीशन सुरू केले. गुणात्मक ज्ञानासाठी जे कार्य प्रत्यक्ष करू शकेल असे छोटे कार्य करणे. त्याचे नावांप्रमाणे (शूमेकर) जेवढा पाय तेवढा जोडा असे मीशनचे स्वरुप होते.गांधीना हेच दर्शन चरख्यामध्ये झाले. गांधीनी नई तालिम द्वारा हेच गुणात्मक ज्ञान आत्मसात करण्याची गरज प्रतिपादन केली.

कार्य व गुण याद्वारा कार्यकौशल्य साध्य होते .हेच कार्यकौशल्य जीवनमार्ग बनविते.व्यक्तिमधील बौद्धिक क्षमता( **Intellect Quotient**)संख्यात्मक ज्ञान ठरते. कार्य घडण्यास कारण भावनात्मक /मानसिक क्षमता (**Emotional Quotient**),अडचणीला सामोरे जाण्याची क्षमता( **Adverse Quotient),** आध्यत्मिक क्षमता (**Spiritual Quotient** )गुणात्मक ज्ञान ठरते. कार्यकौशल्य साध्य होण्यासाठी हेच गुणात्मक ज्ञान विज्ञान आणि अध्यात्म याचा मेळ घालून आध्यात्मिक व्यवस्थापनाद्वारा साध्य होते. कार्याला अनुक्रमे व्यावहारिक मूल्य, सामाजिक वा आदर्श वा धार्मिक मूल्य, आध्यात्मिक मूल्य प्राप्त करून देतो. याप्रमाणे कार्यकौशल्य कार्याचे मूल्यवर्धन (Value multipication) ठरते.

**२.२) व्यवस्थापन कौशल्य :**

प्रत्येक मनुष्यात व्यवस्थापन कौशल्य असते. विकास साधण्यासाठी निर्णय अधिकार व कार्याची भूमिका याद्वारे आपण स्वतःचा जीवनमार्ग ठरवित असतो. सुखप्राप्तीसाठी मनुष्य स्वतःला कार्यरत करतो याप्रमाणे स्वतःच्या संस्कारानुसार जीवनाचा प्रवास सुरू असतो. या प्रवासात एखाद्याला कष्ट वाटते तर कुणी आनंदी असतो. परंतु त्याचा जीवनप्रवास हा त्याचाच निर्णय ठरत असतो हे सत्य

स्वीकारावे लागते .मनुष्य स्वतःच्या आवडीनुसार व त्याला जे सहजतेने जमते ते कार्य करीत असतो व तो जे करतो तो त्याचा व्यक्तिगत निर्णय असतो. याप्रमाणे नकळत तो जीवनमार्गाचे व्यवस्थापन करीत असतो. हेच त्याचे संस्कार बनत असतात. या प्रमाणे मनुष्याच्या व्यक्तिगत जीवनप्रवासातून सुखी जीवनाच्या संकल्पना बनत असतात या मार्गात सुखप्राप्तीच्या ज्या संकल्पना असतात. त्याप्रमाणे व्यक्ती निर्णय ठरवितो. परंतु त्याच संकल्पनेनुसार परिणामात भय दिसलेतर निर्णय पक्का होत नाही ,संभ्रम होतो.

**नास्ति बुद्धिर्युक्तस्य न च आयुक्तस्य भावना**
**न च अभावयतः शांती, अशांतस्य कुतः सुखम** (गीता २–६६)

अर्थात जीवनविषयक निश्चित संकल्पना व संस्कार असेल तर जीवनात सुख शांती येते. परंतु भ्रामक संकल्पना असेलतर संभ्रम होतो .व मार्ग पक्का होत नाही.

**कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन**
**इंद्रियार्थान विमूढात्मा मिथ्याचार सः उच्चते.**(गीता ३–६)

अर्थात मनुष्याला इच्छा असल्यामुळे कार्य घडतेच.कुणी इच्छेचे गुलाम होऊन राबत असतात त्यांच्यासाठी कार्य कष्टदायी ठरते. कार्य टाळले तरी इच्छेचे गुलाम असल्यामुळे ढोंगी ठरतात.व्यवस्थापनात दुर्बलता आलीतर मार्गात संभ्रम होतो व विद्वान व्यक्तीही आपल्या नियत मार्गावरून घसरतो . जेव्हा जीवनप्रवास जमत नाही व प्रवासात दुःख वाटते, संभ्रम होतो तेव्हा प्रज्ञावादाद्वारे स्वतःला सुखी करण्याचा प्रयत्न करतो; तेव्हा स्वतःची भूमिका जगासाठी प्रेक्षक असूनही स्वतःला ज्ञानी समजतो. प्रत्यक्षात त्याचा जीवनप्रवास प्राकृतिक असतो व त्याची अवस्था अज्ञानी ठरते.

**यःतू इंद्रियाणि मनसा नियम्य आरभते अर्जुन,**
**कर्मेन्द्रियै कर्मयोगम् असक्तः स विशिष्यते**(गीता ३–७)

अर्थात कार्य ठरवीत असतांना किंवा कार्य करीत असतांना मार्गरोधक द्वंद्वाला नष्ट करावे . दुर्बलता दूर होण्यासाठी शक्तीची अनुभूती व्हावी अर्थात ज्ञानाची अनुभूती व्हावी म्हणून कार्याचे उद्दीष्ट ठरविणे कार्याला स्वधर्माचे, योगाचे साधन करून विकासामार्गावर असणे हे शहाणपण ठरते. सुसंस्कृतपणा ठरतो. ज्यामुळे मनावर नियंत्रण ठेवून मनुष्य सुख, आनंद अनुभवतो. याप्रमाणे कार्यकौशल्य साध्य करणे म्हणजेच कार्याला विकासाचे साधन, सुखाचे साधन करणे आवश्यक असते.

कार्याचे व्यवस्थापन आध्यात्मिक व्यवस्थापनात परिवर्तीत करण्याच्या प्रक्रियेत निर्णय कर्मयोगात व कार्यभूमिका (सहजकार्य) स्वधर्मात परिवर्तीत होते. याप्रमाणे विज्ञान व अध्यात्म याचा संयोग करून आध्यात्मिक व्यवस्थापनाचा उच्च मार्ग ठरविता येतो. यामुळे जीवन प्रवासातील व्यवहार मार्ग योगमार्गात बदलतो. हाच मुक्तीचा मार्ग ठरतो. आध्यात्मिक व्यवस्थापनाद्वारे ध्येय साध्य करीत असतांना मार्गातील संशयरूपी अवरोध दूर करणाऱ्या योगमार्गावर येण्यास संधी मिळते व अपेक्षित ध्येयच अंतिम उद्दीष्ट न राहता त्या ध्येयाचे पलीकडे व्यक्तीचा प्रवास सुरू राहतो.जीवनप्रवास अमृतप्रवास ठरतो.म्हणून जीवनमार्गातील कार्याचे आध्यात्मिकीकरण करून योगमार्ग ठरविणे सुखी जीवनमार्गाची निवड असते.अमृतप्रवास करणे स्वतंत्र मार्गाची निवड ठरते. हे सुखी जीवनमार्गाचे रहस्य आहे. जीवनाचे

व्यवस्थापनात  अध्यात्मज्ञानाचा वापर केल्यामुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्व, करीत असलेले किंवा करावयाचे कार्य तो ज्या समाजात राहतो तो समाज यावर सकारात्मक परिणाम होतो. व्यक्तिमत्व धारण होते. कार्याद्वारा शक्ती संचिती अर्थात ज्ञान अनुभूती होण्याचे कार्यकौशल्य साध्य होते. समाजात त्याची भूमिका नायकाची असते. प्रेक्षकाची नसते. म्हणून योजक ठरतो. यामुळे त्याचा समाजावर सकारात्मक परिणाम होतो. समाजाच्या प्रवाहाला नवीन आयाम मिळत जातो.

## २.३) व्यवस्थापनातील यज्ञतत्व(Trnsformation ) :

व्यवस्थापन **प्रक्रियेला यज्ञाचे रूपक दिलेले आहे.**

**श्रोत्र आदीनी इंद्रियाणी अन्ये संयमाग्निषु जुह्वति ।**

**शब्द आदीन  विषयान अन्ये इंद्रियाग्निषु जुह्वति॥(**गीता ४–२६**)**

**सर्वाणि इंद्रिय कर्माणि प्राणकर्माणि चापरे ।**

**आत्मसंयम योगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥**(गीता ४–२७)

अर्थात ज्याप्रमाणे यज्ञात प्रदीप्त झालेल्या अग्नित भस्मीकरण करून उद्दीष्ट साध्य होते. तसेच इंद्रियाचे विषय(भावना, इच्छा) कार्याद्वारा इन्द्रियाग्निमध्ये भस्म होतात. इंद्रियाद्वारा झालेले कार्य स्वधर्माद्वारा आत्मज्ञानाने प्रज्वलीत झालेल्या योगाग्निमध्ये भस्म होते.
(**सर्व कर्म अखिल   पार्थ ज्ञाने परि समाप्यते**(गीता ४–३३) अर्थात  सर्व कार्याचे ज्ञानात रूपांतर होते.

मनुष्य जीवन अशाश्वत आहे.निसर्गातील वस्तूंची, मनुष्याची अशाश्वत स्थिती दुःखी करते.(आसक्ती), मनुष्याला सुख हवे, प्रसन्नता हवी.म्हणूनच दुःखापासून मुक्ती हवी. मला काय हवे याद्वारे तो इच्छा व्यक्त करतो.इच्छा पूर्तीसाठीच त्याला कार्याचे ज्ञान हवे. कार्याचे ज्ञान, कार्यातील कुशलता त्याच्या विकासास कारण ठरते. व्यावहारिक शहाणपण संख्यात्मक (**Trnsformation of acadamic knowledge into action**) ज्ञानाला कार्यात बदलते. कार्याला स्वधर्माचे साधन करणे, योगाचे साधन करणे. (**Transformation of action into yoga**) ही कार्यकुशलता ठरते. जी गुणात्मक ज्ञानामुळे  साधल्या जाते. ज्याद्वारा मनुष्य स्वतःला दुःखापासून मुक्त करून जगण्यात सुख अनुभवतो व हे कौशल्य साधले तर वैभव, कीर्ति, शक्ती व नीती साधल्या जाते.

ईश्वरज्ञानामुळे कोणताही संशय नष्ट होऊन संपूर्ण विश्वासाने व श्रद्धेने निश्चितपणे मार्गक्रमण होते. हाच आध्यात्मिक मार्गावरील प्रवास ठरतो. या मार्गात ईश्वर समर्पण असते म्हणून संपूर्ण कार्य व त्याची सिद्धी याचे दायित्व ईश्वराकडे सोपवून स्वतःचा स्वधर्म किंवा कर्मयोग हे आध्यात्मिक दालनात प्रवेश करण्याचे साधन ठरतात. हा प्रवास स्वतःला एकट्यालाच करावा लागतो. स्वधर्म किंवा कर्मयोगाने ते अध्यात्मिकीकरण ठरते. अर्थात स्वतःचे कार्याला अध्यात्मिक मूल्य प्राप्त करून देतो. याप्रमाणे गुणात्मक विकासात व्यावहारिक शहाणपण (कार्याला साधन करणे) सांस्कृतिक शहाणपण (स्वधर्म हे साधन) व आध्यात्मिक शहाणपण (कार्याचे आध्यत्मिकीकरण) असे टप्पे ठरतात. म्हणून अध्यात्मज्ञान हे गुणात्मक ज्ञान ठरते. ज्याव्दारा बौद्धिक संपदेचे कार्यात रूपान्तर, कार्याचे स्वधर्मात व स्वधर्माचे अध्यात्माद्वारा ईश्वरज्ञानात रूपान्तर होते. ही प्रक्रिया गुणात्मक विकासाची प्रक्रिया ठरते.

## ३) आध्यात्मिक व्यवस्थापनाची प्रक्रिया(*Design Your Own Path* )

**Leadership is the capacity to translate vision into reality. -Warren Bennis**

### ३.१) व्यावहारिक कौशल्य(शहाणपण) :

स्वतःच्या निर्णयाचा अधिकारी होणे ही स्वतंत्रता असते म्हणून स्वतःला स्वावलंबी करून निर्णय अधिकार देणे हा जन्मसिद्ध अधिकार असतो. काय हवे याची जाण असते.उद्दिष्ट ठरवून कार्य करणे. यात कार्याला स्वतंत्र मूल्य असते. बौद्धिक ज्ञानाला प्रत्यक्ष कार्याची जोडअसेलतर मनुष्याची कार्यप्रतिभा बनते. इच्छा ही कार्याचे उद्दीष्टात बदलते.हे कार्यामुळे स्वावलंबी होतो व याप्रमाणे स्वतःला निर्णय अधिकार व कार्यभूमिका देणे हे व्यावहारिकशहाणपण असते.या त स्वावलंबन जीवनमूल्य असते,तर निर्णय व सहजकार्य जीवनमार्गातील साधन असते.

**व्यावहारिक मूल्ये:**

**विकासाचा अधिकार (BORN FREE) :निर्णय**

या निसर्गात जीवसृष्टी आहे.पशूपक्षांना सृष्टीत समर्थपणे जगता यावे म्हणून त्यांचे स्वतःचे शक्ती स्थान असते, हे शक्तीस्थान त्यांची स्वतंत्रता (**BORN FREE**) ठरते. पक्षाला उडाण करण्याची शक्ती असते म्हणून त्याचे पंख पक्षाचे शक्तीस्थान असते. पक्षाला पिंजऱ्यात बंद करून पाळीव केले तर त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतल्या जाते. तो पंख असूनही उडाण विसरतो. याचप्रमाणे वन्य प्राणी वनातील संघर्षात समर्थ असतात. म्हणून निर्भयपणे वावरत असतात.

गोष्ट–आफ्रिकेत एका वनअधिकाऱ्याकडे एल्सा ही सिंहीण वाढलेली असते. एल्सा मोठी झाल्यावर वनअधिकारी दांपत्य तीला पिंजऱ्यात ठेवणे पसंत करीत नाही. निसर्ग नियमानुसार ती स्वतंत्र जगली पाहिजे असे त्या दांपत्याला वाटते म्हणून एल्साला वनात घेऊन जातात पण वनातील संघर्षास तिची मानसिकता समर्थ नसते. ती घाबरते.रानडुक्करही तिला दूंसे मारतात. अनेकदा वनात सोडण्याचा प्रयत्न होतो.पण शेवटी प्राणी संगहालयात सोडायला जातात व तत्पूर्वी शेवटचा प्रयत्न म्हणून वनाकडे वळतात. एल्साकडे एका सिंहीणीचे लक्ष जाते, दोघीत संघर्ष हातो.वनअधिकारी दांपत्य एल्सा म्हणून हाक मारतात, पण एल्सा वळत नाही. हा क्षण त्या दांपत्यासाठी अत्यानंदाचा ठरतो. एका क्षणात एल्सा स्वतंत्र झाली .

वाघ,सिंह यांचा निर्भयता हा गुण उपजत(**BORN FREE**) असतो.गुलामीमुळे भय येते. व आपला उपजत गुण विसरतो.मनुष्याला स्वाववलंबनाव्दारा निर्णय अधिकार मिळतो. म्हणून स्वावलंबानासाठी अर्थात योगक्षेमासाठी कार्य करणारी समर्थता हा उपजत गुण(**BORN FREE**)ठरतो .परावलंबनामुळे निर्णय अधिकाराचे स्वातंत्र्य विसरतो.

**स्वावलंबन** : कार्य करण्याचा अधिकार हा मनुष्याचा जन्मसिध्द अधिकार आहे. कारण मनुष्यजन्मच कर्मयोनी आहे.शरीर धर्म म्हणून कार्य करावेच लागते. कार्यासाठी ज्ञान गोळा करणे हे बौध्दिक शहाणपण आहे तर त्या ज्ञानाचा व्यवसायासाठी व्यावहारिक वापर करणे हे व्यावसायिक शहाणपण (Professional Wisdom)ठरते. इच्छा किंवा गरजा (State of Want) आणि कार्यप्रतिभा (State of Art) असे कार्याचे द्वि–अंग असते. उद्दीष्टाचे साफल्य कार्याद्वाराच होते.कार्यरत झाला की आपल्या पायावर उभा झाला अर्थात स्वावलंबी झाला

याची पावती मनुष्याला मिळते. त्याला निर्णय अधिकार मिळतो व समाजात जीवन जगण्यास समर्थ ठरतो. हेच मनुष्याचे (**BORN FREE**) स्वातंत्र्य ठरते.पक्षाला पंखाची जाण असते म्हणून उडाण करतो.तर पिंजऱ्यातील पक्षी पंख असूनही उडू शकत नाही. पंखाचे ज्ञानच विसरतो. निर्णय अधिकार मनुष्याचे पंख असते. परावलंबनाची सवय जडल्यामुळे जसा पक्षी पंख विसरतो. तद्वत मनुष्यही निणय अधिकार विसरतो, यामुळेच विकासाचे उत्तरदायित्व स्वीकारण्याची त्याची मानसिक तयारी नसते.परावलंबीत व्यक्ती विकासाचे दायित्व घेण्यास समर्थ नसतो. म्हणून स्वतःच्या विकासासाठी स्वतःला निर्णय अधिकार देणे हे स्वतःचे दायित्व ठरते.

*गोष्ट– मायकेल अँडरसनचे अपघातात पाय जातात. कुणा इतरांच्या मदतीशिवाय तुझे जगणे कठीण होईल असे डॉक्टरने म्हणताच अँडरसन संतापतो व मी पायाने पंगू झालो. मानसिक पंगू झालो नाही. मला ईश्वराने प्रयत्न अधिकार दिले आहेत माझे पंगुत्व वेळ सिद्ध करेल. हा अधिकार तुम्हाला नाही. असे डॉक्टरला उत्तर देतो. हाच अँडरसन विमानाचा पायलट होतो. याच निर्णय अधिकाराचे ज्ञान होण्यासाठी गांधीनी स्वावलंबन हा शब्द दिला. याची जाण विकासासाठी आवश्यक आहे.* ***(Beggars are not Choosers )*** *भिकाऱ्यांना निवड नसते.*

**स्वतःचा निर्णय** :**It is in your moments of decesion that your destiny is shaped.- Tony Robbins**

स्वतःच्या विकासाचे उत्तरदायित्व घेण्यासाठी बुद्धीचा निश्चय करून आत्मोन्नतीच्या मार्गावर येण्यासाठी स्वतःच्या निर्णयाचे उत्तरदायित्व स्वीकारणे आवश्यक असते. आपण येथवर आपल्या पायानेच चालत आलो आहोत.आपल्या जीवनात ज्या मार्गावर आपण चालत आलो तो मार्ग आपणच बनवला असतो.निर्णय स्वतःचे असतात. आपण कार्य स्वीकारतो ते स्वधर्म म्हणून. जे योग्य (सत्) आहे त्याचा स्वधर्म म्हणून स्विकार करतो. ही निर्णय अधिकाराची जाण असते. आत्मोन्नतीचे मार्गावर निर्णय अधिकाराची जाण आवश्यक असते. स्वतःच्या विकासाचे उत्तरदायित्व स्वीकारले तर व्यक्तीला आपली उन्नती करण्याचा अधिकार मिळतो. दुराचारीही महात्मा होऊ शकतो.

*गोष्ट– महर्षि वाल्मिकी पूर्वायुष्यात लूटमार करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत असे. वाल्या डाकू म्हणून त्यांची ओळख होती. संन्याशाच्या सल्ल्यावरून वाल्याने आपल्या कृत्याची माहिती कुटूंबियांना सांगितली व संन्याशी सांगतो, त्याप्रमाणे पापाचे उत्तरदायित्व स्वीकारण्यासाठी प्रत्येकाला विचारले तेव्हा सर्वांनी उत्तरदायित्व स्वीकारण्यास नकार दिला व आमचे पालनपोषण करणे हे तुझे कर्तव्य होते असे उत्तर मिळते. यामुळे पापाचे उत्तरदायित्व हे आपल्या एकट्याचे आहे हे वाल्याला उमगते. संन्याशाच्या सल्ल्यावरून पापक्षालनासाठी तपश्चर्या केली. वाल्या डाकूचा महर्षि वाल्मिकी झाला.*

**अपिचेतसु दुराचारो भजते माम अन्यभाक्**
**साधु एव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः**.(गीता ९–३०)

अर्थात दुराचारीही आपल्या उन्नतीसाठी उत्तरदायित्व स्विकारून आपल्या बुध्दीचा निश्चय करतो व अनन्य भावाने ईश्वरभक्ती करून साधू होण्यास पात्र ठरतो.

**सहज कार्य :**आपण ज्ञान मिळवतो पण तेच ज्ञान कार्यात बदलविण्याची कला आपल्या अंगी असेल तर त्या कार्याद्वारा आपण आपला विकास घडवून आणतो हेच कार्यातील व्यावहारिक कौशल्य ठरते. बुद्धी जर संशयाने आपली असेल तर दिव्यप्रेरणा जरी स्फूरली तरी

कौशल्य नसल्यामुळे व्यर्थ जाते व आपण आपल्या प्रेरणेप्रमाणे (VISION) कार्य करू शकत नाही, ज्ञान संस्कार असेल तरच कार्याचे उद्दीष्ट ठरवतो. याच कलेमुळे प्रगत विज्ञानाचा उपयोग करण्यात समर्थ होतो.कोलंबस हा स्वतः विद्वान होता. पृथ्वी गोल आहे हा शोध लागल्याबरोबर भारतात यायची त्याची इच्छा झाली. कमी वेळात समुद्रमार्गाने पोहचू शकू हा त्याला विश्वास वाटला. स्पेनच्या राणीने त्याचा प्रकल्प मंजूर केला व तो सफरीला निघाला. या सफरीतून अमेरिकेचा शोध लागला. कोलंबसाच्या रस्त्यात बदल करून वास्को दि गामा भारतात पोहोचला. भारतात पोर्तुगीज व त्या पाठोपाठ इंग्रज डेरेदाखल झाले. विद्येला कार्याची जोड असेल तरच कार्याचा निश्चय पक्का करू शकतो. इच्छेने कार्याच्या हेतू मध्ये परिवर्तन होते.

*गोष्ट– रशियाचा एका राज्याचा सम्राट पिटर याला आढळले की लोकांची प्रगतीशील व्यवसायासाठी परिश्रम करण्याची मानसिकता नाही या मानसिकतेत बदल व्हावा म्हणून स्वतः हॉलंडमध्ये गेला व तेथे जहाज बनविण्याच्या कारखान्यात कामगार बनला कारखान्याच्या मालकाला त्याने आपली ओळख कामगार म्हणूनच दिली. कामगाराच्या भूमिकेत राहूनच प्रत्येक विभागात काम करून जहाज बनविण्याचे संपूर्ण ज्ञान घेतले. स्वतः संपूर्ण जहाज बनविले व शेवटी लोखंडी कांबीवर आपले खरे नांव नोंदविले. तेव्हाच कारखान्याच्या मालकाला त्याची ओळख पटली. मालक ओशाळला परंतु सम्राटाने आपला हेतू स्पष्ट केला व मालकाचे आभार मानले. सम्राट पिटरने स्वतः कामगार बनून रशियन लोकांसमोर परिश्रमाचा आदर्श ठेवला. विद्येला प्रत्यक्ष कार्याची जोड असेल तरच व्यावसायिक शहाणपण येते व प्रगतीशील व्यावसायिक मानसिकता बनते.*

बौद्धिक ज्ञान किंवा दिव्य प्रेरणा या द्वारा मनुष्याला कार्याची दृष्टी मिळते. काय व्हावे? याचे स्वप्न मिळते. हे स्वप्न साकार करण्यासाठीच स्वतःला कार्यभूमिका देणे आवश्यक असते. लहान मूल चालणे शिकते. तेव्हा त्याला कष्ट वाटते पण चालायला लागल्यावर चालणे त्याचे सहज कार्य होते. चालण्यात तो आनंद घेतो व धावायलाही लागतो. या कार्याला व्यक्तीची स्वभावधारणा अनुकूल होते ते कार्य सहजकार्य होते.सहजकार्यानुसार जगातील लोक कार्यरत असतात. व्यक्ती स्वभावनुरूपच कार्य स्वीकारतो.पारंपरिक व्यवसायात सहजकार्य ही शक्ती असते म्हणून भारतात प्राचीन समाजव्यवस्थेत पारंपरिक व्यवसाय स्वीकारण्याची पद्धत होती. जातीव्यवस्था हीच व्यवसायाचे निदर्शक होती.व्यवसायाला अनुरूप स्वभावधारणा असणे, पारंपरिक व्यावसायिक व्यवस्थेतील रहस्य होते. आजच्या काळात शिक्षणाद्वारे बौद्धिक ज्ञान घेतो. योगक्षेमासाठी व्यावसायिक कार्य निवडतो किंवा उपलब्ध होणारे कार्य स्वीकारतो या कार्यात आवड निर्माण झाली तर ते सहजकार्य होते.व्यवसायाला अनुरूप स्वभावधारणा असणे सहजकार्याचे रहस्य असते.सहजकार्यामुळेच त्या कार्यात आत्मविश्वास निर्माण होतो. म्हणून प्रेरणा,स्वप्न साकार करण्यसाठी स्वतःला जे सहजसाध्य होईल याप्रमाणे कार्याचे टप्पे करता येतात व याद्वारे मार्ग ठरविता येतो. हजारो मैलाचा प्रवास पार करण्यासाठी पहिले पाऊल आवश्यक असते.

जर्मन तत्वज्ञ कार्लायल म्हणतो. ज्या व्यक्तीला आपला आवडीचा विषय व्यवसाय म्हणून लाभला त्याला ईश्वराला दूसरे कोणतेही वरदान मागण्याची गरजच उरत नाही. भगवद्‌गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात क्षत्रियकार्य हे तुझे सहजकार्य आहे. स्वभाव नियत कार्य म्हणून ,स्वधर्म म्हणून लाभणे हे स्वर्गद्वारच आहे. स्वतःला सहजकार्य देण्यासाठी जे कार्य आवडते त्या कार्याला व्यावसायिक किंवा सामाजिक उपयोगात आणणे किंवा जो विषय आपली शक्ती आहे त्या विषयाचा व्यावहारिक व सामाजिक कार्यासाठी उपयोग करणे हे व्यावहारिक कौशल्य असते.

## ३.२) सांस्कृतिक कौशल्य(शहाणपण)–

ज्या प्रमाणे पक्षी योगक्षेम चालविण्यासाठी आपले पंख वापरून उडाण करतो व आपला मार्ग स्वतः ठरवितो, तसाच सुसंस्कृत व्यक्ती आपला निर्णय अधिकार वापरून स्वधर्माचरणाद्वारा आपला विकासमार्ग ठरवितो ज्या मार्गावर समर्थपणे , आनंदाने व विश्वासाने चालू शकतो असा हा मार्ग म्हणजे जीवनकार्याचे व्यवस्थापन असते.यात स्वधर्म व कर्मयोग जीवनमूल्य ठरते.

मनुष्याला त्याच्या गरजपूर्तीसाठी कार्याचे साधन मिळाले आहे. आपले कार्य करीत असताना याच कार्याचा कळत नकळत समाजाच्या गरजा, निर्सगचक्र यांच्याशी संबंध जोडलेला असतो. म्हणून कार्याचा स्वधर्म होतो तेव्हा कार्याला फक्त व्यावहारिक मूल्य नसून सामाजिक मूल्य प्राप्त होते. शरीराला साधन जाणून स्वतःला स्वधर्म देणे, यात कार्याला सामाजिक मूल्य असते. व्यावहारिक शहाणपण व आध्यात्मिक शहाणपण याचा दुवा सांस्कृतिक व धार्मिक शहाणपणाद्वारे साधल्या जातो. यामुळे कार्याला स्वधर्माचे मूल्य प्राप्त करून देतो. अर्थात व्यावहारिक कार्याचे सत्कार्यात रूपांतर करतो.यात सत् ,वचन जीवनमूल्य ठरते तर स्वधर्म कार्याचा दृढनिश्चय जीवनमार्गातील साधन ठरते. स्वधर्म ,वचन हे जीवनमार्गातील व्दंव्द दूर करणारे (TIEBREAKER) जीवनमूल्य ठरते.

**सांस्कृतिक मूल्ये:**

**स्वधर्म कौशल्य – कार्याचे स्वधर्मात परिवर्तन (निष्कामीकरण)**

**सत्कार्य धर्म (GOOD WORK) :** मनुष्य सामाजिक प्राणी म्हटला आहे. तो कुटूंबात असतो, कार्य करण्याच्या संस्थेत असतो, समाजात असतो, त्याचवेळी देशात असतो. सृष्टीत असतो. वेगवेगळे कुरुक्षेत्र त्याला (Plat form)मिळते व त्याप्रमाणे निर्णय घ्यावा लागतो. म्हणून कुलधर्म, व्यावसायिक कर्तव्यधर्म, समाजधर्म, देशधर्म, सृष्टीधर्म मिळतो. जसा शरीराला कार्याचा स्वधर्म मिळतो, तसेच ज्या कुरूक्षेत्रावर (Plat form)असतो त्याला त्या संघटनाचा/चमू (Team)चा स्वधर्म निश्चित करावा लागतो. चमूमध्ये खेळत असतांना खेळाडू समर्पित वृत्तीने खेळत असतो. त्याचा व्यक्तिगत स्वार्थ चमूच्या उद्दीष्टांत विलीन होतो. यामुळे चमूचे उद्दीष्ट्य (Social Want) साध्य करणे हे स्वधर्माचरण (Cultural Wisdom) ठरते. स्वधर्माचरण हे समर्पित कार्य असते. कार्याशिवाय योगक्षेमही चालत नाही. **असतो मा सत गमय** अशी सुसंस्कृत व्यक्तीची मार्ग श्रद्धा असते, मनुष्य हा वेगवेगळ्या कूरूक्षेत्रावरील (Plat-form) भूमिका पार पाडत असल्यामुळे कधी द्वंद्व येतो.स्वधर्माचरणात द्वंद्वामुळे दुर्बल झालेला पळवाट शोधतो, व कार्य करण्याचा किंवा न करण्याचा त्याचा जो निश्चय होतो, त्याचे समर्थन करणे अज्ञान ठरते. तर स्वधर्माचरण ही संस्कृती ठरते.

**न असतो विद्यते भावो, न अभावो विद्यते सतः**
**उभयोः अपि दृष्टे अन्तः तूअनयोः तत्वदर्शिभिः** (गीता २–१६)

अर्थात योग्य अयोग्य (सत्–असत्) यातून सुसंस्कृत व्यक्ती योग्य (सत्) ची निवड करतो व स्वतःला स्वधर्म देतो. ज्याचा काळ अधिक ते शाश्वत व ज्याचा काळ कमी ते अशाश्वत. चमू व खेळाडू यामध्ये चमू शाश्वत, जे शाश्वत ते सत् याप्रमाणे सत् असत् या द्वंदावर मात करून निश्चय करतो. दुःखाने कमजोर न होता **"Show must Go on"** असे. स्वधर्माचरणाचे ब्रीद स्वीकारतो. वैभव, कीर्ती कार्याच्या स्वधर्माचरणानेच मिळते. याप्रमाणे स्वधर्माचरण (**Cultural Wisdom**) सांस्कृतिक शहाणपण ठरते. स्वधर्म मनुष्याच्या उच्चत्तम विकासाचे साधन ठरते.यासाठी वापरलेले सत् जीवनमूल्य ठरते.

**वचन धर्म ( Honour your own words ) :**दृढनिश्चय होण्यास वचनधर्म महत्त्वाची भूमिका बजावते. कार्यातील द्वंद वचनामुळे सुटतो. कार्याचा निश्चय होण्यास विविध पर्याय आपल्यासमोर असतात. परंतु आपण निर्णय घेणे हे प्रत्यक्ष कार्यासाठी आवश्यक असते. द्वंद वेळोवेळी वाटेत येतात. अशावेळी स्वतःचे वचन भ्रम दूर करते. प्राचीन भारतात वचन धर्मामुळेच अनेक महापुरूष ओळखल्या जात होते. शिबी राजा, राजा हरीश्चंद्र इ. वचननिष्ठ पुरूष भारताची ओळख बनली होती. इक्ष्वाकूवंश अर्थात रघुवंश भारताचे प्रतिनिधीत्व करीत होता. याच रघुकूलातील दशरथ महाराजांना वचन धर्म पाळणे अवघड गेले. युध्दामये कैक्यीने दशरथ महाराजांचे प्राण स्वतःच्या जीवाची पर्वा न करता वाचविले तेंव्हा राजा दशरथाने कैकेयीला वर माग असे म्हटले. कैकेयीने नकार दिला असता, आगाऊ दोन वर देण्याचे वचन दिले. जेव्हा वचन पूर्तीची वेळ आली तेंव्हा दशरथ महाराजांना मोहाने पछाडले. श्रीरामाने हे जाणले. परंतु वचन धर्माचाच आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी आपल्या कुलधर्माचे प्रयोजन आहे व ते पाळणे अनिवार्य आहे, धर्म जाणून तुम्ही शोक करू नका असे पित्याला विनवले.

**रघुकूल रीती सदा चली आई, प्राण जाई, पर वचन न जाइ**

परंतु महाराजावर परिणाम झाला नाही मोहाने महाराजावर विजय मिळविला, शोकाने त्यांच्या शरीराला व्यापले व त्यातच त्यांचा अंत झाला.पंचवटीत असतांना सीतेच्या आग्रहावरून लक्ष्मण श्रीरामाचे शोधात निघतो. निघण्यापूर्वी लक्ष्मणरेषा आखून ही रेषा पार करू नका, असे सीतेला सांगतो. पण सीतेकडून वचन घेत नाही. थोड्या वेळात संन्याशाचे रूप घेऊन रावण येतो. सीतेला म्हणतो मी भिकारी नाही, धर्म पाळायचा असल्यास तू माझ्यापर्यंत येऊनच भिक्षा वाढ. सीतेसमोर धर्मसंकट उभे झाले. सीतेचे कोणतेही स्वतःचे वचन नसल्यामुळे निश्चय होत नव्हता व भिक्षादानाचा धर्म श्रेष्ठ म्हणून सीतेने लक्ष्मणरेषा ओलांडून भिक्षा देण्यास निघाली व रावणाने डाव जिंकला. वचनधर्म हाच रामायणाचा प्राण आहे. श्रीरामाचा बाण जसा एकदा भात्यातून निघाल्यानंतर तो परत भात्यात जात नव्हता तसेच वचनाचे मूल्य होते. शब्द हा वाक्बाण ठरतो.'

**अमंत्र अक्षरं नास्ति. योजकः तत्र दुर्लभः**

अर्थात प्रत्येक शब्द मंत्रासाठी उपयोगात येतो.मंत्र शक्तीस्त्रोत ठरतो.असा शक्ती स्त्रोत निर्माण करण्यासाठी शब्द वापरणारा, ते जाणणारा दुर्लभ असेच मनूष्य जीवनात शब्दाचे महत्त्व आहे. या संदर्भात आत्मसन्मान हवा असेल, तर स्वतःच्या शब्दाचा सन्मान करा. हा त्याचा मतितार्थ. या वचनधर्माला आपण किती मूल्य देतो व त्याचा वापर आपल्या मार्गासाठी कसा करतो, हे आपल्या संस्कारावर अवलंबून असते. द्वंदमुक्तीसाठी सत्कार्याचा उपयोग दृढ व्रतासाठी होतो. तसाच वचन धर्म हा दृढ व्रतासाठी साहाय्यभूत ठरतो. कर्मयोगनिष्ठा धारण होते.

**धार्मिक स्वधर्म** –मनुष्याला सुख–शांती लाभावी, सत्कार्यात तो प्रवृत्त व्हावा तसेच परस्पर सहकार्य करून समाजात सुख–शांती लाभावी, जगात सुख–शांती लाभावी त्याद्वारा हे जगच स्वर्गासमान होईल, यासाठी समाज व्यवस्थेला पोषक असे मार्ग (पंथ) रूपी धर्म जगात अस्तित्वात आले. ज्यांत सृति (नियम) असतात. कोणताही धर्म व्यक्ती, समाज, सृष्टी व सृष्टीचालक ईश्वर यांना जोडणारा मार्ग असतो. समाजव्यवस्थेचे दायित्व समाजातील व्यक्तिंना कार्य देणे व त्याद्वारा समाजाला समृद्ध करणे असते, जेणे करून व्यक्ती शरीर धर्मानुसार कार्य करून परस्परांना सुखी करेल व समाजात समृध्दी येईल. याप्रमाणे समाजव्यवस्था व्यक्ती व समाज यांना जोडणारी असते, सृष्टीचा काळ समाजापेक्षा मोठा असतो. सृष्टीचे संतुलन सृष्टीचक्राचे कार्य असते. जसे समुद्रातील पाण्याची वाफ होऊन पर्जन्य,

पर्जन्यामुळे अन्न, अन्नामुळे प्राणीमात्राचे पोषण होऊन सृष्टीचक्राचे कार्य अव्याहत सुरू राहते. त्याच सृष्टीचे इतर समाजही घटक असतात. या सृष्टीचे संचलन ईश्वर ही शक्ती करते म्हणून समाजव्यवस्था, सृष्टी आणि ईश्वर यांना जोडणारा धर्म ठरतो. याप्रमाणे व्यक्ती आणि ईश्वर याला धर्माद्वारे जोडल्या जाते. मनुष्याने स्वतःला स्वधर्म देऊन आपल्या स्वधर्माचरणाने ईश्वर भक्ती करावी असे अभिप्रेत असते, ज्याद्वारा त्याचे कार्य समाजव्यवस्थेस पोषक ठरेल व व्यक्तीला जगण्याचा मार्ग देईल अशा संस्काराची बुध्दीमध्ये धारणा होते व मनुष्य स्वतःला स्वधर्म देतो, या स्वधर्माला धार्मिक संदर्भ प्राप्त होतो. श्रद्धा, मान्यता, परंपरा धर्माचा आधार असतो. देवता ईश्वराचीच रूपे आहे. अशी धार्मिक लोकांची श्रद्धा असते. ईश्वराची पूजा करणे, प्रार्थना करणे, जे धर्माच्या दृष्टीने योग्य आहे, त्याचा निर्णय घेणे व म्हणून ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या व्यक्तीला धार्मिक हा संदर्भ अभिप्रेत होतो.

स्वधर्म

सुसंस्कृत धार्मिक आध्यात्मिक

स्वधर्माला ईश्वरज्ञानाने आच्छादणे

### ३.३) आध्यात्मिक कौशल्य(शहाणपण):–

व्यक्तीच्या निष्ठेप्रमाणे दोन प्रकारच्या जीवनभूमिका कार्य करतांना असतात. पहिली कार्याद्वारा ज्ञान प्राप्तीसाठी सांख्यनिष्ठा दूसरी कार्याद्वारा योग ज्ञान प्राप्तीसाठी योगनिष्ठा.सांख्यनिष्ठेत ईश्वर शाश्वत व प्रकृति अशाश्वत म्हणून प्रकृतीचे कार्य ईश्वराला समर्पण हे स्वधर्मनिष्ठेचे ज्ञान असते तर ईश्वर ज्ञानाने बुद्धीला युक्त करून निर्णय पक्का करणे व कार्याद्वारा योगसाधना करणे हे कर्मयोगाचे ज्ञान असते.प्राकृतिक अवस्थेत व्यवहार मार्गात द्वंद्व असल्यामुळे मार्ग पक्का करण्यासाठी सहजकार्य स्वधर्मात बदलविणे किंवा निर्णय पक्का होण्यासाठी बुद्धीयुक्त होणे ही द्वंद्व युक्त स्थिती असते.सांख्यनिष्ठेचा आधार सहजकार्य असते.कार्य घडत असणे ही सहजप्रक्रिया असते,यात फलेच्छेमुळे यश–अपयश हे द्वंद्व निर्माण होते. म्हणून सांख्यनिष्ठेत मार्ग पक्का करण्यासाठी स्वधर्म व ईश्वरभक्तीसाठी कार्याचे समर्पण ही स्वधर्माची ज्ञाननिष्ठा असते. योगनिष्ठेचा आधार निर्णय असतो.निर्णय होणे ही सहजप्रक्रिया असते. यात सत् – असत् (चांगले–वाईट) कार्य हे द्वंद्व निर्माण होते. म्हणून योगनिष्ठेत मार्ग पक्का करण्यासाठी पक्का निश्चय व त्यासाठी बुद्धीयुक्त होणे ही निष्ठा असते.कार्यनिष्ठेसाठी योगसाधना ही योगनिष्ठा असते.ईश्वरभक्तीसाठी फलाचे समर्पण करणे ,यामुळे कार्याचा निश्चय होतो .

### आध्यात्मिक मूल्ये

**अ) ज्ञाननिष्ठा :** (समर्पित कार्यासाठी **स्वधर्म –सांख्ययोग**)

सांख्यनिष्ठेत ईश्वरज्ञान अनुभूतीसाठी स्वधर्माचरणाचा मार्ग अवलंबिलेला असतो.मनुष्य योगक्षेमासाठी कार्य स्वीकारतो व स्वतःला स्वधर्म देतो.मनुष्य ज्या कुरूक्षेत्रावर असेल तेथे स्वतःला स्वधर्म देतो. स्वधर्मात सत्कार्य कुलधर्म, व्यावसायिक कार्याचा स्वधर्म

इत्यादींचा समावेश होतो.समाजव्यवस्थेव्दारा मनुष्य स्वतःला कार्य देतो. सुसंस्कृत व्यक्ती स्वेच्छेने स्वतःला स्वधर्म देतो व धार्मिक धर्मविधानाने स्वतःला स्वधर्म देऊन सुसंस्कृत होतो. तर आत्मज्ञानी स्वधर्माचरणाव्दारा आध्यात्मिक अवस्थेत प्रवेश करतो व ज्ञानी होते.

**कार्य ठरविणे** : कार्य ठरवितांना सत्‌कार्यभाव धारण होण्यासाठी सुसंस्कृत व्यक्ती सत् असत् म्हणजे चांगले, कल्याणदायी, यानुसार स्वधर्म ठरवितो, योग्य व अयोग्य या द्वंदातून स्वतःला मुक्त करण्यासाठी कार्यावर स्वधर्माचे शिक्कामोर्तब करून मार्ग पक्का करतो. रामायणात पित्याचा वचनधर्म पाळणे या कुलधर्मासाठी श्रीरामाने पितृआज्ञेचा स्वधर्म स्वीकारला. अर्जुनाला रणांगणावर योद्धयाचा स्वधर्म मिळाला.

**कार्यरत होणे** :स्वधर्माचरण करतांना सत् म्हणजे शाश्वत, ज्याचा काळ तुलनात्मक अधिक ते सत् व ज्याचा काळ कमी ते असत् म्हणजे अशाश्वत याप्रमाणे सत् समर्पित भाव असतो. खेळाच्या चमूमध्ये खेळाडूला स्वधर्म मिळतो. चमू सत् म्हणून चमूला समर्पित होऊन स्वधर्माचरण करतो. ईश्वरज्ञानाने बुद्धीला युक्त केले की शरीर असत् व ईश्वर सत् म्हणून ईश्वराला समर्पित होऊन स्वधर्माचरण करतो.ईश्वर ज्ञान मनुष्याच्या स्वधर्माला आध्यात्मिक दृष्टी देते व संशय मिटून बुध्दीचा स्वधर्माचरणासाठी निश्चय होतो. याप्रमाणे धर्म–अधर्माचा मनातील संघर्ष अध्यात्मज्ञानानेच मिटतो. व व्यक्ती स्वधर्माचरणास समर्थ होऊन जीवनाच्या उच्चतम अवस्थेत त्याचा प्रवेश होतो.

**अनन्यः चिंतयन्तो माम् ये जनाः पर्युपासते**
**तेषाम् नित्य अभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम्:**(गीता ९–२२)

अर्थात ईश्वरच सृष्टी चालवतो, जे कार्य लाभले ते ईश्वरानेच दिले व त्याचेच कार्य म्हणून कल्याण भाव (**सर्वभूतहितेरतः**) धारण करून कार्य समर्पित भावाने अर्थात भक्तीरूपाने करतो. यामुळे व्यक्तिची भूमिका प्रवाशाची असते.योगक्षेमाचे ओझे डोक्यावरून उतरवून ठेवतो. ईश्वराच्या राज्यात जाणाऱ्या आगगाडीत जसा प्रवास घडावा (**मृत्योर्मा अमृतं गमय** )अर्थात अशाश्वताकडून शाश्वताकडे) असा असतो. यामुळे प्रचंड कार्य जरी केले तरी कर्म अकर्म होते. नैश्कर्मसिध्द होतो.

## ब) योग निष्ठा : (कार्याचा दृढनिश्चय –कर्मयोग)

**Courage is never to let your actions be influenced by your fears.-Arthur Koestler**

सुसंस्कृत व्यक्ती जे सत् त्याचा स्वीकार करतात म्हणून सत्‌कार्य करणारे ठरतात. यामुळे त्यांचे अंतःकरण शुध्द होऊन दृढव्रती वृत्ती धारण करून द्वंद्वमोहमुक्त होतात. त्यांचा अंतःकरणावर विश्वास असतो. म्हणून त्यांना दिव्य प्रेरणा स्फुरली की त्या प्रेरणेवर विश्वास असतो. कार्यसंकल्प करून त्यांचा दृढनिश्चय होतो. स्वतःला दृढनिश्चय देणे हे योगनिष्ठेतील दायित्व असते.यश–अपयश, सिध्दी–असिध्दी यात समत्वबुध्दी ठेऊन निष्ठेने कार्याचे आचरण करणे हा समत्वयोग ठरतो. त्याची भूमिका विजयी मानसिकता धारण करून लढणाऱ्या योध्याची असते. युध्दात हरला तरी कार्याव्दारा योग प्राप्ती होते व यामुळे मानसिक हार होत नाही, खचत नाही.. व्यक्तीची भूमिका योध्याची असते

(**योगः कर्मसु कौशलम्** –गीता २–५०)

व कार्यकौशल्याच्या उच्च पातळीवरअसतो.

**तस्मात् सर्वेषु कालेषु माम अनूस्मर युध्य च**(गीता ८–७)अर्थात स्वतःचा जीवन संग्राम स्वतः लढण्यास सिध्द असणारी जीवननिष्ठा असते.योगी होण्यासाठी कार्याला कर्मयोग करणे अर्थात दृढव्रती होणे हे कार्यकौशल्य ठरते .

**दृढनिश्चय** :योगनिष्ठेत कार्याद्वारा योगी होणे व स्वतःतील दिव्यत्वाचे ज्ञान होणे अर्थात ज्ञानप्राप्ती होणे ही जीवननिष्ठा असते.तपस्वी योगाभ्यासाद्वारा योग संसिध्द होतो. समाजात राहणाऱ्या व्यक्तीला कार्याची गरज असते, या कार्याव्दाराच योगी होणे हे कर्मयोगाचे रहस्य आहे (.**योगः कर्मसु कौशलम्)**यात मनुष्याची निष्ठा कर्मयोगाची असते.दृढनिश्चय कर्मयोगाचा पाया असतो. मनुष्य भयग्रस्त, अस्थिर, दुबळा झाला तर द्वंद्व क्रियाशील होणे याचा तो परिणाम असतो. द्वंद्व हा नैसर्गिक दुबळेपणा आहे. यामुळेच बुद्धी संशयाने व्यापली जाते व दिव्य प्रेरणा जरी स्फुरली तरी कार्याचा निश्चय होत नाही. नकारात्मक विचारांचा प्रवाह बुध्दीत सुरू असतो. कुरूक्षेत्रावर कार्यासाठी उभा झाला आणि द्वंद्व क्रियाशील झाला की त्याच्या प्रभावाने मोह होतो. मनात सिध्दी–असिध्दी, सत्–असत्, धर्म–अधर्म याचा संघर्ष उभा ठाकतो व बुद्धीचा निश्चय होत नाही. बुध्दीमधील अस्थिरता मनाची चंचलता असते. म्हणून

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।**
**तत्स्वयं योग संसिध्दः कालेन आत्मनि विन्दति**(गीता ४–३८)

अर्थात ईश्वरज्ञानाने बुध्दीतील संशय रूपी गढूळता दूर करून कार्याचा निश्चय पक्का करणे आवश्यक असते ज्या द्वारा बुद्धीत प्रवाहीत होणारे नकारात्मक विचाराची जागा सकारात्मक विचार घेते.मनुष्याला मार्गावरून विचलित करणाऱ्या दुर्बलतेपासून मुक्ती म्हणजे योगसंसिध्द होणे. योग ही शक्ती ठरते. दुबळेपणामुळे संशयाचा अड्थळा असतो.ईश्वरज्ञानद्वारा संशयमुक्त होऊन बुद्धीयुक्त होतो. दुबळे करणाऱ्या द्वंद या शत्रूवर मात करण्यासाठीच योगस्थ वृत्ती धारण केली असते. तो बुद्धीयुक्त ठरतो. अर्थात बुद्धीला भ्रम निर्माण करणाऱ्या विचारांपासून मुक्त करतो व दृढनिश्चयी होतो..योग संसिध्द झाला असता ईश्वरज्ञान प्राप्तीसाठी आपले कार्य ईश्वरसमर्पित करतो. अर्थात संपूर्ण दायीत्व ईश्वराकडे सोपवतो व ज्ञानी होतो या ज्ञानात सुख अनुभवतो ज्यामुळे बुध्दी विचलित होत नाही. याप्रमाणे योगसंसिध्द झालेला ज्ञान प्राप्त करून घेतो.

## ३.४) सार:मार्गाचेआध्यात्मिकीकरण.

प्रकृतीजीवनप्रवास घडवीत असते.कार्याचे व्यवस्थापन आध्यात्मिक व्यवस्थापनात परिवर्तीत करून होणारा प्रवास हा अमृतप्रवास ठरतो.जीवनप्रवासात अमृतप्रवास घडणे हे प्रकृतीचे नियमन असते.अमृतप्रवासाचे साधन योगमार्ग ,योगमार्गाचे साधन स्वतःचा स्वतंत्र मार्ग,स्वतंत्र मार्गाचे साधन निर्णयअधिकार,निर्णयअधिकाराचे साधन स्वावलंबन असते. याप्रमाणे सुखी मार्गासाठी स्वावलंबन पायाभूत जीवनमूल्य ठरते.स्वावलंबनासाठी कार्य साधन असते.जीवनप्रवासात स्वतःला कार्यरत करणे हा प्रकृतीच्या नियमनासाठी पायाभूत संस्कार ठरतो.प्रकृतीचे नियमन करून ज्ञानी होणे,या अवस्थेत मार्ग स्वतःचा असतो.हा मार्ग ज्ञानमार्ग /योगमार्ग असतो.जीवनप्रवास

अमृतंगमय (अमृतप्रवास) होतो.हाच सुखाचा प्रवास ठरतो.स्वधर्माव्दारे नैश्कर्मसिध्दी ही ज्ञाननिष्ठा असते.कर्मयोग(कार्याव्दारे योग)ही योगनिष्ठा असते.स्वतःचा स्वतंत्र मार्ग,ज्ञाननिष्ठेतील स्वधर्म,योगनिष्ठेतील कर्मयोग(दृढनिश्चय)जीवनमूल्ये ठरतात.

**स्वतंत्र मार्ग** :


स्वातंत्र्य ही मनुष्याची मूलभूत प्रेरणा आहे. तर आध्यात्मिक संदर्भात मोक्ष ही संपूर्ण स्वातंत्र्याची संकल्पना आहे. सृष्टीच्या अनंतकाळात शरीर अशाश्वत ठरते. ज्या प्रकृतीत मनुष्याचा जन्म झालेला असतो ती प्रकृती नकळत (अज्ञानामुळे) मनुष्याला गुलाम करते व तो दुःखी होतो. आत्मा ईश्वराचा प्रतिनिधी, चैतन्यरूपात हृदयात स्थित असतो. ईश्वराचे राज्यात (नीजधाम) संम्मिलीत होण्यासाठी आत्म्याचा प्रकृतीशी संघर्ष सुरू असतो. म्हणून मनुष्याला बंधन वा स्वातंत्र्य याची जाणीव होते. प्रकृतीचा गुलाम न बनता जीवन जगण्याचा आनंद घेण्यासाठी मनुष्याला जगण्याचा मार्ग स्वतः बनवावा लागतो. ज्यामुळे जीवनाचा प्रवास कष्टदायी न होता आनंददायी होईल असा मार्ग म्हणजे कार्यकौशल्य साध्य होवून विजयी मानसिकता धारण होणे व प्रसन्नचित्त असणे.म्हणून जीवनाची ज्ञानी अवस्था म्हणजे स्वातंत्र्याच्या जीवनमार्गाची निवड करणे.

**योगमार्ग**–कार्यातून मानसिक शक्तीची साधना हा योगमार्ग असतो.सामान्य अवस्थेत मनुष्य कार्याला गरजपूर्तीचेच साधन मानतो . प्राप्तीसुखासाठी कार्य हा योगक्षेमाचा (***Survival)*** प्रवास असतो. स्वर्गप्राप्तीसाठी विशेषकार्य करणे हा सुध्दा भोगैश्वर्याचाच प्रवास ठरतो (गीता २/४२–४४) म्हणजेच प्राप्तीसुखासाठी कार्याचे व्यवस्थापन असते. तर कार्याद्वारे योग साध्य करणे हा योगमार्ग असतो. ज्ञानी स्वतःला सहज असणारे व्यावहारिक कार्य देतो. या कार्याला स्वधर्म करतो.निर्णयाला कर्मयोग करतो. प्राप्तीसुखासाठी कार्य या व्यवहारमार्गाचा आधार लाभ नुकसान असल्यामुळे संभ्रम होतो व प्रवास बंधनातच सुरू असतो. योगमार्गाचा आधार स्वातंत्र्य (मोक्ष,ईश्वरज्ञानाला जोडणारा बुध्दियोग,योगासाठी कार्य) असल्यामुळे व्यवहार मार्गातील संभ्रमता (योग्य–अयोग्य, सत–असत कार्य हे बंधन) सोडविण्यासाठी योगमार्गाची दृष्टी लाभते.कार्याचा निश्चय पक्का असतो.याप्रमाणे कार्यासाठी स्वधर्म ज्ञान(**Tiebreaker**) ,निर्णयासाठी कर्मयोग ज्ञान व कार्याव्दारा योग हे मानसिक शक्तीचे ज्ञान, स्वतःच्या मार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन असते.

**अमृतप्रवास (ज्ञानमार्ग)**– वर्तमान भविष्याची पूर्वस्थिती (**Precondition**)असते.कार्याची प्रेरणा स्वतःची असते.ही प्रेरणा विकसीत करणे,साकार करणे स्वतःचे दायीत्व असते.सामान्य (**Survival**) स्थितीत स्वभावनियत जीवनयात्रा घडते. तेंव्हा व्यावहारिक दृष्टी असते. म्हणून प्रगती मंदावते तर योगमार्गात बुद्धीला ईश्वराच्या (वैश्विक शक्ती) ज्ञानाने संस्कारीत करून बुद्धीमधील प्रदूषण दूर होते.बुद्धीमध्ये सकारात्मक विचार प्रवाहीत होतात व विजयी मानसिकता बनते. कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी ते कार्य पूर्ण करण्याची इच्छा व आत्मशक्ती प्राप्त होते.प्रचंड कार्य करूनही मनुष्य त्या कार्याच्या कष्टापासून, दुःखापासून मुक्त असतो व कार्यात प्रचंड शांती अनुभवतो. हीच अकर्म स्थिती ठरते. ज्याप्रमाणे ईश्वर अध्यक्ष भूमिकेत सृष्टी संचलन करतो पण प्रत्यक्षात काहीही करीत नाही. हेच कर्मात अकर्म पाहणे. कार्याद्वारा स्वतःचे ज्ञान होते. अमृतप्रवासात मानसिक शक्तीची साधना होते.कार्याचे (ईश्वर )ज्ञानात रूपांतर होते. स्वतःच्या शाश्वत तत्वाचे ज्ञान झाल्यामुळे हा प्रवास अशाश्वताकडून शाश्वताकडे अर्थात **मृत्योर्मा अमृतंगमय** असा होतो.स्वतःची ओळख व स्वतःच्या जीवनाचे महत्त्व त्याला कळले असते.व्यक्तीचा आपल्या मार्गावर संपूर्ण विश्वास असतो व हा मार्ग नितीचा असुन आदर्श ठरतो. म्हणून ही जीवनाची ज्ञानी अवस्था ठरते.

✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻

आध्यात्मिक क्रान्ति
-परिवर्तनाचे व्यवस्थापन
(CHANGE MANAGEMENT)
या पुस्तकावरील तज्ञांचे अभिमत




श्री.सुधीर ठाकरे (I.A.S )
माजी अध्यक्ष,महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MESSAGE

This document is a lucid blend of practicing spirituality with mundane human activities that inspires a harmony amongst 3H ; Head, Heart & Hand. It initiated with a message of "Walk the Talk" citing a verse by Sant Tukaram and take readers to educate as to how to tread the path of salvation stepping from acquiring information, converting it to knowledge , applying it for betterment of humanity in varied associations of the individual from family, community, society, nation to world.

It thus covers the processes of how to Inform , Reform, Perform and Transform oneself as preserved in various texts & actually preached and practiced by great minds in the universe .

A rare book to get a glimpse of all these aspects in a nutshell.


I think the book will be useful to all who desire of following these principles.

Wish all the success to the thoughtful book by Mr. Jawanjal.

Sudhir Thakre.(IAS retd.)
Former Chairman, MPSC.


गीता सर्वांनाच वंदनीय आहे. काही लोक अजिबात न वाचता तिला वंदनीय म्हणतात. काही वाचायचा प्रयत्न करतात व सोडून देतात. काही तिचा अर्थ न समजता ती वाचतात, तिचे पठण करतात. काही तिचा अध्यात्मिक अर्थ समजून घेऊन वाचतात. श्रीमद्शंकराचार्यांनी त्यातला ज्ञानयोग जाणला व जाणकारांत पसरवला. संत ज्ञानेश्वरांनी त्यातला भक्तीयोग अंगी बाणवला आणि सामान्यजनांत प्रसार केला. लोकमान्य टिळकांनी त्यातल्या कर्मयोगाचे तत्कालीन महत्त्व जाणले आणि गीतारहस्याद्वारे तो लोकांप्रती पोहोचवला. स्वामी विवेकानंदांनी तिचे वैश्विक महत्त्व जाणून ती आंतरराष्ट्रीय स्तरावर नेली. हे सर्व गेल्या शतकांतील त्या त्या काळांशी सुसंगत होते. श्री. साहेबराव जवंजाळ यांनी २१ व्या शतकातील तरुणांना ही गीता किती मार्गदर्शक आहे याचे सार्थ दर्शन त्यांच्या पुस्तकातून घडवले आहे. एका अर्थी त्यांनी आपल्याआधीच्या या चार महानुभावांचे कार्य पुढे नेले आहे. भगवद्गीता सार्वकालीन आहे, वैश्विक आहे आणि चिरतरूण आहे. ते बदलाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान आहे. Today's youth has to face the challenge of CHANGE and Bhagavadgeeta is the right Philosophy for MANAGING the CHANGE in right direction. या संदर्भात साहेबरावांनी जगभरातील अनेक महान तत्त्ववेत्त्यांचे व विचारवंताचे विचार संदर्भासाठी नेमके मांडले आहेत. भगवद्गीतेचे अनेक पैलू व त्यांची आजच्या व येणाऱ्या काळाशी सुसंगती त्यांनी मांडली आहे. हे पुस्तक अध्यात्माहून अधिक व्यवस्थापनशास्त्राचे आहे.

हे पुस्तक प्रत्येक तरुणाने वाचावे असा आमचा आग्रह राहील. नुसते वाचू नये तर ते आत्मसात होईतो वाचावे. अभ्यासावे.



**खालील कव्हरवर क्लिक करून थोडा वेळ थांबा.**

**पुस्तक आपोआप उघडेल.**



**चार पुस्तकं वाचली म्हणजे कोणी शहाणा होतो का?**

**हो.**

**होतो.**

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. बऱ्याच प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला स्वतःचे अनुभव व आईवडील यांसोबत पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**म्हणून वाचा**

**कृपया वाचत रहा.**

**म्हणून वाचा. वाचत रहा.**

**www.esahity.com**

**www.esahity.in**

**विनामूल्य वाचक नोंद करण्यासाठी लिहा**

**esahity@gmail.com**